
# संवाद

अन्नपूर्णा
परिवाराचे त्रैमासिक

डिसेंबर २०१९



धार्मिक-जातीय विद्वेषा विरुद्ध, महिलांच्या समान हक्कांसाठी,
महिलांच्या सन्मानासाठी निर्भयपणे लढण्याची प्रेरणा देणारी

## स्वतंत्र भारतातील त्रिमूर्ती












# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| * संपादकीय | – ***सुरेश धोपेश्वरकर*** |
| * गांधी भारतात येण्यापूर्वी | – ***रामचंद्र गुहा*** |
| * नेहरूंची अखेर | – ***सुरेश द्वादशीवार*** |
| * डॉ. आंबेडकर आणि अंधश्रद्धा निमूर्लन | – ***चंद्रकांत सर्वगौड*** |
| * एक सर्वहारा वर्गाचा शाहीर तर दुसरा तरक्की पसंद शायर | – ***लक्ष्मीकांत देशमुख*** |
| * गांधीजींची हत्या आणि ५५ कोटी वस्तुस्थिती समजून घेताना | – ***सेवाग्राम कलेक्टीव्ह*** |
| * वरूण ग्रोव्हरची मुलाखत | – ***समीर शेख*** |
| * महात्मा गांधी म्हणजे मजबूरी नसून मजबूती आहे | – ***संजय मंगला गोपाळ*** |
| * गांधीजी आणि अहिंसा | – ***डॉ. अजित मगदूम*** |
| * महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर वस्तूस्थिती समजून घेताना | – ***विजय तांबे*** |
| * अन्नपूर्णा परिवार वार्तापत्र | – ***अंजली पाटील*** |



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## अस्वस्थ जगाचे वर्तमान

**- सुरेश धोपेश्वरकर**

निसर्ग कोपला आहे. दिल्लीत धुके आणि धूर यानी सामान्य जनतेचा श्वासोश्र्वास कोंडला आहे.

फ्रान्समध्ये हिम वादळ झाले आहे. तीन लाख घरांचा वीज पुरवठा खंडीत झाला आहे.

महाराष्ट्रात अवकाळी पावसाने धुमाकूळ घालून अडतीस लाखहेक्टर जमीनीवरील रब्बीचे पीक उध्वस्त केले आहे. पाऊस आणि माजी मुख्यमंत्री महाराष्ट्रातील कष्टकरी जनतेला वाकुल्या दाखवत सांगत आहेत, ''मी पुन्हा येईन - मी पुन्हा आलो!'' जत्रेत हरवलेल्या मुला मुली प्रमाणे जनता आक्रोश करून सांगत आहे. ''पुरे झाला धिंगाणा''

सुप्रिम कोर्टाने राम मंदिर बाबरी मसजिद विवाद्य जागेसंबंधी निवाडा दिला आहे. शबरीमाला देवालयांतील महिलांच्या प्रवेशासंबंधी निर्णय दिला आहे. राफेल विमान खरेदीतील कथित भ्रष्टाचारा संबंधी निर्णय दिला आहे. काश्मीर मध्ये परिस्थिती निवळली का? जन जीवन पूर्व पदावर आले का? निवडणूकांसाठी राजकीय पक्षांना देणगी म्हणून दिलेल्या इलेक्शन बॉडस् याविषयावर सध्या सुरू झालेल्या संसदेच्या अधिवेशनांत यावर पुन्हा एकदा वादळी चर्चा झडण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय अर्थव्यवस्था मंदीच्या फेऱ्यात अडकली आहे. सरकारने कर सवलती, स्वस्त कर्जे, या सवलती कारखानदार वर्गास सप्टेंबर पासुन दिल्या आहेत. कर सवलती देतांना पार्लमेंटने पास केलेल्या वित्त विषयक विधेयकास बगल देण्याचा चुकीचा पांयडा पाडला आहे. परंतु सप्टेंबर मध्ये सवलती दिल्या पासुन दोन महिने झाले, दसरा दिवाळीचे सणासुणीचे दिवस गेले पण बाजारात मालाला उठाव नाही. कारण सर्वसामान्य जनतेच्या खिशात खरेदिसाठी पैसा नाही क्रयशक्ती नाही.

टेलीकॉम क्षेत्रात पूर्वलक्षी प्रभावाने लावलेल्या करा मुळे, बिगर बँकींग क्षेत्रातील वित्तीय कंपन्या बुडाल्यामुळे पंजाब अॅण्ड महाराष्ट्र ही सहकार क्षेत्रातील बँक बुडाल्यामुळे, अर्थ व्यवस्थेचे संकट अधिक गडद होत जात आहे, त्यामुळे बँकाच्या पाठीवरील थकीत कर्जाचा बोजा वाढत आहे आणि व्याजदर स्वस्त झाले तरी कर्ज पुरवठा मंद गतीनेच सुरू आहे.

अमेरिका चीन व्यापार युद्ध, ब्रिटनची युरोपियन युनियन मधून बाहेर पडण्यासाठी चाललेली धडपड आणि त्या प्रश्नांवर होऊ घातलेली सार्वत्रिक निवडणूक, हॉककॉंग, चिली, ब्राझील, लॅटीन अमेरिका, इराण, इस्त्रायल सिरिया या प्रदेशात जाणवणारी अस्वस्थता यामुळे सध्या अेकूणच जगाचे वर्तमान कुणाही संवेदनशील नागरिकांस अस्वस्थ करणारे आहे.

वर्तमान अस्वस्थ करणारे आहे, तर भविष्यकाळ जीवन अस्थिर करणारा आहे. कारण नव तंत्रज्ञान फार वेगाने जीवनांत प्रवेश करीत आहे. कष्टकरी जनताच नवतंत्रज्ञान निर्मितीतील महत्त्वाचा घटक आहे. तंत्रज्ञानानें उच्चनीच पणाच्या जुन्या जाणीवा यांना सुरूंग लागतो. तंत्रज्ञानाने समाजाच्या लोकशाही प्रक्रियेस अधिक जोमदार गती मिळते आणि मानवाच्या प्रगतीच्या स्तर उंचावतो.

परंतु सध्याच्या विषम आर्थिक-सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणात आणि निसर्ग आणि विकास यांचे सतुंलन बिघडले असताना नवतंत्रज्ञानाचा वापर वस्तू-सेवा उत्पादनातून कष्टकऱ्याला आणि निसर्गाला उध्वस्त न करता कसा करावयाचा हा यक्ष प्रश्न–कळीचा प्रश्न बनला आहे. हाच प्रश्न यंदा युनोच्या व्यासपीठावरून खास आमंत्रित करण्यात आलेल्या १६ वर्षाच्या कुमारी ग्रेटाथुनबर्न हिने सर्व राष्ट्राना आणि त्यांच्या राष्ट्रप्रमुखाना उद्देशून केला आहे.

जगभर अस्वस्थता आहे कारण या प्रश्नाचे सर्वमान्य सामाजिक हिताला अनुसरून, उत्तर सर्वसामान्य जनता राज्यकर्त्या वर्गाकडे, पक्षांकडे, व्यक्तींकडे मागत आहे.

समाजातील आर्थिक सामाजिक सांस्कृतिक दृष्ट्या बलवान असलेल्या व्यक्ती आणि शक्ती या नव्या प्रश्नांना जुनीच उत्तरे देत आहेत. म्हणून सर्वसामान्य जनता अस्वस्थ आहे आणि सत्ताधारी व्यक्ती आणि शक्ती अस्थिर होत आहेत.

जगातील, आपल्या भारतातील आणि महाराष्ट्रांतील सत्तेच्या राजकारणातील नाट्यमय घटना या दृष्टीकोनातून पहिल्या की त्यांची संगती लागते, कष्टकरी जनतेचे सामूहिक मन समजते. प्रश्न समजतात, उत्तरे सापडतात, निराशा दूर पळते आणि कृतीशीलता वाढते.

हे वर्ष महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीचे, पंडीत नेहरूच्या १३० व्या जयंतीचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या महापरिनिर्वाणाचे ६३ वे वर्ष आहे. ''संवाद'' च्या या अंकातून त्यांची स्मृती जागविणारे लेख आम्ही छापले आहेत. तसेच कैफी आझमी आणि अण्णाभाऊ साठे यांची यंदा जन्मशताब्दी आहे. म्हणून त्याच्यावर मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचा सविस्तर लेख छापला आहे. नवोदित स्टॅंडअप कॉमेडियन विनोद ग्रोव्हर याची मुलाखत छापली आहे.

येणारा कालखंड हा प्रचंड उलथापालथीचा, धामधूमीचा, जातीय आणि धार्मिक सलोख्याचे वातावरण टिकविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा असणार आहे. तसेच दैनंदिन जीवनाचे रोजी, रोटी घरे, आरोग्य आणि शिक्षण या संबंधी राज्यकर्त्यांना जाब विचारण्याचे आमच्या हिताची धोरणे आखा हे ठणकावून सांगण्याचे दिवस असतील. संघटित रहा. संवेदनशील पणे विविध प्रश्नांची उत्तरे शोधा. राज्यकर्त्यांना कष्टकरी जनतेच्या हिताची धोरणे आखण्यास मजबूर करा. गांधी, नेहरू, डॉ. आंबेडकरानी जीवन बदलण्याची दिलेली लढाऊ प्रेरणा निर्भयपणे जागृत ठेवा.

❐

# गांधी : भारतात येण्यापूर्वी

■ रामचंद्र गुहा
अनुवाद : शारदा साठे

गांधींचे लोकांबरोबरचे संबंध एकाच वेळी वैयक्तिक होते आणि उद्दिष्टपूर्तीचे साधन म्हणूनही होते. त्यांची आपल्या मुलांवर विलक्षण माया होती. (निदान तिघांवर तरी!) पुतणे, भाचे आणि भारतीय व युरोपियन मित्रांवरही त्यांचे अपार प्रेम होते. त्या सर्वांनी त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्यात मदत केली होती, पण ती काही त्यांच्यासाठी जाता जाता करायची गोष्ट नव्हती. ते गांधींना त्यांच्या वृत्तपत्रात आणि वकिलीच्या व्यवसायात मदत करत असत. सामान्य लोकांमध्ये आणि राज्यकर्त्या वर्गात जाऊन त्यांच्या कार्यासाठी पाठिंबा मिळवत असत. इतकेच नव्हे, तर सामाजिक आणि सार्वजनिक कार्याला जमेल तितका निधीही देत असत आणि इच्छाशक्ती असेल तेव्हा ते त्यांच्याबरोबर तुरुंगातही गेले होते.

गांधींच्या खालोखालची ही जी फळी होती ती आपल्या स्वत:च्या कुवतीनुसार चांगलीच भक्कम फळी होती. हे स्त्री-पुरुष बुद्धिमान होते आणि निष्ठावंतही होते आणि त्यांच्या माध्यमातूनच गांधींची आपल्याला एक व्यक्ती म्हणून, तसेच एक ऐतिहासिक नायक म्हणून पूर्ण ओळख होते. हेन्री पोलाक, थंबी नायडू, ए. एम. काचलिया, सोन्जा श्लेशेन आणि पारशी रुस्तमजी यांच्याशी गांधींचे जे नाते निर्माण झाले होते, त्यातूनच आपल्याला गांधींच्या राजकीय मोहिमांचे अधिक योग्य व चांगले आकलन होऊ शकते. हरमान कालेनबाखबरोबर त्यांनी जे प्रयोग केले, त्यातून त्यांचा टॉलस्टॉय आणि त्यांच्या अनुयायांबरोबर जो संवाद झाला तो आपल्याला सखोल पातळीवर समजू शकतो. गांधींची आत्मोन्नतीची (आणि विन्रमतेचीसुद्धा) उत्कट इच्छा आणि त्यांनी रायचंदभाई, जोसेफ डोक आणि सी. एफ. ॲण्ड्यूज यांच्याबरोबर केलेल्या चर्चा पाहिल्या तर आपल्याला त्यांची धार्मिक बहुविधता व सर्वसमावेशता कशी विकसित झाली ते दिसून येते.

प्राणजीवन मेहता हे गांधींचे आयुष्यभर मित्र होते आणि त्यांचा पत्रव्यवहार सातत्याने चालत असे. त्यातून आपल्याला गांधींनी स्वत:साठी आणि मायदेशासाठी आखून घेतलेली महत्त्वाकांक्षा समजायला मदत होते. गांधींचे कस्तुरबा, हरिलाल आणि मणिलालशी असलेले संबंध आणि समज-गैरसमज यांतून या माणसाचे बारकावे आपल्याला कळायला लागतात, खासकरून आपण त्यांचे कौटुंबिक जीवनातील अपयश आणि सामाजिक व आत्मिक यश समोरासमोर ठेवतो तेव्हा तर गांधी आपल्याला अधिकाधिक उमजतात.

हे तर झालेच, पण गांधी आपल्याला त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील प्रतिस्पर्ध्यांमुळे अधिक कळू शकतात संकुचित बुद्धीचे मॉन्टफर्ड चॅम्ने, अभिमानी जनरल स्मट्स, भीतिग्रस्त ईस्ट रॅण्ड व्हिजिलॅन्टेस आणि नाताळमधील उन्माद चढलेली गोऱ्यांची झुंड या सर्वांनी गांधींच्या जगाला आकार दिला आणि त्यांचा जागतिक दृष्टिकोनही घडवला. त्यांत लढाऊ पठाणांचा आणि दरबानचा संपादक पी. एस. अय्यरचाही समावेश करायला पाहिजे. १८९३ साली दरबानमध्ये आलेल्या या साध्या, सरळ, प्रामाणिक वकिलांचे रूपांतर १९१४ साली केपटाऊनहून प्रयाण करणाऱ्या एका चलाख, एकाग्रचित विचारवंत व कार्यकर्त्यात करण्यात मित्र आणि शत्रू असे सगळेच मदतनीस होते.

त्यांच्या शत्रूंमध्ये दोन माणसे अतिशय जबरदस्त सामर्थ्य असलेली अशी होती. एक अल्फ्रेड मिल्नर आणि दुसरे जॉन ख्रिश्चन स्मट्स. इतिहासाने गांधींना अगोदरच स्मट्सच्यापेक्षा बरेच वरचे स्थान दिले आहे आणि मिल्नरच्यादेखील. गांधी दक्षिण आफ्रिकेत वास्तव्याला असताना या दोन व्यक्ती त्यांच्यापेक्षा कितीतरी वाचत होत्या. त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील स्थानाचा सर्वांना चांगला परिचय होता आणि त्या कारणानेच गांधींच्या मागण्यांकडे तिरस्काराने पाहण्यास

ते प्रवृत्त झाले होते. दोघांपैकी एकाने जरी थोडा भारतीय दृष्टिकोनाचा विचार केला असता तर काय सांगावे इतिहासाने गांधींचे मापन कसे केले असते? १९०४ मध्ये जर मिल्नरने ट्रान्सवालमधील भारतीयांचे विद्यमान हक्क मान्य केले असते, तर गांधींनी सविनय कायदेभंगाचा विचारसुद्धा केला नसता आणि ते भारतात परतले असते. त्यानंतर तीन वर्षांनी स्मट्सने एशियाटिक ॲक्ट रद्द केला असता आणि ज्या हजार-एक भारतीयांचा असा दावा होता, की त्यांना बोअर युद्धाच्या पूर्वीपासूनच दक्षिण आफ्रिकेत वास्तव्याचा हक्क होता, त्यांना तिथे परतण्याची परवानगी दिली असती तरीही गांधी घरी परतले असते आणि आपल्या अनुयायांचे नैतिक धैर्य कसे आणि किती काळ टिकवायचे हे काही त्यांना उमगले नसते.

१९०३ मध्ये डेली टेलिग्राफच्या जोहान्सबर्गच्या पत्रकाराने असे म्हटले होते, की 'लॉर्ड मिल्नर यांनी भारतीयांचा निवासी प्रदेश मर्यादित करून देण्याने वादावादीला जे तोंड फुटेल, त्याचे लोण ट्रान्सवालपुरते मर्यादित राहणार नाही, तर ते इंग्लंड आणि भारतापर्यंत पोहोचेल.' १९०७ साली नाताळ मर्क्युरीने लिहिले, ''जनरल स्मट्सच्या आडमुठ्या वर्तणुकीमुळे पूर्वी कधीही झाले नसतील असे परिणाम होणार आहेत. इथे आणि भारतामध्येसुद्धा'' ही दोन्ही विधाने आगामी घटनांची चाहूल देणारी ठरली. मिल्नर किंवा स्मट्स यांपैकी एकाने जरी गांधींबरोबर अगोदरच तडजोड केली असती, तर सत्याग्रहाची व्यूहरचना व तंत्र विकसित करण्याची संधीच गांधींना मिळाली नसती आणि त्यांच्यात असा आत्मविश्वासही निर्माण झाला नसता, की भारतासारख्या प्रचंड आणि बहुविविधता असलेल्या देशात ते उपयोगी ठरू शकते. ब्रिटिश साम्राज्यवादी आणि बोअर्स यांच्या उद्दाम व उद्धट वृत्तीने गांधींना दक्षिण आफ्रिकेत समुदायाचा नेता म्हणून पुढे येण्याची संधी प्राप्त झाली आणि यथाक्रमात ते आपल्या मातृभूमीतही लोकांचे पुढारी बनले.

दक्षिण आफ्रिकेतच गांधी एक उत्तम, संपादक आणि लेखक बनले. त्याची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली होती हे तर खरेच. तिथे त्यांच्या शाकाहारी मित्रांनी त्यांना आपल्या नियतकालिकात लिहिण्यासाठी पूर्ण मोकळीक दिली. नाताळमधील सुरुवातीच्या वर्षांमध्ये गांधींनी वृत्तपत्रे, सरकारला केलेले अर्ज-विनंत्या, याद्वारे प्रचंड प्रमाणावर पत्रलेखन केले. १९०३ साली त्यांनी स्वत:चे नियतकालिक ''इंडियन ओपिनियन'' सुरू केले. त्याचा उद्देश वस्तुस्थितीची नोंद घेणे हा होता, तसेच राजकीयही होता. या नियतकालिकातून गांधी स्वत:चा नव्हे, तर नाताळ आणि ट्रान्सवालमधील भारतीयांचा विकास साधू इच्छित होते. गांधींनी त्यासाठी गुजराथी आणि इंग्लिशमध्ये खूप लेखन केले. प्रत्येक आठवड्याच्या अंकावर त्यांचे लक्ष असे. अर्थसाहाय्याची जबाबदारी प्रामुख्याने गांधींवरच होती.

लेखक आणि संपादक म्हणून गांधींचे कौशल्य चांगलेच होते. परंतु एक सार्वजनिक वक्ता म्हणून त्यांचे कौशल्य अगदीच सुमार होते. नुकसानकारक नव्हते, पण आकर्षकही नव्हते. त्यांचे मित्र जोसेफ डोक म्हणतात त्यानुसार खुद्द जोहान्सबर्गमध्ये त्यांच्यापेक्षा त्यांच्या देशबांधवांचे वक्तृत्व सहजसुंदर आणि ओघवते होते. गांधी खालच्या आवाजात एकच एक स्वरात बोलत असत. डोक लिहितात, 'ते काही हातवारे करत नसत, आणि क्वचितच बोटांची हालचाल करायचे.'[१४] तरीही भारतीय लोक त्यांचे भाषण लक्षपूर्वक ऐकत असत. कारण त्यांच्या आवाजात काही चढउतार नसले, तरी एक ठाम निश्चय व विचार त्यातून व्यक्त होत असे. गांधींवर असलेली भक्ती ही काही त्यांच्या भाषणांमुळे किंवा लेखनामुळे निर्माण होत नव्हती, तर त्यांचे आदर्श, आत्यंतिक साधेपणा, कठोर परिश्रम आणि विलक्षण धैर्य यांमुळे निरनिराळ्या पार्श्वभूमींचे लोक त्यांच्याकडे आकर्षित होत असत; मग ते मुस्लीम असोत, ज्यू किंवा ख्रिश्चन असोत, वा तामीळ, व्यापारी वा फेरीवाले, धर्मगुरू वा करारबद्ध मजूर असोत. वेगवेगळ्या पार्श्वभूमींच्या व्यक्तींवर प्रभाव टाकून त्यांनी प्रथम एक नैतिक संघटना तयार केली आणि त्यापाठोपाठ राजकीय संघटना उभी केली. त्या संघटनेचे सदस्य गांधींच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली दारिद्र्य पत्करायला आणि तुरुंगात जायला तयार झाले.

गांधींच्या मित्रांची त्यांच्यावरची निष्ठा उल्लेखनीय होती. एल. डब्ल्यू. रिट्च यांच्यासाठी ते एक 'मोठे' छोटे प्रमुख होते. हेन्री पोलाकने महिनोन् महिने बायको-मुलांपासून दूर राहून अनोळखी प्रदेशांचा प्रवास केला, तो केवळ गांधींबद्दलच्या आदरामुळे आणि त्यांच्या उद्दिष्टांसाठी, उत्साहाने फुरफुरणारी सोन्जा श्लेशेन गांधींची कचेरी चालती ठेवण्यासाठी संपूर्ण दिवस काम करत असे. त्याच वेळी तामीळ स्त्रियांना दिलासा देण्यासाठी व त्यांच्या नवऱ्यांना तुरुंगात अन्न पाठविण्यासाठी वेळ काढत असे. आणि त्यासाठी तिच्याकडे भरपूर ऊर्जा असायची. तिथे हरमान कालेनबाखही होते. त्यांची तर निष्ठा परिपूर्ण होती आणि त्यांचे मन गांधींविषयी पूर्णपणे नि:शंक होते.

गांधींच्या अंतर्गत वर्तुळात असलेली त्यांच्याविषयीची भक्ती कालेनबाखने छगनलालला जुलै १९११ मध्ये लिहिलेल्या पत्रात व्यक्त झाली आहे. कालेनबाख त्यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी युरोपला निघाले होते. आपल्या अनुपस्थितीत त्यांनी छगनलालला 'या माणसाच्या उजव्या हातासारखे काम कर, कारण त्याने आपल्याला इतके मनोहर जीवन बहाल केले आहे की आपण सर्वच त्याला चिकटून राहण्याच्या प्रयत्नात असतो,' असे लिहिले होते. 'गांधी अथकपणे इतके पुढे जातात, कालेनबाख म्हणतात, 'इतक्या झपाट्याने की लोकांना त्यांच्याबरोबर चालणे अशक्य होते.' तरी, 'आपण जेव्हा शांत आणि स्वस्थपणाचे क्षण अनुभवत असतो, तेव्हा आपण त्यांच्या हृदयात प्रज्वलित झालेला अग्नी पाहून प्रमुदित झाल्याशिवाय राहत नाही. कारण आपल्याला सातत्याने विझू पाहणारी मेणबत्ती पुन्हा पुन्हा पेटविण्याची आवश्यकता भासते. आपण त्यांच्याबरोबर आहोत आणि काम करत आहोत हे आपले महद्भाग्य आहे, याची जाणीव ठेवू या.'[१५]

ज्यांनी गांधींबरोबर फारसा काळ घालवलेला नव्हता, तेही त्यांच्या उदाहरणाने प्रेरित झाले होते. १९०७ ते १९१० या काळातील गांधींची ट्रान्सवालमधली सर्वात उल्लेखनीय कामगिरी म्हणजे

जवळजवळ ३,००० भारतीयांनी तुरुंगवास पत्करला. त्यांत या वसाहतीमधले भारतीय ३५ टक्के होते. सप्टेंबर १९०६ मध्ये गांधींचे वकीलमित्र आर. ग्रेगोरोव्हस्की यांनी सविनय सत्याग्रह करू नये, असा सल्ला दिला होता. ''सत्याग्रहात भाग घेण्यासाठी जी हौतात्म्याची मानसिकता असावी लागते ती फारच थोड्या लोकांमध्ये आढळते आणि आशियाई लोक काही त्याला अपवाद नाहीत.'' प्रत्यक्षात घडले असे की, हजारो भारतीयांना गांधींच्या कायदा धुडकावून लावण्याच्या आवाहनाने प्रेरणा मिळाली आणि ते तुरुंगात गेले.

याची नोंद घेतली पाहिजे, की या सत्याग्रहामध्ये व्यापारी मोठ्या संख्येने होते. व्यापारी वर्ग अगदी सावधचित्त व परंपरावादी असतो. भारतीय व्यापारी तर खासकरून (काही जण म्हणतील, त्यातही गुजराथी व्यापारी) एकेकटे असोत अथवा सामूहिक, व्यापाऱ्यांना राजकीय धोका पत्करणे आणि अधिकृत सत्ताधाऱ्यांना आव्हान देणे पसंत नसते.[१६]

गांधी एका वासाहतिक संदर्भात व्यापाऱ्यांना संघटित करत होते. ते व्यापारी त्यांच्या मातृभूमीपासून दूर राहात होते. अशा परिस्थितीत कोणीही अशीच अपेक्षा केली असती की ते घाबरणे स्वाभाविकच होते. आणि तरीही आपल्या नेत्यामागोमाग ते तुरुंगात गेले. त्यानंतर फेरीवाले, कामगार आणि व्यावसायिकही तुरुंगात गेले. तेही या भूमीत परदेशी होते आणि या नात्याने इतक्या अनिश्चित स्वरूपाच्या संघर्षात आपल्या रोजी-रोटीचा त्याग करून तुरुंगात जायला त्यांनी काचकूच केली असती तर तेही स्वाभाविकच मानले गेले असते.

भारतीयांनी हा सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला, कारण त्यांना हे माहीत होते, की आपला नेता आपल्या उद्दिष्टासाठी केवळ तुरुंगात जायला तयार होता असे नाही, तर त्यासाठी मरणसुद्धा पत्करायची त्याची तयारी होती. जानेवारी १८९७ मध्ये गांधींवर हल्ला झाला होता आणि त्या हल्ल्यात ते ठार होऊ शकले असते. त्यानंतर केपटाऊनमधल्या एका गुजराथी मच्छीमाराने त्यांना पत्र लिहिले. त्या पत्रात गांधींच्या एकट्याच्या शर्थीच्या प्रयत्नांची आणि भारतीय भोगत असलेल्या त्रासाचे धैर्यशील प्रतिनिधित्व करण्याची स्तुती केली होती. या पत्रलेखकाला या गोष्टीचे दु:ख झाले होते, की 'इथल्या पागल झुंडीने त्यांना अशी क्रूर वागणूक द्यावी... इथल्या वृत्तपत्रात त्याची बातमी दिली होती.' त्याने पुढे लिहिले होते, 'इथले (केपमधले) हजारो भारतीय त्यांच्याकडे डोळे लावून आहेत आणि तुम्ही जे करत आहात त्याबद्दल सहानुभूती बाळगून आहेत.'[१७]

१८९७ साली दरबानमध्ये ज्यांनी गांधींवर हल्ला केला होता ते गौरवर्णीय कामगार होते. त्यानंतर ११ वर्षांनी पुन्हा एकदा गांधींवर हल्ला झाला. या वेळी तो जोहान्सबर्गमध्ये पठाणांच्या एका गटाने केला होता. पुन्हा एकदा त्यांच्या शांतिपूर्ण वर्तनामुळे आणि दृढ निश्चयामुळे जे भारतीय या वेळेपावेतो त्यांच्या प्रभावाखाली आले नव्हते आणि त्यांच्या चळवळीत नव्हते, तेही त्यांच्याभोवती जमा झाले. गांधींचा जीव घेण्याचे हे दोन प्रयत्न आणि त्यांना गांधींनी दिलेले तोंड यामधून गांधींचे त्यांच्या समाजातील स्थान निश्चित झाले.

त्यानंतरही गांधी त्यांना दिल्या गेलेल्या धमक्यांना तटस्थपणे सामोरे गेले. १९०९ साली जोहान्सबर्गमध्ये काही पठाण पुन्हा एकदा त्यांच्यावर हल्ला करण्याच्या तयारीत होते. त्यांनी आपला पुतण्या मगनलालला सांगितले, ''मी मरणाला भीत नाही. उलट माझ्याच देशबांधवांच्या हातून मला मरण येणार असेल तर मी त्याचे स्वागतच करेन. कारण त्यातून हिंदू आणि मुसलमानांची एकजूट होईल.''[१८]

'गांधी', त्यांच्या सहकाऱ्यांना माहीत होते की 'एक किरकोळ प्रकृतीचे (पण) कणखर व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ होते.' एक दारू पिणारा, मांसमच्छी खाणारा पत्रकार म्हणतो की, 'या दारूला न शिवणाऱ्या आणि मांसमच्छी न खाणाऱ्या गृहस्थाचे अनपेक्षित धैर्य आणि आंतरिक प्रेरणेनेच संघर्ष करण्याची कुवत थक्क करणारी आहे.' १९६० च्या दशकात गुजराथी मुख्याध्यापकाने ज्या मोहनदासची शाळेची गुणपत्रके राजकोटमध्ये शोधून उजेडात आणली आणि त्यात शाळेतली गैरहजेरी, उदासीनता किंवा अलिप्तता आपल्याला दाखवून दिली, तीच व्यक्ती आता सर्वात अधिक आदरणीय व्यक्ती बनलेली दिसते. 'गांधीजींबद्दल आता जे लिहिले जाते ते योग्यच आहे.' या शिक्षक - कार्यकर्त्याने लिहिले, 'ते साध्या मातीतून नायक घडवू शकत होते. त्यांचा सर्वात पहिला यशस्वी प्रयोग त्यांनी स्वत:वरच केला होता, यात शंका नाही.'[१९]

गांधींनी भारताच्या बाहेर जी वर्षे व्यतीत केली त्यांतून क्रमाक्रमाने आणि नंतर निर्णायक रीतीने त्यांनी व्यवसायाकडे पाठ फिरवली. त्यांना राजकोट आणि बॉम्बेमध्ये खटले मिळाले असते, तर ते कधीच दरबानला गेले नसते. दक्षिण आफ्रिकेत ते व्यवसायात चांगले यशस्वी झाले होते. पण हळूहळू त्यांचे कायदेशीर कामकाज पैशासाठी कमी पण भारतीय बांधवांना मदत म्हणून अधिकाधिक चालायला लागले. ज्या व्यवसायाचे शिक्षण त्यांने घेतले होते, त्या व्यवसायापासून ते अधिकाधिक दूर जाऊ लागले आणि शेवटी त्यांनी तो आपले सहकारी एल. डब्ल्यू. रिट्च आणि हेन्री पोलाक यांच्यावर सोपविला. याच काळात त्यांनी आपल्या जीवनात साधेपणाची सुरुवात केली. गरजा कमी केल्या. शहरातले घर सोडून ते शेतावरील घरात राहायला गेले. वर्षानुवर्षे त्यांनी संन्यस्त, कामात पूर्ण बुडून गेलेले आयुष्य घडवायला सुरुवात केली. सुख व चैन आणि आराम यांकडे दुर्लक्ष केले. दारू नाही, मांस नाही आणि अर्थातच साखर आणि मसालेही नाहीत - हे तर आपल्याला विसरताच येणार नाही, की त्यांच्या जीवनात खेळ किंवा विरंगुळा याला जागाच नव्हती.

आधुनिक जीवनाची चव घेणाऱ्या माणसाला गांधींचा साध्या जीवनातील शाश्वत रस, शाकाहार, औषधोपचाराच्या नैसर्गिक पद्धती, खासकरून ब्रह्मचर्य यांविषयी कौतुक वाटणे अवघड आहे. काय खावे आणि काय खाऊ नये याबाबत इतके अवडंबर माजवायचे काय कारण आहे? त्याबाबत तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टी बाळगता येणार नाही का? आणि ॲलोपॅथीचा मार्ग स्वीकारून गोळ्या, शस्त्रक्रिया यांचा मार्ग स्वीकारता आला नसता का? नैसर्गिक

उपचार, तेही स्वत:च बनविलेल्या मिश्रणातून किंवा अप्रशिक्षित वैदूंकडून शिकून कशासाठी करून घ्यायचे? आणि ब्रह्मचर्यामध्ये इतकी व्यग्रता कशासाठी? शरीरसुख हा एक जीवनातील आनंद आणि सुखाचा मार्ग नाही काय? विशेषकरून स्वत:च्या पत्नीबरोबर शरीरसुखाचा अनुभव घेण्याने खऱ्याखुऱ्या शाश्वत प्रेमाचा लाभ होत नाही काय?

खरे पाहता गांधींच्या समकालिनांना या प्रश्नांबाबत फारसे कौतुक नव्हतेच. अगदी त्यांच्या मित्रांनासुद्धा त्याचे कौतुक नव्हते. मिली पोलाकने 'गांधी द मॅन' हे पुस्तक लिहिले. त्यात गांधींचा उल्लेख नेहमीच प्रेमोदराने केलेला आहे. त्यातून आपल्याला बऱ्याच आंतरिक भावनांचे दर्शन घडते. आणि दक्षिण आफ्रिकेमधील त्यांचे सामूहिक जीवन समजून घेण्यासाठी ते पुस्तक अटळ आहे. तरीही मिली पोलाक आपल्या या सुहृदाच्या चमत्कारिक जीवनमार्गांबद्दलचे आपले कुतूहल झाकून ठेवू शकली नाही. हेन्री पोलाकची तर गांधींवर - बडा भाईच्या राजकारणावर सखोल भक्तीच होती. पण त्यांच्या सामाजिक व नैसर्गिक तत्त्वज्ञानाचे त्याला मुळीच आकर्षण वाटले नव्हते. मिली आणि हेन्री पोलाक हे दोघेही फिनिक्स आणि टॉलस्टॉय शेतावर फार काळ राहिलेही नव्हते. आणि त्यांनी स्टीमबाथ (बाष्पस्नान) किंवा चिखलाचे लेप यांचा अवलंब कधी केला नव्हता आणि ब्रह्मचर्यपालनाचा तर कधीही साधा विचारही केला नव्हता. काही लोकांना तेव्हा (आणि आजही) गांधींची संन्यस्त, साधी राहणी, आहाराविषयीची चमत्कारिक व्यग्रता, आजारी असतानाही गोळ्या वगैरे ॲलोपॅथिक औषधे न घेणे, शरीरसुखापासून दूर राहणे, या गोष्टी मान्य करणे आणि समजून घेणे कठीणच जाते. पण गांधींचे राजकीय तत्त्वज्ञान मान्य असेल तर पोलाकप्रमाणे अनेकांनी त्या विचित्र वाटणाऱ्या जीवनशैली 'फॅड' म्हणून बाजूला सारल्या. ज्यांचा गांधींच्या राजकीय तत्त्वज्ञानाबाबतच मतभेद होता. त्यांनी गांधींच्या या स्थगितीमुळे त्यांचा जागतिक दृष्टिकोन या आधुनिक -जगासाठी किती कालबाह्य आहे हे दिसून येते, असे मत व्यक्त केले आहे. सुप्रसिद्ध भारतीय कम्युनिस्ट ई. एम. एस. नंबुद्रिपाद यांनी गांधी कायद्याचे विद्यार्थी असतानाच्या काळात लंडन शाकाहारी संस्थेतील त्यांच्या सहभागाबद्दल लिहिताना असे मत व्यक्त केले होते, की ते गांधींच्या अत्यंत प्रतिगामी सामाजिक दृष्टिकोनाचे ढळढळीत उदाहरण असून गांधींच्या एकूण सर्वच व्यवहारात मार्गदर्शक ठरले होते. नंबुद्रिपाद पुढे म्हणतात,

ज्या वेळी गांधी एक तरुण बॅरिस्टर म्हणून 'व्हेजिटेरियन' साठी लेख लिहीत होते, त्या वेळी लेनिनही एक तरुण वकील असून मार्क्स, सिडने वेब इ. चे लेखन भाषांतरित करत होते आणि स्वत: 'डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटिलझम इन रशिया' हा ग्रंथ लिहीत होते. लेनिनने लढाऊ कामगारवर्गीय जनचळवळींची गाठ सर्वात प्रगत अशा तात्त्विक भूमिकेशी बांधली. पण गांधींनी मात्र विद्यमान जगात प्रचलित असलेल्या अत्यंत प्रतिगामी, मागासलेल्या आणि गूढवादाचा आसरा घेणाऱ्या तत्त्वज्ञानाशी आपल्या लोकचळवळीची गाठ बांधली.'[२०]

विसाव्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत मार्क्सवादाकडे लोकांना आकर्षित करण्याची विलक्षण ताकद होती. जगातील सुशिक्षित तरुण पिढी मार्क्सवादाकडे भविष्याचा मार्ग आणि भवितव्याची लाट म्हणून पाहात होती. (एके काळी मार्क्सवादी असलेला फ्रेंच बुद्धिवादी आणि नंतर मार्क्सवादाचा टीकाकार झालेला रेमंड आरन असे म्हणतो, की 'मार्क्सवाद ही बुद्धिवाद्याची अफू आहे.') हीच माणसे त्यांना गांधी माहीत असतील किंवा गांधींबद्दल काही माहीत असेल, तर गांधींना एक प्रतिगामी गूढतत्त्ववादी समजतात. कारण गांधींनी धर्मनिरपेक्ष वैज्ञानिक परिभाषेऐवजी धार्मिक परिभाषा वापरली होती आणि भौतिक गरजांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रचार केला होता. त्यांनी काही आधुनिकतेपोटी मोठमोठी आश्वासने देण्याचे स्वागत केले नव्हते. त्यांनी लढाऊ, पुरुषी बाण्याच्या सशस्त्र लढ्याचा पुरस्कार न करता त्याऐवजी मवाळ, थोडेसे घाबरटपणाचे लक्षण म्हणता येईल असा साधारण सत्याग्रहाचा पुरस्कार केला.

१९५५/१९५६ च्या हिवाळ्यात प्रथमच नंबुद्रिपादांचा गांधी आणि गांधीवाद ठामपणे झटकून टाकण्याविषयीचा प्रबंध प्रकाशित झाला. त्यांच्या नंतरच्या वर्षात क्रुश्चेव्हने सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या २० व्या काँग्रेससमोर भाषण केले आणि लेनिन व त्यांचा वारस स्टालिन यांच्या सर्वात पुरोगामी तत्त्वज्ञानाच्या खुनशी परिणामाची कबुली दिली. त्यानंतरच्या दशकांमध्ये मार्क्सवादाच्या प्रतिमेवर अनेक हल्ले झाले, गुलागमधील वृत्त, मानवी शिरकाण आणि अल्पसंख्याकांबाबतची अमानुष दडपणूक, कम्युनिस्ट राजवटीमुळे प्रचंड प्रमाणावर पडलेले दुष्काळ, या साऱ्यामुळे गांधीवादाला 'प्रतिगामी' म्हणून झटकून टाकत असतानाच मार्क्सवादाला 'प्रगतिशील' म्हणणे काही तितकेसे सोपे राहिलेले नाही.

पण आपण पश्चातबुद्धीने परस्परविरोधी तत्त्वज्ञानांचा विचार करू या नको. आपण गांधींचे सत्याचे प्रयोग त्यांना जसे दिसले वा भासले तसे पाहण्याचा प्रयत्न करू या. त्यांना ती विशुद्ध आणि अर्थपूर्ण जीवनाकडे नेणारी पावले आहेत असे वाटत होते. त्यांचे आहारविषयक प्रयोग, यंत्रावरील अवलंबित्व कमी करण्याचे प्रयत्न, डॉक्टरांवरील अवलंबित्व कमी करण्याचे प्रयत्न, ब्रह्मचर्यपालन हे सर्वकाही इच्छाशक्ती वाढविण्याचे आणि दृढनिश्चयी होण्याचे मार्ग होते. गांधींचे गुरू टॉलस्टॉय म्हणतात, 'शरीरसुख आणि विलासी अन्न यांच्या आधाराने उद्दीपन करण्याच्या गरजेवर मात करणे आणि त्यायोगे नीच इच्छांवर विजय मिळविणे, या मार्गाने गांधी इतरांसाठी जगण्याची तयारी आणि स्वत:साठी उच्चतम मूल्यांसाठी जगण्याची स्वत:ची तयारी करून घेत होते.' ते अतिशय कमी खात - तेही केवळ फळे आणि भाज्या. त्याही मीठ आणि साखर वा मसाले न घालता. आपण किती वेळा शरीरसुख घेतो - तेही पत्नीबरोबर (किंवा इतर कोणाबरोबरही) याची त्यांना पर्वा नसली, त्यांचा पेहराव साधा असला आणि त्यांच्याकडे मालमत्ता नसली, जडजवाहिर नसले, तरी ते अगदी सहजगत्या तुरुंगातील जीवन कवटाळू शकत असत. त्यांनी अगदी तन-मन-धन लावून नाताळ आणि ट्रान्सवालमधल्या आपल्या दडपलेल्या भारतीय बांधवांसाठी सर्व काही समर्पित केले होते.

गांधींचा विविध धर्मनिष्ठाचा शोध, त्यांचे वैयक्तिक व सामाजिक नातेसंबंध लेखक आणि संपादक म्हणून कार्य, व्यावसायिक नैपुण्य, जीवनशैलीच्या निवडी हे सर्व एका अर्थाने थोड्याफार प्रमाणात दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या कार्यापुढे दुय्यम होते. पण हे काही एकाएकी घडले नव्हते. गांधींनी दक्षिण आफ्रिकेत जी २० वर्षे व्यतीत केली, त्या काळात त्यांची व्यक्तिगत निवड आणि कल क्रमात बाजूला सारून सामाजिक निष्ठेला प्राधान्य मिळत गेले.

त्यांनी लंडनमध्ये विद्यार्थी म्हणून जो वेळ व्यतीत केला त्यातून त्यांनी क्रमाक्रमाने जाण्याची पद्धत आत्मसात केली असावी. त्यांचे एकेकाळचे सहवर जोशुआ ओल्डफील्ड यांनी असे निरीक्षण नमूद केले होते, की ''शाकाहारी मित्रांमुळे गांधींना एक प्रकारे उत्तम प्रशिक्षण मिळाले आणि त्यातून गांधी ही गोष्ट शिकले की तुम्ही शांतपणे पाठपुरावा करत राहिलात तर लोकांच्या मनात कितीतरी अधिक बदल घडवून आणू शकता, जो तुम्हाला भाषणबाजी आणि गाजावाजा करून आणता येत नाही.''[२१]

हेन्री सॉल्ट हे खरे पाहिले असता गांधींचे पहिले मार्गदर्शक होते. (ते तर गांधींना रायचंदभाईच्याही अगोदर भेटले होते.) ते म्हणाले होते की, 'तुम्हाला जर काही सुधारणा हवी असेल तर, 'मला मिळणार असेल तर सर्वच हवे, नाही तर काहीच नको' अशी भूमिका घातक ठरू शकते. सुधारणा क्रमाक्रमानेच घडते, एका झटक्यात कधीच काही होत नाही. त्याचप्रमाणे वैयक्तिक सुधारणेबाबतही गांधींची भूमिका एका वेळी एकच पाऊल उचलायचे अशीच होती. सामाजिक कार्याची विश्वपत्रिकाही एका वेळी एक पाऊल उचलायचे अशीच होती. त्यांना या गोष्टीची जाणीव होती, की व्यक्ती कधीही पूर्णत्वाला पोहोचू शकत नाही. पण तरीही त्यांनी वंशभेद आणि राष्ट्रीय भेदाभेद बाजूला सारून समता साधण्याचे आपले अंतिम सामाजिक उद्दिष्ट नजरेआड होऊ दिले नाही.

गांधींचे मित्र एल. डब्ल्यू. रिट्च यांना गांधींचे हे क्रमाक्रमाने जाण्यामागील व्यावहारिक मूळ चांगलेच आकलन झाले होते. त्यांना एकदा कोणीतरी विचारले, की 'भारतीय लोक ताबडतोबीने मतदानाचा हक्क का मागत नाहीत?' तेव्हा रिट्चने असे उत्तर दिले होते, की 'दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णीय व वंशीय लोकांची मानसिकता आणि स्वभाव असा आहे, की अशा प्रकारची कोणतीही मागणी त्यांच्या दैनंदिन, व्यावहारिक राजकारणात बसलीच नसती.' पुढे ते म्हणाले, की 'तरीही आजचे आदर्श हे उद्याचे व्यावहारिक राजकारण बनत जाईल आणि नंतरच्या पिढ्यांमधील मुले आपल्या पूर्वीच्या पिढीने किती संकुचित दृष्टीकोन बाळगला होता याकडे विस्मयचकित होऊन पाहत राहतील.'[२२]

गांधींनी ज्या वेळी अन्याय कायदे व कर आणि संचारस्वातंत्र्य व व्यापाराचे स्वातंत्र्य आदी बाबतींत संघर्ष सुरू केला, तेव्हा भारतीयांना समान नागरिकत्व वा मतदानाचा हक्क देण्याविषयीच्या मागण्या केल्या नव्हत्या. विसाव्या शतकातील सुरुवातीच्या वर्षांमध्ये दक्षिण आफ्रिकेत गौरेतर लोकांना सर्व प्रकारचे समान हक्क द्या, अशी मागणी करणे अकाली ठरले असते.

तरीही गांधींना असा विश्वास वाटत होता, की कालांतराने अशी समानता प्रस्थापित होईल. त्यांनी (मे १९०८ मध्ये केलेल्या भाषणात) असे म्हटले होते. 'सत्ताधारी एक ना एक दिवस ही गोष्ट मान्य करतील की सर्व प्रजाजनांना त्यांच्याइतक्या समानतेच्या पातळीवर आणणे आवश्यकच आहे आणि त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन स्वतंत्र व्यक्तीचे स्थान देणे आवश्यक आहे.' त्यानंतर सहा वर्षांनी दरबानला युरोपियनांचा निरोप घेताना गांधींनी त्यांना सांगितले, की दक्षिण आफ्रिकेतील गौरेतर लोकांना संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगता येण्याविषयीच्या मागण्या ते कायमच्या पुढे ढकलू शकणार नाहीत.

गांधींचा राजकीय विचार जसजसा घडत गेला तसतसा त्यांचा माणसे घडविण्याच्या आपल्या क्षमतेवरील विश्वासही वाढत गेला. १९०३ आणि १९०४ साली गांधींनी लॉर्ड मिल्नरना लिहिलेली पत्रे अतिशय विनम्र भाषेत लिहिली होती. त्यानंतर काही वर्षांतच हे बदलले. गांधींनी जनरल स्मट्सना लिहिलेली पत्रे जरी विनम्र भाषेत असली, तरी त्यांत खूपच ठामपणा आणि विश्वास प्रतीत होत होता. त्यांच्याशी बोलणी करताना ते एका समुदायाच्या नेत्याने दुसऱ्या समुदायाच्या नेत्याशी बोलावे तसे बोलत होते. पण एक गोष्ट निश्चित की, अशा प्रकारची समपातळी अभिप्रेत असली तरी समानता त्यात गृहीत धरलेली नव्हती. कारण गौरवर्णीय समाज राजकीयदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या अजूनही वरचढ व प्रभावी समाज होता. तरीही गांधींच्या स्मट्सला लिहिलेल्या पत्रांमधून जो आत्मविश्वास व्यक्त होतो तो स्पष्टपणे दृग्गोचर होतो. इतक्या भारतीयांनी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला होता आणि तुरुंगवास पत्करला होता याचीच ती पावती होती.

गांधींमधील ह्या राजकीय व वैयक्तिक जडणघडणीच्या प्रक्रियेला समांतर अशी परस्परविरोधी संस्कृती आणि सांस्कृतिकता यांविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनाची जडणघडणही चालू होती. गांधी जेव्हा दक्षिण आफ्रिकेला प्रथमत: गेले, तेव्हा ते एक साम्राज्याचे निष्ठावान प्रजाजन होते आणि ब्रिटिश न्याय आणि ब्रिटिश संस्था (आपल्यापेक्षा) श्रेष्ठ आहेत, अशी त्यांची धारणा होती. त्यांचा पेहराव आणि मानसिक जडण-घडण आंग्लाळलेल्या पौर्वात्य व्यक्तीप्रमाणे होती. ते एक आधुनिक गृहस्थ होते आणि त्यांना युरोपियन आधुनिकता स्वाभाविक वाटत होती. टॉलस्टॉय आणि रस्किनचे ग्रंथ वाचण्याने आणि रायचंदभाईंचे पुन्हा पुन्हा वाचन करण्याने त्यांनी आपल्या जीवनविषयक वैचारिक बैठकीचा पुनर्विचार करायला सुरुवात केली. ग्रामीण विरुद्ध शहरी, शेती विरुद्ध उद्योग आणि शेवटी पौर्वात्य विरुद्ध युरोपियन पाश्चिमात्य अशा विभागणीत ग्रामीण, शेती आणि पौर्वात्य यांची बाजू घेण्यात त्यांना आनंद वाटायला लागला. लंडनमध्ये वकिली शिकलेला हा बॅरिस्टर अधिकाधिक भारतीयासारखा विचार करायला लागला आणि अधिकाधिक भारतीयही दिसायला लागला. १९१३ च्या सत्याग्रहानंतर त्यांनी भारतीय शेतकऱ्यांचा घरात तयार केलेल्या खादीचा पेहराव स्वीकारला. त्याला समांतर असे भारतीय शेतकऱ्याच्या पेहरावाचे वर्णन त्यांनी त्यांच्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात केले होते.

❐

# नेहरूंची अखेर

■ सुरेश द्वादशीवार

काँग्रेस पक्षाने २ फेब्रुवारी १९५९ रोजी इंदिरा गांधींची आपल्या अध्यक्षपदी निवड केली. तेव्हा प्रत्यक्ष नेहरूंनीच त्यांच्या निवडीचा घाट घडवून आणला, अशी टीका अनेकांनी केली. ती तशी होणे स्वाभाविकही होते. प्रत्यक्षात त्या निवडीवर नेहरू मनातून नाखूश होते. तोपर्यंतचे पक्षाचे अध्यक्ष गुजरातचे उच्छंगराय ढेबर हे निवृत्त झाले होते आणि त्यांच्या जागेवर दक्षिणेतील एका ज्येष्ठ नेत्याची निवड व्हावी, असे पक्षातील अनेकांसोबतच नेहरूंच्याही मनात होते. त्यासाठी तेव्हा मद्रासचे अर्थमंत्री सी. सुब्रह्मण्यम यांचे नाव अनेकांसमोर होते. परंतु त्यांना आपल्या मंत्रिमंडळातून जाऊ द्यायला मुख्यमंत्री के. कामराज तयार नव्हते. शिवाय आपण हाती घेतलेली कामे अर्धवट सोडून पक्षाध्यक्षपदाची जबाबदारी घ्यायला सुब्रह्मण्यमही राजी नव्हते. अनेक नावे त्या पदासाठी तेव्हा पुढे आली; पण अध्यक्षपद, पक्ष व सरकार यांच्यात एकवाक्यता आणि संवाद राखू शकेल, असे नाव पक्षाला हवे होते. तेव्हा केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी इंदिरा गांधींचे नाव त्यासाठी सुचविले. त्याआधी अर्थातच त्यांनी त्याला नेहरूंची नाइलाजाची संमती मिळविली होती. ''मी पंतप्रधान असताना इंदिराने पक्षाध्यक्ष व्हावे, हे फारसे चांगले नाही.'' असे ते जाहीररीत्या तेव्हा म्हणालेही. स्वत: इंदिरा गांधीही ते पद घ्यायला फारशा उत्सुक नव्हत्या. त्यांचे पती फिरोज गांधी आणि त्यांच्यात दुरावाही येत होता. मुले शिकत होती आणि प्रत्यक्ष नेहरूंची व त्यांच्या तीन मूर्ती भवन या निवासस्थानाची सारी जबाबदारी त्यांच्यावर होती. पंतांनी त्यांचे मन वळविले व त्यांना ते पद घ्यायला लावले.

त्या वेळी मात्र नेहरू म्हणाले, ''इंदिरा माझी मुलगी आहे. स्वाभाविकच माझे तिच्यावर प्रेम आहे. तिच्या कार्यक्षमतेवर माझा विश्‍वास आहे. ती सुस्वभावी व सत्यप्रिय आहे. हे गुण तिने बहुधा तिच्या आईकडून घेतले असावेत.''

इंदिरा गांधींची अध्यक्षपदाची कारकीर्द अवघी अकरा महिन्यांची. पण प्रचंड घडामोडींनी भरलेली व त्यांच्या कार्यशक्तीची परीक्षा घेणारी ठरली. नेहरू म्हणाले, ''आरंभी ती माझी सल्लागार व मैत्रीण होती. आता ती माझी नेता झाली आहे.'' पक्षाच्या एका बैठकीत दक्षिणेतील एक प्रतिनिधी त्यांचे म्हणणे मांडत असताना नेहरू अस्वस्थ होऊन उभे राहिले व त्यांना थांबवीत बोलू लागले, तेव्हा इंदिरा गांधींनी त्यांनाही आपल्या अध्यक्षपदाचा हिसका दाखवून त्यांना खाली बसायला लावले आणि ''त्या प्रतिनिधींचे म्हणणे सभागृहाला ऐकू द्या'' असा दमच त्यांनी नेहरूंना दिला.

त्याआधीही १९५४, ५६ व ५८ या तीन वर्षांत त्यांनी नेहरूंना पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची सूचना केली होती. सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप होत होते. अनेक मंत्र्यांविरुद्ध तशा तक्रारी वृत्तपत्रातून प्रकाशित होत होत्या. स्वत: फिरोज गांधीही अशा मंत्र्यांचे चेहरे लोकांसमोर आणत होते. (त्या आधी मंत्र्यांसाठी आचारसंहिता असावी, असा एक ठराव आचार्य शंकरराव देव यांनी १९५० च्या सुमारास काँग्रेसच्या अधिवेशनात आणला होता. त्याला विरोध करीत नेहरू म्हणाले होते. ''ज्यांनी देशासाठी आठ-आठ आणि दहा-दहा वर्षे तुरुंगात काढली, त्यांच्या निष्ठांविषयी संशय घेणे वा त्याची अशी वाच्यता करणे अनाठायी आहे,'' परिणामी, तो ठराव मागे घेतला गेला आणि आता नेहरूंवरच त्यांच्या सहकाऱ्यांच्या 'तशा' बाजूने उभे राहण्याची वेळ आली होती.) त्यांनी १९५८ मध्ये त्यांचा राजीनामा जाहीरही केला. तेव्हा इंदिरा गांधींनी घरातल्या घरातच त्यांना सविस्तर पत्र लिहून 'आता मागे सरू नका', असे बजावले होते. राजीनामा जाहीर करणे व मग तो मागे घेणे हा प्रकार हास्यास्पद ठरणारा आहे, असे त्या पत्रात त्यांनी लिहिले होते.

त्यांनी जगभरचा प्रवास केला होता. ज्या देशांना सहसा कुणी भेटी देत नाही, ते देशही त्यांनी पाहिले होते. त्यांतील नेत्यांशी संपर्क साधला होता. सामान्य माणसांशी व विशेषत: ग्रामीण भागातील स्त्रियांशी बोलणे त्यांना आवडत होते. हीच माणसे आपली परंपरा व संस्कृती टिकविणारी आहेत, असा विश्वास त्यांना होता. आपल्या प्रत्येकच पत्रपरिषदेत ''देशाची गरिबी दूर करणे हा आपला अग्रक्रमाचा कार्यक्रम असला पाहिजे'', असे त्या म्हणत. त्यांची अध्यक्षीय कारकीर्द खरी गाजली ती त्यांनी केरळातील कम्युनिस्टांचे सरकार घालविले तेव्हा. त्या पक्षाने १९५७ च्या निवडणुकीत कॉ. ई. एम्. एस. नम्बुद्रीपाद यांच्या नेतृत्वात तेथे बहुमत मिळविले होते. त्यांची मुख्यमंत्रिपदी निवड केली होती. मात्र ते सरकार अधिकारूढ होताच त्याने केरळचा जुना शालेय अभ्यासक्रम बदलण्याचा आणि त्यात मार्क्स, लेनिन, साम्यवाद व डावा विचार आणण्याचा विचार जाहीर केला. देशाच्या एकूण शैक्षणिक धोरणाला हा प्रादेशिक फाटा होता व तसे होणे देशाच्या एकात्म व निकोप वाढीला मारक ठरले असते. त्यामुळे ते सरकारच बरखास्त करा, असा आग्रह इंदिरा गांधींनी गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांच्याकडे धरला. परंतु जनतेने निवडलेले सरकार असे घालविता येणार नाही, असे सांगून त्यांनी तसे करायला नकार दिला. नंतर तोच आग्रह त्यांनी पंतप्रधानांकडे केला. त्यांनीही त्यांचा नकार त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितला, तेव्हा इंदिरा गांधींनी थेट राष्ट्रपतींची भेट घेऊन त्यांच्यापर्यंत आपली मागणी पोहोचवली.

या काळात इंदिरा गांधींनी केरळला भेट देऊन तेथील वातावरणाची पाहणी केली. त्यांचा अहवाल आल्यानंतर प्रत्यक्ष नेहरूच त्रिवेंद्रमला गेले. तेथील वातावरणातले अस्वस्थपण व त्यात वाढलेली राजकीय तेढ पाहून त्यांनीच नम्बुदीपादांना नव्याने निवडणुका घेण्याचा सल्ला दिला. तो त्यांच्या पक्षाने मनावर घेतला मात्र नाही.

इंदिरा गांधींचे पती फिरोज हे डाव्या विचारांचे होते व कम्युनिस्ट पक्षात त्यांचे निकटचे मित्रही होते. इंदिरा गांधींच्या या कारवाईवर ते संतापले होते. त्या वेळी ''तुझ्याशी लग्न करताना मी जसे साऱ्यांचे वैर घेतले, तसे या प्रश्नावर मी तुझ्याशीही भांडण पत्करेन'' असे इंदिरा गांधींनी त्यांना स्पष्टपणे ऐकविले. हळूहळू त्यांच्या मागणीमागे त्यांचा पक्ष व लोकमतही उभे होऊ लागले. परिणामी, नेहरू व पंत यांचा नाइलाज होऊन त्यांनी नम्बुद्रीपादांचे सरकार बरखास्त केले. त्यासाठी काँग्रेसवर देशात व विदेशातही बरीच टीका झाली. विशेषत: रशियन राज्यकर्ते फार नाराज झाले. पण इंदिरा गांधी खंबीरच राहिल्या.

नेहरूंसोबत तीन मूर्ती भवनात राहिल्याने त्यांना पंतप्रधानपदाचे काम आणि देशाचे राजकारण असे सारेच अवगत होते. नेहरूंसोबत त्या सरकारी दौऱ्यावरही जात. त्यामुळे त्यांना जगाचे नेते, त्यांचे स्वभाव, धोरण आणि राजकारण यांचीही पुरेशी माहिती होती. बांडुंग येथे भरलेल्या तटस्थ राष्ट्रांच्या परिषदेलाही त्या नेहरू, नासेर, टिटो आणि चौ एन लाय यांच्यासोबत हजर होत्या. राजकारणाची शिकवणूक त्यांना लहानपणापासूनच मिळाली होती. नंतरच्या काळात त्या जगाचेही राजकारण आत्मसात करीत गेल्या. त्यांचे धाडस, धिटाई, प्रसंगी समोरच्याशी लढत देण्याचे बळ याही गोष्टी लक्षणीय होत्या. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात या साऱ्याचा अनुभव देश व जगालाही आलाच. हा काळ त्यांनी नेहरूंना दिलेल्या आधाराचाही होता.

चीनच्या आक्रमणानंतर नेहरू मनाएवढेच देहानेही खचले होते. त्यांच्या चालण्यात दोष आला होता. परिणामी, देशात 'नेहरूनंतर कोण?' या प्रश्नाची प्रथम हळू आवाजात व पुढे वृत्तपत्रांतून चर्चा सुरू झाली. पक्षात अनेक नावे पुढे होती. त्यात मोरारजी देसाई होते, लालबहादूर शास्त्री होते, पटनायक होते आणि यशवंतराव चव्हाणही होते. मात्र त्याच वेळी पक्षाच्या एका मोठ्या गटात इंदिरा गांधींच्या नावाचीही चर्चा होती. त्याविषयी पत्रपरिषदेत नेहरूंना विचारणा करण्यापर्यंत पत्रकारांची मजल गेली होती. अशाच एका पत्रपरिषदेत एकाने त्यांना विचारले, ''तुमचा वारसदार कोण असेल?'' त्यावर एका क्षणाचाही विचार न करता नेहरू म्हणाले, ''मी आणखी अनेक दिवस जगणार आहे.'' त्या उत्तरावर पत्रपरिषदेत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

मात्र नेहरूंच्या जीवनातील माळवतीचे दिवस होते. प्रकृती ढासळत होती. चालण्याचा त्रास सुरू झाला होता. महत्त्वाची बाब म्हणजे, त्यांची स्वत:चीच जीवनेच्छा मंदावत चालली होती. विजयालक्ष्मींनी त्यांना एकदा विश्रांतीचा सल्ला या काळात दिला. त्यावर ''कशासाठी? पुन्हा बळ मिळवायचे ते तरी कशासाठी?'' असे उत्तर नेहरूंनी दिले. हळूहळू त्यांना दैनंदिन व्यवहाराशी व राजकीय वातावरणाशी संबंध कमी होत गेला.

नेमक्या त्या काळात देशात झालेल्या लोकसभेच्या तीन पोटनिवडणुकांत आचार्य कृपलानी, डॉ. राममनोहर लोहिया आणि दीनदयाळ उपाध्यक्ष हे त्यांचे कडवे टीकाकार निवडून आले. ''मी या पहाडाला भेग पाडून दाखवीनच'', अशी डॉ. लोहियांची प्रतिज्ञा होती. ते समाजवाद्यांचे, कृपलानी कृषक प्रजा पार्टीचे तर उपाध्याय हे जनसंघाचे प्रतिनिधी होते. त्या तिघांनी नेहरूंविरुद्ध संसदेत व देशात एक जोरदार प्रचारमोहीमच उघडली. नेहरू व त्यांचे पंतप्रधानपद हे त्यांच्या टीकेचे एकमेव लक्ष्य होते. तशात काँग्रेसमधील तरुणांचा वर्ग 'नव्या रक्ताला वाव द्या' अशी मागणी करीत संघटित होत होता. काहींच्या मते, या गटाला इंदिरा गांधींचीही साथ होती. नेहरूंच्या मंत्रिमंडळातील अनेक जण भ्रष्टाचार व ढिसाळपणाच्या आरोपाने आता ओळखले जात होते. या साऱ्या वर्गांची मागणी लक्षात घेऊन व पक्षात आलेल्या स्थितीवादाची दखल घेऊन प्रत्यक्ष नेहरूंनीच मग कामराज यांच्या मदतीने ऑगस्ट १९६३ मध्ये कामराज योजना पुढे आणली.

पक्षातील जुन्या व दीर्घ काळ मंत्रिपदावर राहिलेल्या लोकांनी राजीनामे द्यावेत व पक्षकार्याला वाहून घ्यावे, असे या योजनेचे थोडक्यात स्वरूप होते. काहींना हा पक्षात नवेपणा आणण्याचा प्रकार वाटला, तर काहींनी ''नको त्यांना सरकारातून घालविण्याची चाल'' असे या योजनेचे वर्णन केले. या योजनेची विश्‍वसनीयता वाटावी म्हणून प्रत्यक्ष नेहरूंनीच त्यांच्या पदाचा राजीनामा जाहीर केला. पण पक्ष व देश यांना नेहरूंची गरज असल्याचे मत बळकट झाल्याने त्यांनी तो मागे घेतला. पुढे २५ ऑगस्टला कामराज, मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, जनजीवन राम, बिजू पटनायक, स. का. पाटील आणि उत्तर प्रदेशचे चंद्रभानू गुप्ता यांनी त्यांचे राजीनामे सादर केले. कोणाचे राजीनामे मंजूर करायचे याचा अंतिम अधिकार नेहरूंना असल्याने ते देणाऱ्यांतील अनेक जण त्यांच्यावर नाराज झाले. काहींनी तो त्यांचा अपमान वाटला. त्यानंतर लगेच कामराज यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने घरी बसविण्यात आलेले सगळे मंत्री व नेते नेहरूंवर रुष्टही झाले. परंतु नेहरूंच्या लोकप्रियतेचा साऱ्यांनाच धसका असल्याने त्याची वाच्यता करताना त्यातले कोणी दिसले नाही. वृत्तपत्रांनी मात्र या प्रकारामागचे राजकारण शोधण्याच्या नावाने त्याची बरीच राळ उठविली.

या योजनेमागे इंदिरा गांधींचा हात होता, हा आरोपही या काळात होत राहिला. पक्षातील आपले प्रतिस्पर्धी दूर करावेत, असे त्यांच्या मनात होते, असे बोलले गेले. प्रत्यक्षात पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंदिरा गांधींमध्ये पंतप्रधानपद पेलून धरण्याची क्षमता आहे, असे वाटत नव्हते. त्यात त्या स्त्री असल्याचाही एक विचार होताच. उलट दुसरीकडे, इंदिरा गांधींच्या मनात पक्षातील ज्येष्ठ नेते नेहरूंच्या प्रकृतीचा फायदा घेऊन त्यांच्याविरुद्ध कट रचत असल्याची व त्यांना पंतप्रधानपदावरून दूर करण्याची योजना आखत असल्याची शंका होती. कामराज योजना अशी गाजली. मात्र त्यानंतर काही काळातच नेहरूंची प्रकृती आणखी ढासळली.

भुवनेश्‍वरला काँग्रेसचे ६८ वे अधिवेशन १९६४ मध्ये भरले होते. त्याला हजर राहायला आलेल्या नेहरूंचे जनतेने विमानतळापासून अधिवेशनस्थळापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून स्वागत केले. मात्र अधिवेशनाच्या व्यासपीठावरच त्यांना पक्षाघाताचा झटका आला. इंदिरा गांधींनी त्यांना आधार देऊन सावरले. गर्दीपासून दूर राखत त्यांना सुरक्षित जागी बसविले गेले. पुढे लागलीच त्यांची विमानाने दिल्लीला जाण्याची व्यवस्था केली गेली. प्रसंगाचे आव्हान ओळखून कामराज यांनी लालबहादूर शास्त्री व टी. टी. कृष्णम्माचारी या दोघांना बोलावून त्यांना पंतप्रधानपदाचे काम पाहायला सांगितले. त्यात कृष्णम्माचारींनी परराष्ट्रव्यवहार, तर शास्त्रीजींनी अंतर्गत कारभार पाहावा, असेही त्यांना सांगितले गेले.

दिल्लीला पोहोचल्यानंतरही नेहरू कार्यालयीन कामे पाहतच होते. धोरणविषयक निर्णय घेत होते. इंदिरा गांधींनी त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी बदलल्या. त्यांचे रोजचे अठरा तासांचे काम बारा तासांवर आणले. मंत्री व अधिकारी आणि पंतप्रधान यांच्यातील मध्यस्थ म्हणून त्याच मग कामही पाहू लागल्या. या वेळी आचार्य विनोबा भावे यांनी नेहरूंना बासरी शिकण्याचा सल्ला दिला. त्यावर संतापलेले नेहरू म्हणाले, ''या वयात मला बासरी वाजवायला सांगतात, याचा अर्थ काय?'' यावर त्यांना आराम पडावा म्हणून विनोबांनी तसे सुचविले असेल, असे इंदिरा गांधींनी त्यांना समजावले. पण स्वत: तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असलेल्या नेहरूंनाच मग ॲरिस्टॉटलचे म्हणणे आठवले. 'सभ्य पुरुषांनी बासरी शिकावी' असे तो म्हणाला होता. मात्र त्यांनी ती फार चांगलीही वाजवायला नको, अशी पुस्तीही जोडली होती.

नेहरूंची धाकटी बहीण कृष्णा हाथीसिंग यांनी २७ मे रोजी मुंबईतच असलेल्या विजयालक्ष्मींना फोन करून 'भाईची तब्येत चांगली नसल्याचे कळले' हे सांगितले. कृष्णाजींनी लगेच दिल्लीला फोन केला, तेव्हा इंदिरा गांधींना नीट बोलता येत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. ''त्यांना बरं नाही. ते खूप-खूप गंभीर आहेत. डॉक्टरांनाही काय करायचं ते कळत नाही.'' असेच काहीसे त्या म्हणाल्या. तशाच स्थितीत दुपारी १ वाजून ४० मिनिटांनी नेहरूंचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या मनोबलानुसार त्यांना काम करताना मृत्यू आला होता. अंथरुणावर पडून त्यांना त्याची आराधना करावी लागली नव्हती.

नेहरूंच्या मृत्यूचे वृत्त सर्वत्र वाऱ्यासारखे पसरले. काही क्षणांतच तीन मूर्ती भवनाचे आवार आणि व्हरांडे शोकाकुल स्त्री-पुरुषांच्या गर्दीने भरून गेले. टी. टी. कृष्णम्माचारी आणि जनजीवन राम हे मंत्री प्रथम आले. पाठोपाठ सारे मंत्रिमंडळही आले. तेवढ्या शोकाकुल अवस्थेतही तीन मूर्ती भवनाच्या प्रमुख दालनात मंत्रिमंडळाची तातडीची बैठक झाली आणि तीत गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांची हंगामी पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली.

देश दु:खात बुडाला आणि जग काळजीने अंधारले. देशोदेशीचे अध्यक्ष, पंतप्रधान, नेते, विद्वत्जन, लेखक व नामांकित लोक दिल्लीला आले. देशातून जनौघ आला.

अंधार पडू लागताच नेहरूंचे शव तीन मूर्ती भवनाच्या खालच्या दालनात जनतेच्या दर्शनासाठी आणले गेले. आता ते फुलांच्या पाकळ्यांनी झाकले होते. सारी रात्र लोक येत होते आणि आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचे अभिवादन करीत होते. तीन मूर्ती भवनात व पुढे तिथून यमुनेपर्यंत गेलेल्या पाच मैलांच्या अंत्ययात्रेत किमान चाळीस लाख लोकांनी नेहरूंचे अखेरचे दर्शन घेतले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांची रक्षा गंगेत विसर्जित केली गेली. काही हिमालयावर पसरली, तर काही देशातील शेतमळ्यांत पसरली गेली.

**(साधना - १२ ऑक्टोबर २०१९ वरून साभार...)**

❐

# डॉ. आंबेडकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन

■ चंद्रकांत सर्वगोड

अस्पृश्य वर्गाची सुधारणा होण्यास दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्या मनावर जो जुन्या खुळचट अनिष्ट विचारांचा गंज चढला आहे तो धुऊन निघाला पाहिजे. आचार-विचार आणि उच्चार यांची शुद्धी जोपर्यंत झाली नाही तोपर्यंत अस्पृश्य समाजात जागृतीचे अथवा प्रगतीचे बीज कधीही रुजणार नाही. मार्च १९२७ च्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेमध्ये भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते ते आजही जाणवते.

ज्यांनी ज्यांनी बाबासाहेबांचे विचार आपल्या जीवनात आणि आचरणात आणले. अंधश्रद्धांना मूठमाती देऊन नवविचार स्वीकारला त्यांची त्यांची प्रचंड वेगाने प्रगती झालेली दिसून येते आहे. तर जे लोक तोंडाने केवळ जय भीम म्हणत राहिले परंतु आचरण मात्र जुनाट चालीरीतीने करत राहिले किंवा त्यांच्या वाटेने चालण्याचे धैर्य दाखवू शकले नाहीत, त्यांची मात्र अधोगती होताना दिसत आहे. मांढरदेवीला बोकड कापायला जाताना बुद्धाचा विचार मागे सोडून जाणाऱ्यांची प्रगती ना मांढरदेवीने केली ना त्यांना स्वत:ला करता आली. कारण खुळचट विचारांचा बुद्धीला गंज चढला की मग विचार करण्याची शक्तीच नाहीशी होते. माणसे विचार करू शकतात. त्यांना बुद्धी असते म्हणून त्यामुळेच तर ते या पृथ्वीवर लाखो वर्षे टिकून राहू शकले. त्यांच्याकडे ना हत्ती सारखी ताकद, ना सिंहासारखे दात आणि पंजे तसेच ते हरणासारखे चपळही नाहीत तरीही निसर्गाविरुद्ध लढत माणूस पृथ्वीवर टिकला कारण तो विचार करतो. जर माणसांची विचार करण्याची शक्तीच मारली गेली तर माणसे आणि मेंढरे यांच्यात फरक राहणार नाही.

भारतात तसेच झाले होते ना! शेकडो वर्षे अस्पृश्य हे प्राण्यांपेक्षाही खालच्या पातळीवरचे जीवन जगत होते. मुंग्यांनाही साखर दिली जात होती. कुत्री - मांजरे पाणी पित परंतु माणसांचा विटाळ होत होता. आणि हे सर्व अन्याय माणसे खालमानेने पिढ्यान्पिढ्या सहन करत होती. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना जागे करताना म्हणतात मरणोत्तर मोक्षप्राप्तीकरणासाठी तळमळणारी वृत्ती किंवा काल्पनिक स्वर्गीय नंदनवनाकडे खिळलेली दृष्टी ही आजच्या परिस्थितीत आत्मघातकी आहे. इहलोकातील खडतर आयुष्यक्रम त्या भोळसर कल्पनामुळे कष्टमय झाला आहे. स्वपराक्रमाने पोषक अन्न मिळवणे ज्ञानार्जनाची साधने अंकित करणे या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे बहुजन समाज पराङमुख झाल्यामुळे सर्व देशाची उन्नती स्थगित झाली आहे.

'अन्न, वस्त्र, निवारा यांची भ्रांत असताना बहुजन समाजाला मोक्षाचे गाजर हितशत्रूंनी दाखवले आपण या गाजराकडे आणि स्वर्गातल्या अप्सरांकडे, सुखाकडे पाहात राहिलो. स्वर्गातील सीट रिझर्व्ह करण्याच्या फंदात आजचे जीवन बरबाद करत राहिलो. माझ्या नशिबातच असे जगणे आहे असे म्हणून गेल्या जन्मात केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून हे भोग असे आम्हाला बाबा बुवा पुरोहितांनी सांगितले म्हणूनच तर आपण अन्याय सहन करत राहिलो आणि करत आहोत जेव्हा मोक्ष, नशीब, दैव,

भाग्य यांचे काल्पनिक दोर कापून टाकू तेव्हाच आपली उन्नती होण्याची शक्यता आहे.'

१४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्या नंतर लगेच दुसऱ्या दिवशी भाषण करताना बाबासाहेब चिंता व्यक्त करतात की, या देशात बुवाबाजीचे फार मोठे खूळ आहे. एखाद्या माणसाने काही विचित्र केले तर तो साधुपुरुष बनतो त्याने जर फाटके कपडे घातले. गटारातले पाणी ण्यायला अगर लंगोटी लावली असे काहीतरी विचित्र केले की या देशात त्या माणसाला साधुपुरुष मानतात परंतु एखाद्याने स्वच्छ कपडे वापरले स्वच्छ पाणी पाहिजे असे म्हटले की मोठा मिजासखोर आहे असे म्हणतात. हा देश असा विक्षिप्त विचारसरणीत सापडलेला आहे. त्यासाठी आता सर्वांनी जागरूक राहून हे प्रकार बंद केले पाहिजेत.

परंतु कधी नव्हे ते सध्या बाबा-बुवा बापू महाराजांचे पीक आलेले दिसून येतेय. इतके नव्हे तर ते निवडणुका जिंकून संसदेत पोहोचले आहेत. गटाराचे झाकण उघडले की जशी झुरळं बाहेर पडतात तशी बुवा महाराजांची रांग सगळ्या देशात पोहोचलीय माणसांची विचारशक्ती मारून त्यांना जिवंत रोबो बनवलेत ते देवाच्या धर्माच्या, बुवाबापूंच्या गायीच्या नावाने विरोधी विचारांना मारत सुटले आहेत. पूर्वी एक दिवस जरी नळाला पाणी आले नाही तरी बायका, लाटणी, हंडे घेऊन प्रचंड मोर्चा काढत. परंतु आता महागाई वाढली, सरकार पाण्याचे खाजगीकरण करतेय. शेतकरी आत्महत्या करतोय, बेरोजगारीचा प्रश्न एवढा मोठा आहे परंतु तरीही लोक रस्त्यावर येत नाहीत. भाषणांना येत नाहीत बुवा महाराराजांच्या प्रवचनांना मात्र दुथडी भरून व्हावीत इतकी माणसे लोटत आहेत. राजकीय बुवा आणि भक्त नावाची संकल्पना वाढतेय. बुवांच्या ब्रह्म, मौक्ष कल्पनांत गुंग होऊन जात आहेत. कोणीतरी ख्रिस्ती पाद्री पाणी देतो आणि सगळे रोगमुक्त होतात. तर कुणी नुसती फरशी डोळ्याला लावतो की, आजार बरे होतात असे मानत आहेत.

विचार आणि प्रज्ञा यांचा वापर न केल्याने काय घडते याचे एक उदाहरण बाबासाहेबांनी आपल्या भाषणांत सांगितले, ''एका लहानशा गावात एक पाद्री राहत होता. संकट ओढवलं की गुडघे टेकून प्रार्थना करावी हे एक वचन त्याला माहीत होतं. एकदा गावातील झोपड्यांना आग लागली हा पाद्री तिथे गेला आणि सर्वांना एकत्र करून प्रार्थना करायला सुरुवात केली. अर्थात आगीमुळे एकूण एक झोपडी जळून खाक झाली. थोडा प्रज्ञेचा वापर केला असता आग विझवण्यासाठी पाद्री बादली घेऊन स्वत: धावून गेला असता आणि इतरांना प्रार्थनेत न गुंतवता तर कदाचित आगीपासून बऱ्याच झोपड्या वाचविता आल्या असत्या. केवळ प्रार्थना केल्याने सगळ्या समस्या सुटत असल्या तर दवाखाने आणि समस्या निवारण केंद्र निर्माण करण्याची गरजच वाटली नसती. परंतु सारासार विचार करण्याची क्षमताच एकदा मारली गेली की मग तो जे सांगेल ते खरे वाटते.''

बाबासाहेब आंबेडकरांचे एकूणच जीवन अंधश्रद्धांशी लढण्यातच गेले. देवाचे मंदिर हे सर्व हिंदूंचे आहे आणि सर्व हिंदूंप्रमाणे अस्पृश्यांनासुद्धा देवाचे दर्शन घेता यायला पाहिजे म्हणून त्यांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. त्यांची पत्नी रमाबाई यांना शेवटची इच्छा म्हणून पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे होते. तेव्हा तिला समजावताना ते म्हणतात, ''जो ईश्वर आम्हाला पाहू इच्छित नाही त्याच्यासाठी आपण तळमळ करण्याची गरज नाही. आपण आपले वेगळे पढंरपूर बनवू'' पुढच्या काळात बाबासाहेबांचे वाक्य तंतोतंत खरे ठरल्याचे दादर, मुंबई येथील ६ डिसेंबर आणि १४ ऑक्टोबरची नागपूर येथील गर्दी पाहून वाटते.

या जगात ईश्वर असो किंवा नसो, त्याचा विचार करण्याची तुम्हाला काही जरुरी नाही. एवढी गोष्ट मात्र खरी आहे की जगात ज्या हरघडी घडामोडी होतात त्या माणसेच करत असतात. काही थोडे सुशिक्षित व स्वार्थपरायण लोक दुसऱ्या असंख्य लोकांना अज्ञान अंधकारात ठेवून त्यांना ईश्वरविषयीच्या खोट्या कल्पनांच्या पाठीमागे लावून व त्यांच्या धर्मभाळेपणाचा फायदा घेऊन आपले स्वत:चे हित साधित असतात. कारण या क्लृप्तीने तुमची संघशक्ती नष्ट होऊन तुम्ही मेंढरासारख्या पोकळ भावनांच्या पाठीमागे लागता व तुम्हाला सर्वतोपरी लुबाडण्याचा त्यांचा मार्ग निष्फळ होतो. आज आपण दीनावस्थेत पोहोचले आहोत. त्या स्थितीतून बाहेर पडून तुमचा उद्धार करून घ्यायचा असेल तर तुम्ही या कल्पनांना अजिबात फाटा दिला पाहिजे. तुम्ही स्त्री-पुरुषांनी खात्री बाळगली पाहिजे की तुमचा उद्धार करण्यास दुसरा कोणीही येणार नाही किंवा तो मीही करणार नाही जर मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करून घेण्यास समर्थ व्हाल.''

मात्र प्रथम त्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, संघटित झाले पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध लढले पाहिजे. शिक्षणाविना माणसाला पशुत्व प्राप्त होते त्याच सोबत ते असेही म्हणाले की, भाराभर (ग्रंथ नुसते वाचून काय उपयोग? गाढवाच्या पाठीवर ग्रंथ लादण्यापासून गाढवाला जेवढा लाभ तेवढाच लाभ फार तर अशा वाचनाने होऊ

शकेल. ग्रंथ वाचून रसग्रहण करण्याची शक्ती पाहिजे. नवनवीन कल्पना सुचल्या पाहिजेत. सिद्धांत परिपोषण करता आला पाहिजे. हे जर आपण आपल्या मुलांना समजावू शकलो तर त्यांच्यातही वेगळा विचार करण्याची क्षमता तयार होईल आणि त्यातूनही वैज्ञानिक तयार होतील. त्याचप्रमाणे ते असेही म्हणत की ''जागृती हे जरी समाजाच्या उन्नतीचे अंग असले'' तरी नुसत्या जागृतीचा उपयोग नाही. समाजाच्या उन्नतीकरता काही विधायक कार्यक्रमांची आवश्यकता आहे स्वत:ला विधायक कामात गुंतवले तरच आपली बुद्धी तीक्ष्ण राहील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्लीत असताना एकदा एक पत्रकार त्यांच्यासोबत चर्चा करत होते. त्याच वेळी काही लोक तेथे आले ते बाबासाहेबांच्या पाया पडू लागले तेव्हा बाबांनी आपल्या काठीने त्यांना मारले व हाकलून दिले हे पाहून तो पत्रकार म्हणाला, ''बाबासाहब, लोग आपके करीब आते है। अपके प्रती इतना विश्‍वास, श्रद्धा रखते है, आपसे मोहब्बत करते है, आपको महसूस करना चाहते हे और आप उनको प्यार देने के बजाय उन्हे लाठीसे मारते हो । ऐसा क्यों करते हो?'' त्यावर बाबासाहेब गंभीर होत म्हणाले, ''यही तो मै नही चाहता। मुझे डर है की लोग मुझे भगवान ना बना दे।'' त्यांना जी भीती होती ती आपण खरी करू पहात आहोत. त्यांना पुतळ्यात बंद करतो आहोत एकदा का पुतळ्याला हार घातला, झिंदाबाद म्हटले म्हणजे त्यांना महान करायचे, असे केले की त्यांच्यासारखे वागण्याची जबाबदारी राहात नाही. बाबासाहेबांना अशा वृत्तीची प्रचंड चीड होती ते म्हणत, ''महात्मे येतात आणि जातात त्यांच्या येण्याजाण्याने केवळ धूळ उडते. आम्ही आहोत तेथेच राहतो.'' त्यांच्या अशा विचारामुळेच तर त्यांनी धर्म स्वीकारताना असाच घेतला की, त्याचा प्रवर्तक स्वत:ला ईश्‍वराचा प्रेषित अगर ईश्‍वर म्हणत नाही. बुद्ध म्हणतात, ''मी म्हणतो म्हणून माझा धम्म स्वीकारू नका. तुमच्या बुद्धीला, तर्काला पटले तरच माझ्या मागे या.'' त्यांनी स्वत:ला सामान्य माणूसच मानले.

१९५६ ला नागपूर मुक्कामी दीक्षा घेतानासुद्धा सर्वप्रथम बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: दीक्षा घेतली. त्यानंतर सर्व उपस्थित लोकांना विचारले, 'मी बुद्धाच्या वाटेने चालतो आहे. तुम्हाला यायचे आहे तर या. कोण कोण येतं?' असा प्रश्‍न विचारताच लाखो लोकांनी हात वर केले. त्यानंतर त्यांनी प्रथम बौद्ध धम्मात नसलेल्या परंतु बौद्ध धम्माचा गाभा असलेल्या बावीस प्रतिज्ञा दिल्या. त्यात ब्रह्मा, विष्णूला देव मानणार नाही वा पूजा करणार नाही. ब्राह्मणांकडून कोणतेही कर्मकाड करणार नाही अशा शपथा वदवून घेतल्या. दीक्षा घेण्याच्या अगोदरचा एक प्रसंग आहे. बाबासाहेबांचे वामनराव गोडबोले नावाचे एक सहकारी होते. त्यांना बाबासाहेबांनी २२ प्रतिज्ञा वाचून दाखविल्या यावर गोडबोले म्हणाले, ''बौद्ध धम्म घेतल्यावर आपोआपच जुने सर्व गळून जातील मग पुन्हा या मराठीतून प्रतिज्ञा घ्यायची गरज का आहे?'' यावर बाबासाहेब म्हणाले, माझ्या भोळ्या भाबड्या जनतेला कुणी फसवू नये म्हणून त्यांच्या साध्या सोप्या भाषेत तुम्हाला काय करायला पाहिजे हे याद्वारे मी स्पष्ट करून सांगेन. देव, आत्मा, पुनर्जन्म, कर्मकांड ही संकल्पनाच बाबासाहेबांना संपवायची होती. म्हणजे पुन्हा त्या जुन्या अंधश्रद्धांकडे लोक वळणार नाहीत त्याच प्रमाणे बौद्ध धम्माचा धर्म होऊन बौद्ध भिख्खूंचं प्रस्थ वाढू नये म्हणून पुढे त्यांचे पुत्र भय्यासाहेब ऊर्फ यशवंतराव आंबेडकर यांनी बौद्धाचार्य नावाची नवी संकल्पना निर्माण केली व सामान्य उपासकांना कर्मकांड करण्याचे सर्व अधिकार दिले. बौद्ध भिख्खूंना प्रचारक म्हणून नेमले जे बुद्धांनाही अपेक्षित होते. त्यामुळे खेड्यापाड्यातील लग्न व इतर विधी करण्याची अडचण दूर झाली व सर्वसामान्य लोकांपर्यंत धम्म सहज पोहोचू शकल्या. त्या नंतरही ७ व्या धम्म परिषद, मुंबई येथे मंगळसूत्र, फळं, धागा इत्यादी अंधश्रद्धा असलेल्या बाबींमध्ये भारतीय बौद्ध महासभेने बदल केला. धम्म सतत प्रवाही राहावा म्हणून कार्यकर्त्यांनी काळजी घेतल्याचे दिसून येते.

४ जुलै १९३६ रोजी संतांच्या संमेलनात सर्व संतांना संबोधताना बाबासाहेब मार्मिक बोलतात ते म्हणतात, ''संतांवर समाजाची जबाबदारी असली पाहिजे. परंतु आजचे साधू लोक काय करतात? अंगाला राख फासून समाजापासून दूर राहतात निव्वळ, जटा, दाढी, माळा, रंगीत फडकी या बाह्य लक्षणांनी खरा साधू होत नाही. समाजात जिकडे तिकडे अधोगती झालेली दिसून येते. समाजात होत असलेला अन्याय, जोर जुलूम यांचा प्रतिकार करणे साधूंचे कर्तव्य आहे. तेच लोककल्याण आहे. तीच खरी लोकसेवा. तेव्हा साधू लोकांनी या नव्या कार्यक्रमाचा आपल्या अंगात संचार करून घेऊन नवं जीवन प्राप्त करून घ्यावे. आज स्वार्थत्यागाला महत्त्व आहे. नुसत्या माळांना नाही. आपल्या सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे'' हे भाषण ऐकताच तेथील संतांनी दाढी, जटा मिशा, संत-महंतगिरीची निशाणी उपकरणे अग्नीला अर्पण केली. आपण आपल्यातल्या अंध:श्रद्धांना कधी मूठमाती देणार?

❒

# एक सर्वहारा वर्गाचा शाहीर तर दुसरा तरक्कीपसंद शायर

**(साम्य, सामर्थ्य आणी वेगळेपणा)**

■ **लक्ष्मीकांत देशमुख,** ९३२५२९७५०९



एक

जग बदल घालून घाव ।
सांगून गेले मज भीमराव ।।
- अण्णा भाऊ साठे

प्यार का जश्न नई तरह मनाना होगा ।
गम किसी दिल में सही, गम को मिटाना होगा ।।
- कैफी आझमी

या दोन कलावंतांचं हे जन्मशताब्दी वर्ष आहे. १४ जानेवारी १९१९ हा कैफी आझमींचा जन्मदिवस तर १ ऑगस्ट १९२० हा अण्णा भाऊ साठेंचा. दोघेही कम्युनिस्ट पार्टी कार्डहोल्डर. प्रगतिशील लेखक संघ व इप्टाशी (इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन) जोडले गेलेले बिनीचे शिलेदार. दोघांनाही शोषणविरहित देश व समाज हवा होता. त्यासाठी त्यांनी आपली कला वापरली, लेखणी झिजवली. वर्ग व जातविरहित समाज— क्लास अँड कास्टलेस सोसायटी—एकाला हवा होता, तर दुसऱ्याला हिंदू-मुस्लिमांची कौमी एकता आणि समाजवादी भारत—सोशालिस्ट इंडिया—हवा होता. दोघांचीही स्वप्ने व ज्यावर अखेरच्या श्वासापर्यंत नाउमेद न होता विश्वास ठेवला तो त्यांचा विश्वास हयातीतच विफल होताना त्यांना दिसत होता; जाणवत होता. आता अण्णा भाऊ जाऊन अर्धशतक लोटलं व कैफी जाऊन दीड दशक झालं आहे. मुख्य म्हणजे 'खाउजा' (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) धोरणाची पंचविशी पण पूर्ण झाली आहे आणि ते धोरण स्वीकारून न बोलता, चर्चा न करता समाजवादाला भारतानं सोडचिठ्ठी दिली आहे. त्यातून भस्मासुरासारखी अक्राळविक्राळ झालेली निर्घृण भांडवलशाही व तिचं व्यवच्छेदक लक्षणं असणारी एकाधिकारशाही, श्रीमंतांना अधिक श्रीमंत व गरिबांना अधिक गरीब करणारी विषमता आणि धर्मांध, जात्यंध शक्तींचा बंद बाटलीतून बाहेर निघालेला व मोकाट सुटलेला राक्षस... त्यानं समाजजीवनात ठासून भरलेली अस्वस्थता पाहत आज या दोन जनकवींची आठवण करणं आणि त्यांनी साहित्यातून मांडलेला व पुरोगामी आशय असणारा कलाविचार समजून घेत पुन्हा एकदा घाव घालून जग बदलण्यासाठी आणि प्रत्येक माणसाच्या मनातलं दु:ख ओळखून ते मिटविण्यासाठी एल्गार पुकारणं, ही आजच्या काळाची गरज आहे. पण समाजजीवन पाहिलं की 'सारं काही शांत शांत' पाहून अस्वस्थ व्हायला होतं. अशा वेळी अण्णा भाऊ साठे व कैफींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचं कार्य आणि त्यांचा साहित्यातून आविष्कृत होणारा साहित्य-विचार पुन्हा नव्यानं बदलत्या परिस्थितीत समजून घेणं महत्त्वाचं आहे. म्हणून आज त्यांचा एकत्रित संक्षेपानं विचार करणं केवळ प्रासंगिकच नाही तर अत्यावश्यक आहे. त्यांचं समकालीनत्व आणि त्यांच्या लेखणीतून प्रसूत झालेल्या क्रांतिकारी विचारातलं साधर्म्य, व्यक्तिनिष्ठ अनुभव आणि केलेला संघर्ष यामुळे वेगळापणा आहेच पण त्यातही अनुस्यूत असलेली आंतरिक समविचारी नजर व दृष्टिकोन समजून घेण्यापूर्वी प्रथम संक्षेपानं त्यांचं जीवन व लेखन यांचा आढावा घेणं आवश्यक आहे.

दोन

कैफी आझमी हे मिझवां (अझमगढ) येथील एका जमीनदार घरात जन्मले. ओळीने चार बहिणी वारल्या, म्हणून ज्या वडिलांनी कैफीच्या मोठ्या तीन भावंडांना आधुनिक इंग्रजी शिक्षण कटाक्षानं दिलं होतं, त्यांनी धार्मिक पश्चात्तापानं कैफीला लखनऊच्या एका मदरशात धार्मिक शिक्षणासाठी घातलं. हा केवढा विरोधाभास होता. पण कैफी जात्याच धारदार तैलबुद्धीचे होते. त्यांना जमीनदार कसे रयतेला छळतात हे स्वानुभवानं माहीत होतं. त्यातून त्यांची वर्गविग्रहाची—शोषण आणि शोषिताच्या विभाजनाची—तीव्र जाणीव साकार झालेली होती. त्यामुळे लखनऊला त्यांनी मदरशात धार्मिक शिक्षण कमी व आंदोलनं जास्त केली. विद्रोही काव्य—प्रोटेस्ट पोएट्री—अधिक निर्माण केली. आपण मेल्यावर एका तरी मुलानं 'फातिहा' म्हणावा, म्हणून कैफीला धार्मिक शिक्षण देण्याचा बापाचा हेतू होता, पण घडलं विपरीत. त्याबाबत आयशा सिद्दिकींनी मोठं मार्मिक विधान केलं आहे. ते असं : 'कैफी साहब को उनके बुजुर्गोंने एक दीनी शिक्षागृह—मदरसा में—इसलिए दाखिल किया था, की वहां पर फातिहा पढना सीख जाएगा। कैफी साब इस शिक्षागृह से मजहब पर फातिहा पढकर निकल गये।'

एकोणिसाव्या वर्षी कैफींनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला व शेवटपर्यंत ते पार्टीचे कार्डहोल्डर राहिले. मरेपर्यंत त्यांच्या खिशात पार्टीचं कार्ड होतं. ते दर वर्षी ठरलेली फी देऊन त्याचं न चुकता नूतनीकरण करायचे. कारण त्यांना हा पक्ष 'सोशालिस्ट इंडिया' साकार करेल असं वाटायचं. ते एकदा असं म्हणाले होते,

'मैं कब पैदा हुवा याद नही। कब मरूंगा मालूम नही। अपने बारे मे यकिन के साथ सिर्फ इतना कह सकता हूं की, मैं गुलाम हिंदोस्तान में पैदा हुवा, आझाद हिंदुस्थान में बुढा हुवा, और सोशालिस्ट हिंदुस्थान में मर जाऊंगा। ये कोई मेरा ख्वाब नही है, सोशालिझम कोई सपना नही है। सारी दुनिया में एक लंबी मुद्दत से ये ख्वाब देखा जा रहा है। इस ख्वाबसे मेरा और मेरी शायरी का ताल्लुक रहा है।'

त्यांनी मनाने व विचाराने कम्युनिझम विचारधारा व कम्युनिस्ट पक्ष स्वीकारला होता. त्याबाबत त्यांनी स्वत: लिहिलंय की, ''अब मुझे वह रास्ता मिल गया, जिसपर मैंने जिंदगी का इतना लंबा सफर तय किया और बावजूद मफलूज (लकवाग्रस्त) हो जाने के बाद तक उसी रास्ते में चल रहा हूँ । एक दिन इसी रास्ते पर गिरुंगा और सफर खत्म हो जाएगा। मंजिल पर, या मंजिल करीब।''

लखनऊला विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी कैफींनी संपाचं नेतृत्व केलं व विद्रोही कविता लिहायला सुरुवात केली. मग कानपूरला १९४२ ला कामगार संघटनेत काम सुरुवात केलं. १९४३ साली मुंबईला कम्युनिस्ट पार्टीचं कार्यालय सुरू झालं तेव्हा कैफींना सज्जाद जहिरनी तिथे आग्रहानं नेलं आणि तिथे कम्यूनमध्ये राहत केवळ चाळीस रुपये मानधन घेत पार्टीचं पूर्णवेळ काम सुरू केलं. तिथे कामगार चळवळीत सक्रिय सहभागी झाले. त्यांच्यासाठी शायरी करू लागले. सज्जाद जहिरचा प्रभाव होता म्हणून ते 'प्रगतिशील लेखक चळवळीत' सक्रिय झाले. इप्टाचे —इंडियन नॅशनल थिएटर असोसिएशनचे—पहिल्यापासूनच ते त्यांच्या पत्नी शौकतसह सक्रिय सदस्य होते. पुढे जगण्यासाठी व चार पैसे मिळावेत म्हणून त्यांनी फिल्मी गीतलेखन सुरू केलं, पण त्यांची अदबी म्हणजे साहित्यिक लेखणी शेवटपर्यंत तेज व प्रवाही काव्य प्रसवणारी राहिली. चार काव्यसंग्रह, विपुल व्यंगात्मक गद्यलेखन आणि काही नाटके असं विपुल लेखन त्यांनी केलं. इतर अनेक लेखक-कवी पुढे प्रगतिशील चळवळीपासून दूर गेले, पण कैफी मात्र त्याच्याशी शेवटपर्यंत जोडलेले राहिले. तीच बाब इप्टाची. त्यांची सक्रियता एवढी होती की, बाबरी मशिदींच्या पतनापूर्वी सांप्रदायिकता आणि पुनरुत्थानवादाविरुद्ध पुरोगामी कलावंत-संस्कृतिकर्मियांचा एक संयुक्त मोर्चा २ एप्रिल ते ६ एप्रिल १९९२ दरम्यान निघाला होता. त्यात शरीराचा डावा भाग लकवाग्रस्त असतानासुद्धा व्हीलचेअरवरून उत्साहाने ते त्यात सामील झाले होते व प्रत्येक सभेत आपल्या भारदस्त आवाजात नज्म ऐकवत उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. त्या वेळी त्यांच्या एका नज्मच्या खालील चार ओळींत त्या संस्कृती मार्चची घोषणा झाली होती.

यूं चूप न रहो।
फिरकापरस्तों से कहो
हमने खाई हे कसम
या तुम नही, या हम नहीं।

कैफी आझमी हा 'आवारा सजदे' करणारा इन्किलाबी शायर होता. अवघ्या पंचविशीत त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'इनकार' १९४४ साली प्रसिद्ध झाला. त्याला प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशनचे संस्थापक सचिव व सर्वेसर्वा सज्जाद जहिर यांनी प्रस्तावना लिहिली होती. त्यात त्यांनी कैफींच्या इन्किलाबी शायरीबाबत असं लिहिलं होतं,

''जदीद (आधुनिक) उर्दू शायरी के बाग में एक नया फूल खिला है, एक सुर्ख (लाल) फूल। कैफी की शायरी कदीम-ओ - जदीद (प्राचीन व आधुनिक) दोनो किस्म की अदबी गलाजतों (साहित्यिक घाण) से पाक हैं। इसमे सच्ची तरक्की पसंदीकी (प्रगतिशीलतेची) झलक नजर आती है।''

मुख्य म्हणजे कलावंत व कलेमध्ये म्हणजेच लेखक व लेखनामध्ये अद्वैत असणं महत्त्वाचं असतं व कैफींमध्ये ते होतं. याचा सज्जाद जहिरनी निर्वाळा देताना म्हटलं आहे,

''उसके खयाल और मकसद-ए-हयात (जीवन व उद्देश), उनकी जिंदगी और अमल (व्यवहार) में तजाद (भिन्नता) नही। अगर वह इन्किलाबी और मजदूर राज के गुन गाता है, तो उसे इसका हक है। इसलिए की उसने अपनी जिंदगी को मेहनतकशों की खिदमत और उनकी किस्म जद्दोजेहत में शिरकत के लिए वक्फ कर रखा है। जदीद (आधुनिक) दौर के तरक्कीपसंद शायर इसी किस्म के होगे।''

कैफींच्या प्रगतिशील काव्याचे तीन प्रखर स्वर आहेत. एक स्त्री-पुरुष समानता, दोन वर्गविहीन समाज आणि तीन हिंदू- मुस्लीम एकता. त्यांची १९४० च्या दशकात लिहिलेली 'औरत' ही कविता एक प्रकारे त्यांची सिग्निचर ट्यून आहे. एवढी स्त्री-समतेची व तिला समान मानणारी कविता भारतीय साहित्यात क्वचितच पाहायला मिळते. त्यातील काही ओळी पाहा -

जन्नत इक और भी हे जो मर्द की पहलू में नही
उसकी आजाद रविश पर भी मचलना है तुझे
उठ मेरी जान! मेरे साथही चलना है तुझे
कद्र अब तक तेरी तारीख ने जानी ही नही
तुझ में शोले भी है, बस् अश्कफिकानी (अश्रू ढाळणे) नही
तू हकीकत भी है दिलचस्प कहानी ही नही
तेरी हस्ती भी है इक जवानी ही नही।
अपनी तारीख का उनवान (शीर्षक) बदलना है तुझे
उठ मेरी जान! मेरे साथ ही चलना है तुझे

कैफींनी त्यांच्या गाजलेल्या 'लखनऊ तो नही' या हिंदू-मुस्लीम दंग्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कवितेत मुसलमानांना जे खडे बोल सुनावले, ते किती निर्भीड आहेत -

टपक रहा है जख्मों से दोनो फिरकों के (संप्रदाय के)
बगैर देखो ये इस्लाम का लहू तो नही।
तुम इसका रख लो कोई और नाम मौजूं-सा
किया  है खून से जो तुमने वह वजू तो नही ।।

असे आहेत आपले इन्किलाबी शायर कैफी आझमी व त्यांची काव्यसृष्टी, जी शेवटपर्यंत गरिबांचा आवाज बनून जनतेच्या मनाचा ठाव घेत राहिली.

आता कैफींचे समकालीन पण त्यांच्यापेक्षा कमी आयुष्य लाभलेले व कम्युनिस्ट विचारधारा शिरोधार्य मानणारे व शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांनी वर्गविग्रहासोबत जातिअंताची लढाई लढणारे आणि 'कास्ट व क्लासलेस सोसायटी'चं स्वप्न पाहणारे, त्यासाठी प्रत्यक्ष जमिनीवर लढणारे व त्या लढ्यांसाठी लेखणीतून भूमिका निर्माण करणारे अण्णा भाऊ साठे  यांचा संक्षेपानं परिचय करून घेऊया व मग दोघांचे साम्य-भेद पाहू या.

तीन

१ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव, जिल्हा सांगली येथे जन्मलेले अण्णा भाऊ साठे केवळ दीडच दिवस शाळेत गेले. पण त्यांच्या साहित्यकृती जगातील २७ देशांच्या व देशातील अनेक राज्यांच्या भाषांमध्ये अनुवादित झाल्या व ते खऱ्या अर्थाने मराठीचे आजवरचे एकमेव जागतिक स्तरावर पोहचलेले साहित्यिक ठरले. अनुसूचित जातीतील मातंग समाजात त्यांचा जन्म झाला होता. त्यामुळे दारिद्र्यासोबत वर्णव्यवस्थेचे चटके  त्यांना बालपणापासून सोसावे लागले होते. त्यांचा संघर्ष त्यातून फुलत गेला. ते जन्मजात कलावंत होते. लोकगीत टिपेच्या आवाजात म्हणणं; पोवाडे, लावण्या ऐकून मुखोद्गत करणं व त्या मित्रांना आत्मीयतेने म्हणून दाखवणं यातून त्यांच्यातला लोकशाहीर घडत गेला. त्याला नवी दिशा व वळण मिळालं, ते जेव्हा १९३१ साली मुंबईत आले तेव्हा. त्या वेळी मुंबईत काँग्रेसचा प्रामुख्याने जोर होता, पण कम्युनिस्टांचाही प्रभावही काही कमी नव्हता. अण्णा भाऊंच्या मनात पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं त्यांना मार्क्सवादात सापडली आणि ते कम्युनिस्ट पक्षाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते झाले. माटुंगा येथील लेबरकॅम्पमध्ये त्यांचा गिरणी व गोदीत काम करणाऱ्या कामगारांशी संबंध आला. त्यांची व गावी शेतकऱ्यांची दु:ख जवळून पाहिलेल्या आणि ती प्रत्यक्ष भोगलेल्या अण्णा भाऊंना साम्यवादी विचार आपलासा वाटणं स्वाभाविक होतं. दलित-शोषित-पीडितांना व एकूणच सर्वहारा  वर्गाच्या माणसांना ताठ मानेनं जगायला क्रांतिप्रवण करणारं तत्त्वज्ञान एवढं भावलं की, अखेरपर्यंत ते कम्युनिस्ट पक्षाशी व साम्यवादी विचारांशी एकनिष्ठ राहिले. १९४४ साली कम्युनिस्ट पक्षानं 'लाल बावटा' हे कलापथक स्थापन केलं, त्यात अण्णा भाऊ साठेंसोबत अमर शेख व गवाणकर होते. या त्रयीनं अवघा महाराष्ट्र अक्षरश: पिंजून काढला व साम्यवादी विचारांचा प्रचार व प्रसार पोवाडे, लोकनाट्ये व लावण्या या लोककलांच्या माध्यमातून रंजन व प्रबोधन या दुहेरी शस्त्राने केला.

अण्णा भाऊंनी तीस कादंबऱ्या, विसेक कथासंग्रह, पंधरा वगनाट्ये, दहा पोवाडे आणि विपुल गीते लिहिली. जनमानसाची नाडी ओळखणारा व रंजनातून प्रबोधन करणारा पट्टीचा शाहीर आणि दलित नायक-नायिकांना केंद्रस्थानी ठेवून कथा-कादंबऱ्या लिहिणारा साहित्यिक अशी त्यांची दुहेरी ओळख सांगता येईल. पण यापेक्षाही अधिक महत्त्वाची ओळख म्हणजे हे हाडाचे साम्यवादी कार्यकर्ते आणि आंदोलन-मोर्चे गाजवणारे व सर्वहारा वर्गासाठी लढणारे नेते होते.

प्रख्यात लेखक जनार्दन वाघमारे यांनी 'जनवादी साहित्यिक अण्णा भाऊ साठे' संपादित पुस्तकातील आपल्या लेखात अण्णा भाऊंच्या क्रांतिकार्याचं वर्णन खालीलप्रमाणे केलं आहे. ते सार्थ नाही असं कोण म्हणेल?

''अण्णा भाऊंनी अनेक पोवाडे लिहिले व गायिलेही. त्यांची शाहिरी ही त्यांच्या हातातली तळपती तलवार होती. कामगार चळवळीने त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले गेले होते. ते साम्यवादी होते. 'जगातील कामगारांनो, एक व्हा.' ही कार्ल मार्क्सची हाक त्यांच्या कानी पडली होती. कामगार चळवळीत त्यांनी वारकऱ्यांच्या श्रद्धेने भाग घेतला होता. मुंबईतील गिरणी कामगारांचा क्रांतिकारी श्वासोच्छ्वास त्यांना स्पर्श करीत होता. कामगार हा उद्याच्या इतिहासाचा नायक ठरणार, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. भांडवलशाही नष्ट होऊन जगात कामगारांचे राज्य येईल, ही आशा बाळगून ते लेखणी चालवत होते.''

त्यांचे साहित्यविचार हे प्रगतिशील लेखक चळवळीच्या पचवलेल्या तत्त्वज्ञानातून सिद्ध झाले होते. किंबहुना ते दलित जीवनाचा व संघर्षाचा विचार करीत होते. मार्क्सवादाप्रमाणे वर्गविग्रह सिद्धान्तासोबत जातिअंताची लढाई लढून समाज जातमुक्त केल्याविना या देशामध्ये 'क्लास व कास्टलेस सोसायटी' स्थापन होणार नाही, असे विचार कादंबऱ्यांच्या मनोगत व प्रस्ताविकात त्यांनी वेळोवेळी मांडले आहेत. 'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत ते लिहितात,

''जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच जनता कदर करते, हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर व तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी व समृद्ध व्हावा, इथे समता नांदावी, या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला दररोज स्वप्ने पडत असतात. ती मंगल स्वप्ने पाहत पाहत मी लिहीत असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते. माझा असा दावा आहे की, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिक हेतूने नि निष्ठेने मी चित्रित करणार आहे व करीत आहे.''

'बरबाद्या कंजारी' या आपल्या पहिल्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

''माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्याची झुंज व त्यांचं यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रूप करणं मात्र मला आवडत नाही. नव्हे, मला भीती वाटते...''

''माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करू नये असं माझं मत आहे. वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असतं. ती धूळ झटकून तलवार लखलखीत करता येते. मी जे जीवन जगतो, पाहातो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्या बाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो...''

एक-दीड दिवस शाळेत गेलेला हा कलावंत आपल्या कलेच्या जोरावर ज्या संस्थेचे अध्यक्षपद पृथ्वीराज कपूर, बलराज सहानी, कैफी आझमी आदींनी भूषवलं होतं, त्या इप्टाचा अखिल भारतीय अध्यक्ष होतो, ही स्तिमित करणारी उत्तुंग झेप आहे. 'लाल बावटा' कलापथक स्थापन झाल्यापासून संयुक्त महाराष्ट्राचा लढा यशस्वी होण्यापर्यंतच एक तपाचा कालखंड हा अण्णा भाऊंच्या जीवनाचा लखलखणारा कालखंड होता. त्याच काळात आलेल्या 'फकिरा', 'वैजयंता' व 'वारणेच्या खोऱ्यात' आदी कादंबऱ्या, 'स्मशानातलं सोनं'सारख्या प्रेमचंदांच्या 'कफन'च्या तोडीच्या अनेक कथा आणि पोवाडे-लोकनाट्यांनी ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते. पण त्यांचं समाजवादी मन स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिला पडलेल्या भांडवलशाहीच्या विळख्यानं अस्वस्थ होतं. म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ ऑगस्टला त्यांनी 'ये आझादी झुठी है। क्यों की देश की जनता भूखी है।' असा नारा देत मोर्चा काढला होता. कारण त्यांचा श्वास कष्टकऱ्यांच्या दु:खानं जड झाला होता. पण ज्याप्रमाणे कैफी आझमींचं सोशालिस्ट इंडियात मरण्याचं स्वप्न पूर्ण झालं नाही, तसंच दलित-कष्टकऱ्यांना न्याय मिळावा व खरी समता या देशात, या राज्यात प्रस्थापित व्हावी हे अण्णा भाऊंचं स्वप्नही अंतिमत: विफलच झालं. हा कटू पण सत्य इतिहास आहे.

चार

कैफी आझमी व अण्णा भाऊ साठे हे दोघेही आजन्म कट्टर व निष्ठावंत असे कम्युनिस्ट नेते राहिले, हे दोघांतलं साम्य लक्षात घेण्याजोगं आहे. अण्णा भाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले होते व मुंबईत दुकानाच्या पाट्या वाचून त्यांनी अक्षरओळख करून घेतली होती; तर कैफी हे लखनऊच्या धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरशात फारसी व अरेबिक शिकले होते. दोघांनाही आधुनिक शिक्षणापासून वंचित राहावं लागलं होतं. त्यामुळे त्यांनी मार्क्सवाद हा मूळ पुस्तक व कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचा अभ्यास करून आत्मसात केला असं म्हणता येणार नाही. दोघांचाही मूळचा झरा मानवतावादी होता. त्यामुळे समतेचं जणू त्यांना बाळकडूच मिळालं होतं! त्यामुळे दोघांनाही मार्क्सवाद ही विचारधारा 'दिमाग'पेक्षाही 'दिल'ने अधिक स्वीकारली होती.

अण्णा भाऊंचा जन्म गरिबी व वर्णव्यवस्थेच्या उतरंडीखाली असणाऱ्या जातीत झाल्यामुळे आणि अभाव, नाकारलेपण,

गावकुसाबाहेरचं जगणं, तथाकथित उच्चवर्णीयांच्या तिरस्कार, उपेक्षा आणि त्रासामुळे आपली वाटणं साहजिक होतं. अकराव्या वर्षी मुंबईला आल्यावर जगण्यासाठी त्यांनी पडेल ती कामं केली होती. त्यामुळे ते खरेखुरे कामगारच होते. त्यामुळे १९४० च्या दशकातील कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीशी स्वत:ला जोडून घेणं. ही स्वाभाविक परिणिती होती.

पण कैफींचं तसं नव्हतं. ते मूळचे जमीनदार घराण्यातले. वडील आणि मोठे बंधू उच्च आंग्ल विद्याविभूषित व सधन. पण त्यांना वडिलांनी धार्मिक शिक्षण दिलं. त्यामुळे त्यांचं इस्लामी धर्मसंस्कारातून बाहेर येणं आणि 'धर्म ही अफूची गोळी आहे' असं मानणाऱ्या तसेच ईश्वर न मानणाऱ्या म्हणून मुस्लिमांसाठी 'काफिर' असणाऱ्या कम्युनिस्टांचे आयुष्यभराचे सोबती होणं, हा एका अर्थाने चमत्कार म्हटला पाहिजे. पण स्वातंत्र्यपूर्व काळात साम्यवादाची कास धरणारे बहुसंख्य कलावंत हे मुस्लीमच होते, ही पण नोंद करण्याजोगी बाब आहे. प्रगतिशील लेखक चळवळीचा जाहीरनामा लिहिणारे व त्यांची संस्था स्थापणारे सज्जाद जहिर, फैज अहमद फैज, हजरत मोहनी, मजाज यांसारखे कितीतरी लेखक-कवी हे डाव्या विचारांचे होते. यानंतरच्या दुसऱ्या पिढीचे शिलेदार होते, मजरूह सुलतानपुरी, साहिर लुधियानवी, सरदार अली जाफरी आणि अर्थातच कैफी आझमी. त्यांनीही मार्क्सवाद हा प्रत्यक्ष कामगार चळवळीत काम करताना त्यांचे दु:ख, शोषण पाहून आत्मसात केला.

म्हणजेच अण्णा भाऊ साठे व कैफी आझमी दोघांनीही मार्क्सवाद व साम्यवादी विचारधारा कलावंतांच्या जाणकारीनं अंतरंगी मुरवली होती. त्यात कामगार व शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी यावी, त्यांचे शोषण बंद व्हावे व भारतात समतेचं युगं यावं, या एक प्रकारच्या तरुण रक्ताला मोह घालणाऱ्या रोमँटिक विचारांनी दोघेही झपाटलेले होते; ध्येयधुंद झाले होते आणि त्यांनी त्याचा मनापासून स्वीकार केला होता. एवढा की अंतिम श्वासापर्यंत त्यांची साम्यवादी विचारधारेशी, अपेक्षाभंग झाला असला तरी, अव्यभिचारी निष्ठा होती.

१९१७ ची मार्क्स विचारधारा शिरोधार्य मानणारी बोल्शेव्हिक क्रांती सोव्हिएत युनियनमध्ये झाली आणि जगातील अनेक तरुण, विचारवंत आणि कलावंतांचं तिनं लक्ष वेधून घेतलं. वर्गविहीन शोषणमुक्त व खऱ्या अर्थानं स्वतंत्र असं 'साम्यवादी जग' निर्माण होण्याची सोव्हिएत युनियमधील क्रांती ही सुरुवात होती आणि जगातले सारे कामगार एक होऊन निर्घृण व शोषण करणारी भांडवलशाही नष्ट करतील, याचा हा प्रारंभ आहे; अशी भावना जगभर बुद्धिजीवी डाव्या विचारांच्या माणसांत निर्माण झाली होती. त्या भावनेची युरोपात शिकलेल्या व इतिहासाचं डोळस भान असणाऱ्या उदारमतवादी पंडित नेहरूंनाही मोहिनी पडली होती. त्यामुळे भारतात कम्युनिस्ट चळवळ रुजणं स्वाभाविक होतं. पुन्हा पी. सी. जोशी या द्रष्ट्या कम्युनिस्ट नेत्यानं मार्क्सवादी कलाविचार हा मानवमुक्तीच्या लढ्यासाठी कलावंतांमध्ये भरवून, सामान्यांच्या मनात रुजवून त्यांना क्रांतिप्रवण करण्यासाठी प्रोग्रेसिव्ह रायटर्स मूव्हमेंटचा—प्रगतिशील लेखक चळवळीचा—पाया घातला आणि उर्दू-हिंदीमधील एक फार मोठा लेखक-कवींचा वर्ग या चळवळीत सामील झाला. प्रेमचंदसारखा दिग्गज लेखक १९३६ साली लखनऊमध्ये झालेल्या पहिल्या प्रगतिशील लेखक संमेलनाचा अध्यक्ष होता. त्यांनी 'साहित्य का उद्देश' याविषयी जे अध्यक्षीय भाषण केलं, ते आज ऐंशी वर्षे झाली तरी प्रासंगिक आहे. या चळवळीला पंडित नेहरू व गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा पाठिंबा होता. त्यामुळे देशभर प्रगतिशील लेखक चळवळीचा दबदबा व मार्क्सचा कलाविचार वाढत गेला. कलावंतांनी सामान्य कष्टकरी जनतेचा आवाज बनून त्यांची दु:खं सहृदयतेने समजून घेत प्रगट केली पाहिजेत व त्यांना जगण्याचं बळ दिलं पाहिजे, हा नवा मार्क्सप्रणीत साहित्यविचार भारतीय साहित्यात दृढ झाला. प्रेमचंदांनी 'हमे खूबसुरती का मय्यार बदलना होगा' असं म्हणत श्रमिक कामगारांच्या घामात सुगंध आणि अहर्निश काम करणाऱ्या स्त्रीच्या राठ पडलेल्या तळहातातील रेषांच्या जाळ्यात सौंदर्य पाहणं म्हणजे सौंदर्यबोध असं नवं पुरोगामी तत्त्व प्रस्थापित केलं. त्यामुळे गरीब शेतकरी, शोषणाला बळी पडणारा कामगार आणि पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे दुय्यमत्व भोगणाऱ्या स्त्रीच्या दु:ख, वेदना व संघर्षाचं प्रतिबिंब जोरकसपणे भारतीय साहित्यात—खासकरून उर्दू साहित्यात—पडायला प्रारंभ झाला होता.

त्या वेळी हिंदी चित्रपटसृष्टी बहरात होती व तिथे प्रगतिवादी लेखक चळवळीतले कलावंत—खास करून दिग्दर्शक— उदाहरणार्थ, के. ए. अब्बास, चेतन आनंद इत्यादी आणि शायर-कवी जसे की मजरूह, साहिर, शैलेंद्र, प्रेमधवन आदी व्यवसाय म्हणून चित्रपटात गेले. आणि त्यांनी रंजनवादी-पलायनवादी चित्रपटांना वास्तववादी बनवलं. के. ए. अब्बासचा 'धरती के लाल' व चेतन आनंदचा 'नीचा नगर' हे पहिले दोन गाजलेले वास्तववादी व नव्या संवेदनेचे चित्रपट ही प्रगतिवादी कलाविचारांची देन होती. त्यातूनच पुढे 'इप्टा—इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन'—ही नाट्यसंस्था व 'लाल बावटा' हे कलापथक कम्युनिस्ट पार्टीनं स्थापून त्याद्वारे तळागाळांपर्यंत मार्क्सचा क्रांतिकारी समाजवादी विचार पोहचण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

अण्णा भाऊ साठे व कैफी आझमी हे दोघेही 'प्रगतिशील लेखक चळवळ' व 'इप्टा'चे प्रथम सदस्य बनले आणि मग बिनीचे शिलेदार बनले. अण्णा भाऊ हे मुंबईच्या बहुसंख्येने मराठी असणाऱ्या गिरणी कामगार व गोदी कामगारांना क्रांतिप्रवण करण्यासाठी शाहीर

अमर शेख व गवाणकरांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथकातून पोवाडे, लोकनाट्य आदी लोककलांचा प्रभावी वापर करू लागले.

दोघांसाठी सोव्हिएत युनियची क्रांती हे स्फूर्तिस्थान होतं. अण्णा भाऊंनी 'स्टालिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिनचा पोवाडा' आणि 'नानकिंग नगरापुढे' हे तीन आंतरराष्ट्रीय विजयावरचे पोवाडे लिहिले तर कैफी आझमींनी 'सुर्ख जन्नत', 'स्टालिन का फर्मान', 'इस्तालिन', 'रूसी अवाम और जंग', 'फतह-ए-बर्लिन', 'हम आगे बढतेही जा रहे है', 'मास्को' आणि 'लेनिन' या कवितांमधून सोव्हिएत युनियनची क्रांती, त्यांचे लढे आणि तेथे श्रमकऱ्यांचे स्थापन झालेले समताधिष्ठित राज्य याबाबत भरभरून लिहिलं आहे. त्यावरून रशियाचं या दोघांना किती आकर्षण, स्वप्नाळू रुमानी म्हणावं इतपत, होतं हे वाचताना वाचकांच्या लक्षात येतं. पुढे कम्युनिस्ट चळवळीबाबत अपेक्षाभंग झाल्यावर कैफींनी 'आवारा सजदे'सारखी नज्म लिहिली. पण त्यांना व अण्णा भाऊंना साम्यवादी विचारांवरील श्रद्धेमुळे सोव्हिएत युनियनचं अपार आकर्षण होतं. ते जणू त्यांचं श्रद्धास्थान बनलं होतं! आणि ते शेवटपर्यंत कायम राहिलं. कारण त्यांनी कलावंतांच्या संवेदनशील मनानं मार्क्सवाद-साम्यवाद स्वीकारला होता.

अण्णा भाऊ साठे यांचा 'नानकिंग नगरापुढे' हा चीनचा मार्क्सवादी फौजेच्या विजयाचा पोवाडा आज उपलब्ध नाही. मात्र १९४२ साली लिहिलेल्या 'स्टालिनग्राडचा पोवाडा'नं अण्णा भाऊंना कम्युनिस्ट वर्तुळात लोकप्रिय बनवलं व त्यातूनच पुढे स्थापन झालेल्या 'लाल बावटा' या कलापथकात ते सामील झाले. स्टालिनग्राडच्या लढाईत नाझी भस्मासुराचा दारुण पराभव झाला. त्या युद्धाचं तपशीलवार वर्णन करणारा हा पोवाडा आहे. त्याची सुरुवात लक्षवेधक आहे. रशियाकडे दलितांचा आशाकिरण या स्वरूपात पाहात अण्णा भाऊ पोवाड्याची अशी सुरुवात करतात -

दलितांचा आशाकिरण रशियाचा प्राण
जंगजंगी जान लढविले
रोस्तो आणि खार्को, रक्षिले लेनिनग्राड मास्को
नाझीचा काळ तिमेशेंक। जी ऽ जी ऽ ऽ जी ऽ ऽ ऽ

या पोवाड्याबाबत बाबूराव गुरव यांनी 'अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन' या पुस्तकात मार्मिक मत नोंदवले आहे. ते असे आहे,

''आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीला अभिमान वाटावा असा हा कम्युनिस्टांच्या गौरवशाली विजयाचा पोवाडा अण्णा भाऊंनी मुंबईच्या कामगारांसाठी रचून गायला. पोवाड्याची धावती रचना, ओघवती भाषा आणि मांडणीतला वेग यामुळे हा पोवाडा आकर्षक बनला आहे. 'फितुरीची डाकिण'सारखी प्रतिमा, विजयोन्मादाने दारूची नशा चढल्यामुळे रूळ बदलून गडगडा लोळणारी रेलगाडी, गनिम होऊन पाठीमागे लागलेले ओढे-नाले, झाडे, जंगले आणि दिव्यावर पतंगाने झडप घालावी तसे स्टालिनग्राडवर झडप घालणारे नाझी अशा काही प्रतिमांमधून अण्णा भाऊंचे प्रभावी भाषेचे वेगळेपण जाणवते. आंतरराष्ट्रीय वर्गाशी अनुबंध जुळवू पाहणारा हा पोवाडा त्यांची व्यापक विचारविश्वाची सखोल जाण स्पष्ट करतो.''

'बर्लिनचा पोवाडा' हाही सोव्हिएत युनियनचा विजय व हिटलरचा पाडाव सांगणारा आहे. बाबूराव गुरवांच्या मते, ''आज जरी हे दोन्ही पोवाडे गद्यप्राय वाटत असले तरी त्या काळी मुंबईच्या कामगारांसाठी त्यांची निर्मिती झाली होती. हे दोन्ही पोवाडे प्रचारी व प्रबोधनपर होते व आज ते कालबाह्य झाले आहेत. तरी साहित्याच्या इतिहासाने त्यांची जाणीवपूर्वक नोंद घ्यावी एवढे ते महत्त्वाचे दस्तावेज स्वरूपाचे आहेत.''

कैफी आझमींची 'सुर्ख जन्नत' ही नज्मही रशिया व स्टालिन प्रभावाची द्योतक आहे. बोल्शेव्हिक क्रांतीच्या पंचविसाव्या वाढदिवशी त्यावर महायुद्धाचे संकट आल्याच्या निमित्तानं ही कविता लिहिली आहे.

ये रूस जिसको दरिंदे मिटा रहे है आज
यही जमा कदम-ए-इन्किलाब पहले-पहले
यही हयात हुवी कामयाब पहले-पहले
यही उठ रहां है आफताब पहले-पहले
सियाह अब्र (काळे ढग) फरैरे उडा रहे है आज

'स्टालिन का फर्मान' या कवितेत स्टालिन लाल सेनेला उद्देशून फर्मान सोडतो, अशी कल्पना करून कैफी रशियाकडे जगातले डावे विचारांचे लोक कसे पाहतात हे खालीलप्रमाणे वर्णिले आहे. -

नयी दुनिया नयी तहजीब के किरदार हो तुम
जिन्स-ए-आजादी-ए-इन्सां के निरगहदार हो तुम
फौज-ए-मजदूर के सरदार हो सालार हो तुम
हां लढे जावो, लढे जावो, लढे जावो अभी!

कैफींची 'फतह-ए-बर्लिन' ही नज्म अण्णा भाऊंच्या 'बर्लिनचा पोवाडा'शी साम्य दर्शवणारी असली तरी ती अधिक काव्यमय, अर्थपूर्ण आणि असरदार आहे. ते बर्लिन कसं जिंकलं हे सांगण्यापेक्षा त्याचा परिणाम मानवजातीसाठी का व किती महत्त्वाचा आहे, हे काव्यमय भाषेत खालील वर्णिल्याप्रमाणे सांगतात,

फतह का शोला लचककर फूल बरसने लगा
सुर्ख परचस सीना-ए-बर्लिन पे लहराने लगा
जर्रा जर्रा मस्त होकर रक्स (नृत्य) फरमाने लगा

चहचहा उठी फिजा सारा जहां गाने लगा

फेक कर फाशिज्म का बार-ए-नहूसत (अपशकुनाचा बोझ) शान से

आज ली दुनियाने पुरी सांस इत्मीनान से ।

कैफी जेव्हा प्रथम मास्कोला गेले, तेव्हा ते त्यांच्या स्वप्नाचं शहर, समतेचं शहर, शोषणमुक्त शहर पाहून भारावून म्हणतात,

अपने ख्वाबों में जिसे हमने बसा रख्खा था

ये वही शहर-ए-हंसी, शहर-ए-जवां है देखो

लेनिन हा बोल्शेव्हिक क्रांतीचा नायक! त्याच्याबद्दल कैफींची भावना अशी उंचबळून येते,

आस्मां और भी उपर को उठा जाता है

तुमने सौ साल में इन्सां को किया कितना बुलंद!

अण्णा भाऊंचे रशियावरील पोवाडे हे सामान्य कामगारांसाठी गाऊन प्रबोध करणारे होते. त्यामुळे त्यात सूक्ष्मता अपेक्षित नाही आणि ती त्यातली कमतरता पण नाही. पोवाडा हा नायकाच्या पराक्रमाचं वर्णन प्रभावी भाषेत करणारा असतो, म्हणून तो सरळ, थेट व काहीसा ढोबळ असतो. या मर्यादेत आजही त्यांचे स्टालिनग्राड व बर्लिनचे पोवाडा कालबाह्य झाले असले तरी प्रभावी वाटतात. त्या तुलनेत कैफींच्या अस्सल कवित्वानं बहरलेल्या कविता त्यातले प्रासंगिक तपशील वगळून आजही सर्वस्पर्शी वाटतात, हे नक्की!

स्वतंत्र भारताच्या तेलंगण शेतकऱ्यांचा सशस्त्र लढा हा जमीनदारीविरुद्ध कसणाऱ्या शेतकरी कुळांचा कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली लढला गेलेला लढा होता. प्रथम तो निजाम राजवट असताना सुरू झाला. नंतर तो १९५१ पर्यंत चालू होता. पण भारत सरकारनं तो निर्घृणपणे चिरडून टाकला. या तेलंगणाच्या शेतकरी लढ्यावर अण्णा भाऊ साठेंच्या 'तेलंगणचा संग्राम' हा पोवाडा आहे, तर कैफी आझमीची 'तेलंगणा' नामक कविता आहे. दोन्ही रचना या शेतकरी लढ्याच्या उर्ज्वस्वल रूपाचं वर्णन करणाऱ्या आहेत. दोघांनी नंतर हा लढा चिरडून टाकला होता. त्यावर काही लिहिलं का नाही, याचं नवल वाटतं.

अण्णा भाऊंचा 'तेलंगणचा संग्राम' हा पोवाडा तेथील कष्टकरी जनतेने दिलेल्या अभूतपूर्व लढ्याला साथ देण्याचं आवाहन करण्यासाठी लिहिलेला ओजस्वी पोवाडा आहे. 'कसेल त्याची जमीन' हा कायदा करावा व सर्व शेतीचे कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटप करावं यासाठी हा तेलंगणाचा लढा होता. ऐकणारा संतापाने पेटून उठावा असे निजामाच्या व रजाकारांच्या अत्याचाराचे प्रभावी वर्णन या पोवाड्यात करतात. पुढे लढणारा बहाद्दर शेतकरी डगमगला नाही की भयभयीत झाला नाही, हे सांगताना शाहीर अण्णा भाऊ म्हणतात,

परी शेतकरी तेलंगणचा गहूभर नच नमला

सागरापरी निजामावरी उसळुनी वर आला

लोकशाहीसाठी जनतेनं । एक होऊन । लढा उभारिला ॥

बेबंद या सुलतानीचा । नाश करण्याचा । पुकारा केला ॥

जमीनदारी आणि साहुकारी । क्रूर जहागिरी । चूर करण्याला

त्याने निजामाच्या तक्ताला । हैद्राबादेला । हादरा बसविला ॥

निजामी राज्य बरबाद । दुमदुमला नाद ।

उमटे पडसाद । तेलंगण लाले लाल झाला।

वरंगळ नारगोंडा जिल्हा ।

सूर्य पेठेत जोम भरला ।

चारी बाजूंनी उठला शेतकरी । देऊनी ललकारी ।

बाबूराव गुरव यांनी पोवाड्यांचं महत्त्व उलगडून दाखवताना असं लिहिलं आहे की,

''हा लढा म्हणजे केवळ तेलंगणमधला उठाव नसून चाळीस लाख जनतेचा हा मुक्तिसंग्राम आहे. कष्टकरी माणसांच्या अस्मितेचा आणि आकांक्षांचा हा नवा लढा म्हणजे पेटता पलिता आहे, अशा पद्धतीने तेलंगण संग्रामाला वर्गयुद्धाचे शास्त्रीय स्वरूप देण्याचा ते प्रयत्न करतात. जिथे जिथे शोषणमुक्तीचा आवाज उठेल त्या आवाजाला संघटित वर्गलढ्याचे स्वरूप देण्याचा त्यांचा प्रयत्न हा प्रगतिशील लेखक चळवळीच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांच्यावरील गाढ प्रभावाचा द्योतक आहे.''

कैफी आझमींची 'तिलंगना' ही नज्मही शेतकरी सैनिकांचा जयघोष करणारी आहे. त्यांनीही प्रगतिशील लेखक चळवळीनं लोकप्रिय केलेल्या डाव्या विचारांच्या प्रतिमा वापरून ही कविता लिहिली आहे.

चमक रहे है गठीले शानों पे फावडे, बेलचे, कुदाले

उड रही है हवां में चिंगारीयां तुफंगो की गर्म नाले

वो गोलियाँ बेझिझक लहू मैं जो बादशाहाओं के भी नहाले

वो गोफने जो ताज गिरा ले ।

ये जस्त (उडी) रूस के मैदान ने सिखाई है

ये फौज चीन से होती दखन में आयी है

वो उठ खडे हुवे धरना दिए जो बैठे थे

कि आज शाह के ऐवान (महल) पर चढाई है...

ही अशी अण्णा भाऊ साठे व कैफी आझमींच्या विचारधारा व कवित्वातील साम्यस्थळे आहेत. अण्णा भाऊ हे पट्टीचे व हाडाचे शाहीर होते आणि त्यांचा श्रोता होता सामान्य, अल्पशिक्षित मराठी

गिरणी कामगार. त्याला लोककलेच्या म्हणजेच पोवाडा आदींच्या माध्यमातून प्रबोधनपर विचार देण्यासाठी त्यांची शाहिरी सुबोध आणि बोलीभाषेत अवतरते. त्यामुळे त्याच्यात सूक्ष्मता व काव्यात्म प्रतिमाविश्व असणार नाही, हे उघड आहे.

याउलट कैफी हे मूळचे कवी आहेत. त्यांचे उर्दूवर असामान्य प्रभुत्व आहे. त्यामुळे त्यांच्या तात्कालिक विषयावरील कविताही कालजयी होतात. त्यांनी उर्दूमधला वृत्त-छंदात अडकलेला गजल हा काव्यप्रकार न हाताळता मुक्तछंद-नज्म हा काव्यप्रकार अभिव्यक्तीसाठी निवडला. त्यामुळे त्यांच्या कविता आजही ताज्या वाटतात.

पाच

अण्णा भाऊ साठेंनी शाहिरी काव्य विपुल लिहिलं. खासकरून संयुक्त महाराष्ट्र लढ्यातलं त्यांचं 'लाल बावटा' पथकाद्वारे प्रचार करून दिलेलं योगदान न विसरता येण्याजोगं आहे. त्यांचे 'महाराष्ट्राची परंपरा', 'अमळनरेचे अमर हुतात्मे', 'मुंबई गिरणी कामगार' आदी पोवाडे; 'माझी मैना गावाकडे राहिली' सारखी लावणी आणि 'जग बदल घालुनी घाव । सांगुनी गेले मज भीमराव' सारखे भीमगीत यातून त्यांची अस्सल एतद्देशीय शाहिरी फुललेली दिसून येते. ते सर्वार्थाने शाहीर होते. त्यांनी पारंपरिक पोवाड्यांपेक्षा वर्तमानकाळातील सर्वहारा वर्गाच्या प्रबोधनासाठी शाहिरी काव्य प्रसवले. त्या साऱ्याचा आढावा घेणे या छोट्या लेखाच्या मर्यादेत शक्य नाही.

पण आज अण्णा भाऊ आठवले जातात, ते त्यांच्या कादंबरी व कथांसाठी. 'फकिरा'च्या रूपाने त्यांनी मराठी साहित्यात प्रथमच दलित हिरो आणला. त्यांनी सर्व दलितांना—मग तो भटके विमुक्त असू दे की बलुतेदार असू दे, त्यांना—नायकत्व-नायिकत्व बहाल केलं. त्या अर्थानं त्यांना मराठी दलित साहित्याचे जनक म्हटलं, तर वावगं ठरणार नाही.

अण्णा भाऊ साठेंनी पारंपरिक तमाशाला फाटा दिला आणि आपल्या विलक्षण प्रतिभेने आधुनिक लोकनाट्य या मुक्तनाट्याला जन्म दिला. गवळणीला फाटा देणं, गणात ईशस्तवनऐवजी देश व शिवाजीचं स्तवन करणं आणि वगनाट्यात आजच्या काळाचं कथानक व कष्टकरी-श्रमकरी पात्रं निर्माण करून त्यांनी आपल्या पुरोगामी व प्रगतिशील कलाविचारांचा पूर्ण सामर्थ्याने प्रत्यय आणून दिला. आजचे लोककलावंत ते विसरून पुन्हा रंजन आणि पारंपरिक नाट्यात गुरफटलेले दिसतात. त्यांच्या कलाकृतीत पासंगालाही पुरोगामित्व नसतं!

अण्णा भाऊ हे शेवटपर्यंत कम्युनिस्ट होते. तरीही त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितमुक्तीच्या व जातिअंताच्या लढ्याचे महत्त्व—ते स्वत: दलित मांग समाजाचे असल्यामुळे—ओळखलं होतं, म्हणून त्यांच्या वाङ्मयात लाल सलाम सोबत जय भीमचा सुरेख संयोग झाला आहे. भारतात केवळ वर्गविहीन समाज निर्माण करून समता येणार नाही, तर जातविहीन समाजही निर्माण झाला तरच समता व बंधुता येईल आणि शोषणमुक्त समाज होईल, हे त्यांनी जाणलं होतं. म्हणून 'जग बदल घालूनी घाव सांगून गेले मज भीमराव।' असंही त्यांनी कवन केलं हे लक्षात घेण्याजोगं आहे.

याउलट कैफींनी नज्म स्वरूपात विपुल काव्य लिहिलं. त्यांच्या नावावर चार काव्यसंग्रह आहेत. त्यांनी आयुष्यभर प्रगतिशील अर्थात तरक्कीपसंद विचारांची कधी कास सोडली नाही. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'झनकार'मध्ये प्रचारी कविता काही प्रमाणात जरूर आहेत, पण पुढील काळात त्यांची कविता अधिक सूक्ष्म व सखोल होत गेली. प्रगतिशील विचारांसोबत त्यांच्या प्रेम व मानवी भावभावनांच्या कविताही त्यातील पुरोगामी आशयामुळे वेगळ्या व आजही ताज्या वाटतात. त्यांच्या कवितेचा जो दुसरा स्वर आहे तो म्हणजे, हिंदू-मुस्लीम एकता आणि गंगा-जमनी तहजिबचा पुरस्कार. या दृष्टीने यांच्या 'सोमनाथ', 'साप', 'बहु रुपिनी' व 'दुसरा बनवास' यांसारख्या कविता भारतीय साहित्यात अजोड आहेत. त्यांचं मोजकंच असलेलं चित्रपट गीतलेखनही तेवढंच प्रभावी व काव्यगुणांनी ओतप्रोत भरलेलं आहे.

आज जन्मशताब्दीच्या वर्षात अण्णा भाऊ साठे व कैफी आझमींचं स्मरण का करायचं, याचं उत्तर साधं व सरळ आहे. जागतिकीकरणाच्या रौप्य महोत्सवानंतर भारताचं आजचं चित्र काय आहे? गरिबी-श्रीमंतीमधील वाढती दरी, अधिक सर्वंकष व निर्घृण झालेलं शोषण आणि मानवी स्वातंत्र्याचा संकोच करणारी धर्मांधता व जातीयता यामुळे प्रगतिशील लेखक चळवळीतला कलाविचार नव्या स्वरूपात पुन्हा साहित्यात अवतरला पाहिजे. त्यासाठी जॉर्ज लुकासनं मांडलेल्या चिकित्सक वास्तववादी (क्रिटिकल रिॲझिम) आणि समाजवादी वास्तववाद (सोशालिस्ट रिॲझिम) याचा संयोग करून साहित्याला नवं आधुनिक व पुरोगामी वळण दिलं पाहिजे. नव्या एकविसाव्या शतकात नवे अण्णा भाऊ साठे व नवे कैफी आझमींसारखे कलावंत सामान्य माणसाचा आवाज बनत त्यांना आत्मबळ देण्यासाठी व मूल्यविहीन समाजात नवी पुरोगामी व समतेची मूल्यं पेरण्यासाठी निर्माण झाले पाहिजेत. तशी आपण अपेक्षा करूया.

**(युगांतर दिवाळी अंक २०१९च्या सौजन्याने)**

❐

# गांधीजींची हत्या आणि ५५ कोटी : वस्तुस्थिती समजून घेताना...

■ सेवाग्राम कलेक्टिव्ह

गांधीजींनी देशाची फाळणी केली. त्यांनी मुस्लिमांचे लाड केले. हिंदूंचा छळ केला. धार्मिक दंगे झाले. त्यांनीच पाकिस्तानला ५५ कोटी द्यायला लावले. त्यामुळेच नथुराम गोडसेने भडकून गांधीजींवर गोळ्या झाडल्या. असं सतत सांगण्यात येते. एखादी गोष्ट सतत सांगत राहिली की ती आपल्याला खरी वाटायला लागते. ही प्रचाराची पद्धत हिटलरचा प्रचारमंत्री गोबेल्सची आहे. हे सतत आपण जे ऐकत आहोत ते कसं धादांत खोटे आहे ते आपण बघूच. त्याचबरोबर ते असं का करतात, त्यांचा हे करण्याचा हेतू काय तेही बघू.

आपल्या देशात गेली कित्येक शतके हिंदू आणि मुस्लीम एकत्र नांदत आहेत. घरात कधी कधी भांडणे होतात तशी या दोघांच्यातही कधीकधी भांडणे होतात म्हणून कोणी घर तोडायला जात नाही. भांडणे कधी कधी होतात पण प्रेमासंबंधाचे धागे बळकट असतात. हिंदू आणि मुस्लीम संस्कृतीसंगम इतका घट्ट आणि खोलवर आहे की त्यांना विलग करण्यासाठी ब्रिटिशांना खूप आटापिटा करायला लागला. स्वामी विवेकानंद म्हणाले आहेत 'मुसलमानांनी हिंदूंवर मिळविलेला विजय हा गोरगरिबांच्या आणि दलितांच्या उन्नतीला कारणीभूत झाला. म्हणूनच आमच्यापैकी एक पंचमांश लोक मुसलमान झाले. केवळ तलवारीच्या बळाने हे सर्व धर्मांतर घडले असे म्हणणे कमालीचे वेडेपणाचे ठरेल.' ते पुढे म्हणतात 'वेदांती आत्मा आणि इस्लामी देह धारण करूनच आधुनिक भारताची प्रगती होईल.'' न्यायमूर्ती रानडे यांनीसुद्धा हिंदू मुस्लीम एकतेचा पुरस्कार केला तर १९१६ मध्ये लोकमान्य टिळकांनी लखनौ करार केला. या कराराप्रमाणे मुसलमानांना ५० टक्क्यांपर्यंत राखीव जागा देण्यात आल्या होत्या. 'परकीय सरकारशी भांडून यशस्वी होण्यासाठी हिंदू मुसलमानांनी आपापसातील भांडणे कसेही करून मिटविली पाहिजेत. सर्व धर्मभेद, जातिभेद आणि मतभेद मिटवून एकच मागणी केली पाहिजे.'' या वृत्तीने टिळकांनी हा करार केला होता. (भारतका स्वतंत्रता संग्राम / बिपीन चंद्र / १४ वी आवृत्ती/ १२०)

स्वामी विवेकानंद, न्या. रानडे आणि लोकमान्य टिळकांवर कुणीही मुस्लीम धार्जिणेपणाचा आरोप करत नाही, आणि गांधीजींनी मुस्लिमांच्या सवलतीसाठी काहीही केलेले नसताना त्यांच्यावर सरसकट आरोप केला जातो.

मुस्लिमांचे लाड करणारे गांधीजी असा आरोप करताना म्हटले जाते की, गांधीजींनीच फाळणी केली. आता खरं काय आहे ते बघू. १९३७ सालच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात वि. दा. सावरकरांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. म्हणजे दोन राष्ट्रे वेगवेगळी आहेत एक नव्हेत हे जीनांच्या आधी हिंदुराष्ट्रवादी सावरकरांनी मांडले. ते म्हणाले 'India cannot be assumed today to be a Unitarian and homogeneous nation. But on the contrary there are two nations in the main the hindus and the muslim (संदर्भ : समग्र सावरकर वाङ्मय /२९६ ). देशातील तापलेल्या वातावरणात अखंड हिंदुस्तानचा घोष करून तेल ओतायचे आणि दुसरीकडे द्विराष्ट्रवाद मांडत राहायचा. १९४३ साली सावरकर म्हणतात "I have no quarrel with Mr.Jinnah's two nations

theory. We the hindus are a nation by ourselves; and it is a historical fact that the hindus and muslims are two nations." गांधींना उघड विरोध आणि जिना आणि ब्रिटिशांना छुपा पाठिंबा अशी कुटिल नीती हिंदुराष्ट्राचे प्रवक्ते वि. दा. सावरकर खेळत होते.

गांधीजींनी फाळणी होऊ नये म्हणून अतोनात प्रयत्न केले. जिनांच्या सोबत झालेल्या १३ बैठका निष्फळ ठरल्या. अखंड भारताच्या प्रमुखपदी जिनांना बसवावे ही मागणी गांधीजींनी केली. तीसुद्धा जिनांनी फेटाळून लावली. गांधीजींचे सर्व प्रयत्न असफल ठरविले गेले. आता नवीन प्रश्न निर्माण होतात की फाळणी होत असताना हे हिंदुत्ववादी, म्हणजे अखंड हिंदुस्थानचे पुरस्कर्ते काय करत होते? हीच मांडली अहिंसेची टिंगल करून सशस्त्र क्रांतीचा उदोउदो करत होती. मग त्यांच्या बंदुका, पिस्तुले कुठे गेली होती? पाकिस्तानचे पुरस्कर्ते महंमदअली जिना, हैद्राबादचा अत्याचारी निजाम हे सगळे सुखात होते. या सशस्त्र क्रांतीच्या पुरस्कर्त्यांनी १९४७ पर्यंत एकही गोळी उडविली नाही. एकाही मुस्लीम शत्रूला किंवा ब्रिटिश शत्रूला त्यांनी मारलं नाही. फक्त त्यांची गोळी त्यांनी फक्त गांधीजींसाठीच का राखून ठेवली होती?

आतापर्यंत आपण हिंदुत्ववाद्यांचा दुटप्पीपणा पाहायला. आता आपण त्यांनी पसरविलेल्या अफवा आणि त्यांनी गांधीजींना का मारले असावे याकडे वळू.

भारताची फाळणी झाली. एका घराची दोन घरे झाली. दोन घरे करताना संपत्तीची वाटणी करावी लागते. तशीच दोन देश झाल्यावर संपत्तीची वाटणी करायचा करार झाला. पाकिस्तानला ७५ कोटी देण्याचे ठरले. त्यातले २० कोटी दिले गेले. त्यानंतरच्या काळात काश्मिरी टोळीवाल्यांनी काश्मीरवर आक्रमण केले. काश्मीरवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आक्रमण केले म्हणून आपण ५५ कोटी देऊ नयेत अशी भूमिका मांडण्यात आली. मात्र हे पैसे देण्यात यावेत असा आग्रह लॉर्ड माऊंटबॅटन, चक्रवर्ती राजगोपालचारी आणि रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर सी. डी. देशमुख यांनी धरला. हे पैसे द्यावेत कारण तसा करार झालेला आहे आणि नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाने पहिल्याच आंतरराष्ट्रीय कराराचा भंग केल्यास जगभर विपरीत संदेश जाईल आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होईल, अशी त्यांची मांडणी होती. ही झाली ५५ कोटी रकमेची कहाणी.

मुळात गांधीजीनी ५५ कोटींसाठी उपोषण केलेच नव्हते. गांधीजींचे उपोषण १३ जानेवारी १९४८ साली सुरू झाले. १४ जानेवारीला पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने एकमताने घेतला. मात्र गांधीजींचे उपोषण १८ जानेवारीपर्यंत सुरू होते. उपोषण सुरू करण्याचा उद्देश आणि उपोषण सोडताना ज्या गोष्टींची गांधीजींनी हमी घेतली त्यातही ५५ कोटींचा उल्लेख नव्हता.

वाटणीच्या करारामध्ये या ७५ कोटी रकमेसोबत अनेक साहित्याची वाटणी करायचे ठरले होते. तो करार वाचून ती वाटणी त्याप्रमाणे झाली का याची तपासणी कोणत्याही आरोप करणाऱ्याने केली नाही. रेल्वेच्या काही वाघिणी भरून दारूगोळा आणि युद्धसाहित्य देण्याचेही या करारात नमूद केले होते. मात्र भारताने ते दिले नाही. याबद्दल ५५ कोटींबद्दल आरोप करणारे मौन का पाळतात?

गमतीचा भाग म्हणजे १४ जानेवारी १९४८ रोजी मंत्रिमंडळाने पाकिस्तानच्या ५५ कोटी रुपये देण्याचा निर्णय एकमताने घेतला. या मंत्रिमंडळात हिंदू महासभेचे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी होते. त्यांनी या निर्णयाला विरोध केला नाही किंवा मंत्रिमंडळाचा निषेध म्हणून राजीनामा देऊन बाहेर पडले नाहीत.

गांधीजींचा खून होण्यापूर्वी त्यांच्यावर एकूण पाच खुनी हल्ले झाले हे कपूर कमिशन पुढे आलेल्या साक्षीवरून सिद्ध झाले आहे. २५ जून १९३४ रोजी पहिला हल्ला पुण्यात झाला. त्यांच्या गाडीवर बॉम्ब टाकला गेला. सप्टेंबर १९४४ मध्ये सेवाग्राम आश्रमातून गांधीजी मुंबईला जायला निघाले असताना हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना धक्काबुक्की केली. त्यावेळी पोलिसांनी नथुराम गोडसे आणि ल. ग. थत्ते यांना अटक केली. २९ जून १९४६ मध्ये गांधीजी मुंबई पुणे प्रवास करत असताना रेल्वेपुढे मोठ्या मोठ्या दरडी पसरण्यात आल्या.

आपल्याला हे दिसून येईल की गांधीजींवर झालेले हल्ले हे प्रामुख्याने महाराष्ट्रात झालेले आहेत आणि पहिला हल्ला १९३४ मध्ये म्हणजे १९३२ च्या येरवडा करारानंतर झाले आहेत.

अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ देऊ नयेत म्हणून गांधीजींनी उपोषण केले आणि शेवटी गांधी आंबेडकर करार झाला. या करारातून अस्पृश्यांना अपेक्षेपेक्षा खूपच जास्त राखीव मतदारसंघ मिळाले. त्यानंतर गांधीजींनी हरिजन सेवेस वाहून घ्यायचे ठरविले. गांधीजींनी देशभर झंझावाती दौरे केले. त्यांच्या प्रेरणेमुळे अनेक मंदीरे आणि पाणवठे दलितांसाठी खुले झाले. सामुदायिक भोजनाचे कार्यक्रम होऊ लागले. खुलेआम आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार होऊ लागला. गांधीजींनी तर जाहीर केले की ते फक्त आंतरजातीय विवाहांनाच हजर राहतील. मात्र हे करत असताना गांधीजींची भाषा धर्माचीच होती. त्यांच्या भाषणातून कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जात नव्हत्या. ते धर्माच्या गाभ्याचा आधार घेऊन हिंदजनांच्या

सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करत असत. इथेच हिंदुत्ववाद्यांचे धाबे दणाणले. गांधीजींच्या धार्मिक आवाहनांपुढे त्यांच्या प्रचाराचा प्रभाव पडेनासा झाला. सच्चा हिंदू आणि सच्चा मुसलमान यात मला फरक दिसत नाही हे गांधीजींचे सांगणे जनतेने स्वीकारले मात्र यातून अस्वस्थ झाले ते फाळणीची मागणी करणारे जिना आणि द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडणारे हिंदुत्ववादी. ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा राजकारणाचा भाग म्हणून जिना आणि मुस्लीम लीगला दत्तक घेतले होते. मात्र स्वातंत्र्य चळवळीशी काहीही संबंध नसलेल्या रा. स्व. संघ आणि हिंदुत्ववादी मंडळींना भारतीय जनतेने गांधीजींच्या विचाराचा केलेला स्वीकार भयानक अस्वस्थ करत होता.

भारत पाकिस्तानच्या फाळणीच्या निर्णयाने देशात दंग्यांचा आगडोंब उसळला. सीमावर्ती भाग आणि देशातील काही भागांत हिंदू मुस्लिमांनी एकमेकांची कत्तल सुरू केली. लाखो हिंदू आणि मुस्लिम यात मारले गेले. धार्मिक द्वेषाचे विष भारतीय मनात पसरू लागले. मात्र यावेळी दंगली थांबवायला जिना आणि त्यांची मुस्लीम लीग नव्हती. त्यांना त्यांचे पाकिस्तान मिळाले होते. हिंदुत्ववादी मंडळी दंगल थांबविण्याच्या प्रक्रियेत कुठेच सामील नव्हती. फक्त महात्मा गांधी देशभर फिरत होते. त्यावेळीही गांधीजींचा प्रभाव सर्वांना कळला. हा माणूस जेथे जातो तेथील दंगे थांबतात. दोन्ही धर्मातील गुंडांना पश्चात्ताप होतो. हत्यारे स्वखुशीने त्यागली जातात. हिंदू मुस्लीम एकत्र येतात. समाजजीवन सुरळीत होते. म्हणजे जोपर्यंत गांधी जिवंत आहेत तोपर्यंत आपण शूद्रातिशूद्रांना परंपरेप्रमाणे वागवू शकणार नाही आणि हिंदू मुसलमानांमध्ये तेढ निर्माण करू शकणार नाही हे हिंदुत्ववाद्यांना स्पष्ट झाले. आपल्या विचारातील मोठा अडथळा गांधी हाच आहे हे त्यांना कळून चुकले.

न्यायालयात हे सिद्ध झाले की, गांधींच्या खुनाचा कट १ जानेवारी १९४८ पूर्वीच रचण्यात आला होता. त्यावेळी ५५ कोटी हा विषयच नव्हता. खुनाचे कारण वेगळेच आहे.

स्वातंत्र्य चळवळीतून निर्माण झालेला राष्ट्रवाद हा आक्रमक आणि हिंसक नाही तर सर्वसमावेशक आणि बहुसांस्कृतिकतेचा पुरस्कार करणारा आहे. या राष्ट्रवादाला या संस्कृतीचे नेमके भान आहे. भारतीय संस्कृतीतील सर्वसमावेशकता, विविधता, अनेक चालीरीतींचा मिलाफ आणि त्यातील परस्पर प्रेम आणि सौदार्ह यातूनच गांधीजींना सर्वधर्मसमभावाचा विचार पुढे न्यायचा होता. या विचारांच्या मिलाफातून नवीन सुंदर भारत घडविण्यास विरोध करणाऱ्या विचारांनीच गांधीजींना ठार मारले.

('देशाची फाळणी' हा विषय खूपच व्यापक असून त्या संपूर्ण विषयाचा या टिपणात आढावा घेणे शक्य नाही. सध्या समाज माध्यमांवर गांधीजींबद्दल गैरसमज पसरविण्याचे काम जोरात सुरु आहे. त्यातील एक गैरसमज आहे...' गांधीजी फाळणीला जबाबदार होते आणि त्यांनी पाकिस्तानला ५५ कोटी द्यायला लावले.' या सर्व गैरसमजांचा आढावा घेऊन त्याला थोडक्यात उत्तर देणे हा या टिपणाचा उद्देश आहे. विविध लेख आणि पुस्तकांचा आधार घेऊन हे टिपण लिहिले आहे.) ❒

---

# कॉ. विमल मेणसे यांचे निधन



**बेळगाव :** सरस्वती नगर येथील कॉ. विमल कृष्णा मेणसे (वय ८३) यांचे शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, कामगार नेते, लेखक **कृष्णा मेणसे** यांच्या त्या पत्नी होत्या. निकटवर्तीयांत त्या ताई म्हणून परिचित होत्या. विविध आंदोलनातील कार्यकर्त्यांना त्यांचा मोठा आधार वाटायचा. त्यांच्या पश्चात पती कृष्णा मेणसे, मुलगा प्राचार्य आनंद मेणसे, संजय व दोन विवाहित कन्या, नातवंडे असा परिवार आहे.

अन्नपूर्णा परिवाराशी त्यांचा स्थापनेपासुन संबध होता. प्रेमा ताई पुरव या गोवा मुक्ती संग्रामातील सहभागाबद्दल हद्दपार झाल्या नंतर बेळगांव येथे प्रथम स्थायिक झाल्या त्यावेळी विमलाताईंनी त्यांची मोठ्या बहिणीच्या मायेनें पाठराखण केली. अन्नपूर्णा महिला मंडळातर्फे सेक्रेटरी मेधा व जयंत सामत हे त्याच्या अंत्ययात्रेस उपस्थित होते. सायंकाळी साडेसहा वाजता सदाशिवनगर स्मशानभूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. कॉ. विमलताईंना अन्नपूर्णा परिवारा तर्फे भावपूर्ण आदरांजली.

# वरूण ग्रोवरची मुलाखत

■ **समीर शेख** - sameershaikh7989@gmail.com
Mob. : 9420496263

गीतकार, लेखक, पटकथालेखक, संवादलेखक, स्टँडअप कॉमेडियन असे सर्वच कलाप्रकार यशस्वीपणे हाताळत लोकप्रिय, परंतु अर्थगर्भ आशयनिर्मिती करणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे वरुण ग्रोवर.

वरुणच्या सिनेसृष्टीतील प्रवासाची सुरूवात झाली २००४ मध्ये. 'स्टार वन' या वाहिनीवरून प्रसारित होणाऱ्या 'द ग्रेट इंडियन कॉमेडी शो' या कार्यक्रमासाठी तो लेखन करू लागला, मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिली ती २०१२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गँग्ज ऑफ वासेपूर' या सिनेमाच्या गीतांनी. विशेष म्हणजे 'गार्डियन' या जगप्रसिद्ध वृत्तपत्राने जगभरातील सर्वोत्तम १०० सिनेमांची यादी नुकतीच प्रसिद्ध केली. त्यात 'गँग्ज ऑफ वासेपूर'चा समावेश करण्यात आलाय. या सिनेमाला इतक्या उंचीवर पोहोचविण्यात वरुणने लिहिलेल्या १७ गीतांची प्रमुख भूमिका राहिली आहे.

पुढे २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दम लगा के हैशा' या चित्रपटातील 'मोह मोह के धागे' या गीतासाठी त्याला राष्ट्रीय पुरस्कारही मिळालाय. मात्र इतक्यावरच समाधान मानेल तो वरूण कसला! अगदी सुरुवातीपासून कथा लिहीत असला तरी, पटकथालेखक म्हणूनही त्याचे नाव चर्चिले जाऊ लागले ते 'मसान' या वास्तववादी सिनेमामुळे. काळाची पावले ओळखून त्याने वेबसीरिज या कलाप्रकारातही हात अजमावला. 'सेक्रेड गेम्स' या लोकप्रिय वेब-सीरिजचे लेखन वरुणने केलंय. पडद्यामागचा 'मिडास राजा' म्हणवण्याइतपत त्यानं मिळालेल्या संधीचं सोनं केलंय.

एकीकडे अतिशय संवेदनशीलतेला हात घालणारी गीते आणि पटकथा, तर दुसरीकडे मानवी स्वभावातील विकृतींवर भाष्य करणारी गंभीर स्वरूपाची मालिका.... हे दोनही प्रकार वरुणने लीलया हाताळले. हे कमी म्हणून की काय, म्हणून तो स्टँडअप कॉमेडीही करतो. त्याच्या 'ऐसी तैसी डेमोक्रॅसी' नावाच्या कार्यक्रमाचे देश-विदेशांत प्रयोग होतात. इंटरनेटवर त्याचे 'गंभीर विनोद' प्रचंड लोकप्रिय ठरताहेत. भारतीय मानसिकता, त्यांमधील विरोधाभास यांचं सूक्ष्म निरीक्षण करणारा वरूण येथील समाजकारण, राजकारण यांच्यावर उपहासात्मक भाष्य करून आपल्याला अंतर्मुख व्हायला भाग पाडतो.

आयआयटी ग्रॅज्युएट असलेला हा इंजिनीअर तरुण गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून लेखक बनण्यासाठी मुंबईत आला आणि एकापाठोपाठ उत्तमोत्तम कलाकृतींची निर्मिती करू लागला. दर वेळी असं वाटत राहतं, वरुणचे हे सर्वोत्तम काम आहे. मात्र पुढच्या वेळी तो पूर्वीपेक्षा अधिक उत्तम काम करून दाखवतो. दर्जा आणि सातत्य यांचं मनोरंजनक्षेत्रातील आजच्या काळातील सर्वोत्तम उदाहरण म्हणजे वरुण ग्रोवर.

अशा या हरहुन्नरी अवलिया तरुणाची जडण-घडण, त्याचे मनोविश्व आणि सौंदर्यदृष्टी, लेखनातील प्रेरणा या सर्वांचा वेध घेण्याचा प्रयत्न मुलाखतीद्वारे करण्यात आलाय...

प्रश्न : - वरुण, येत्या जानेवारीत तू वयाची चाळिशी पार करतोयस, पण तुला स्क्रीनवर पाहताना तुझ्या वयाचा बिलकूल

अंदाज येत नाही. तुझ्या शिडशिडीत अंगकाठीकडे पाहिलं की, तू २८-२९ वर्षांचाच असशील, असं वाटतं. असो. आपल्या मुलाखतीच्या पहिल्या प्रश्नाकडे येतो. तुझा जन्म हिमाचलचा. मात्र डेहराडून-उत्तराखंड आणि लखनौ - उत्तर प्रदेश या ठिकाणीही तू आयुष्याची काही वर्षे व्यतीत केलीस. याचं कारण तुझं शिक्षण होतं, की घरच्यांची नोकरी?

- वडिलांची नोकरी हेच मुख्य कारण होतं. ते मिलिटरी इंजिनीअरिंग सर्व्हिसेस अर्थात 'एमईएस' मध्ये तहयात कार्यरत होते. त्यामुळे ठरावीक वर्षांनंतर त्यांची बदली होत राहायची. सुरुवातीला हिमाचल, मग डेहराडून, तिकडून लखनौ आणि मग चंदिगड असा बदल्यांचा (आणि सोबतच आमचाही) प्रवास होत राहिला. आम्ही बिऱ्हाड हलवलं की, माझी आई नव्या ठिकाणी शिक्षिकेची नोकरी बरोबर शोधून काढायची आणि प्रत्येक ठिकाणी शिक्षिका म्हणून तिला खूपच सन्मान मिळायचा.

प्रश्न – आई-वडील दोघेही उच्चशिक्षित आणि नोकरदार असल्याने तुझ्या घरी अभ्यासाचे वातावरण असेलच. शाळा-कॉलेजात असताना अभ्यासात तुझी गती कशी होती? तेव्हा मोठा होऊन काय बनण्याचं स्वप्न पाहायचास?

- बचपन से ही मुझे पढ़ने -लिखने का बहुत शौक था. माझा लहान भाऊ तरुण शाळेत कायम पहिला क्रमांक मिळवायचा. तसा मीसुद्धा पहिल्या तीनमध्येच असायचो. आम्ही दोघं भाऊ शालेय पाठ्यपुस्तकांच्या बरोबरीनं बाल-कादंबऱ्या आणि नियतकालिकांचा अक्षरश: फडशा पाडायचो.

आणि मोठा झाल्यावर लेखक व्हायचं, हे मी लहानपणीच मनाशी पक्कं केलं होतं; मात्र लेखक होतात कसं, हे मला ठाऊक नव्हतं. बरं मी पडलो लाजाळू, त्यामुळे याविषयी कुणालाही काही विचारलं नाही. एकदा कुठल्या तरी पुस्तकात एक ओळ वाचली होती. 'चांगले पुस्तक तेच असते, जे वाचताक्षणी आपल्या मनात येतं की, यार या पुस्तकाचे लेखक/लेखिका आपले मित्र/मैत्रीण का नाहीत!' मलाही नेहमी असंच वाटायचं. मग मी लेखकांच्या नावाकडे लक्ष द्यायला लागलो, त्यापूर्वी पुस्तकं 'जादूई' वाटायची. असं वाटायचंप की, ती अनंत काळापासून अस्तित्वातच आहेत. जणू ती कुणी लिहिलेलीच नसावीत, तर थेट प्रकटच झाली असावीत. मग हळूहळू कळायला लागलं की, पुस्तकं प्रकट व्हायलासुद्धा एक निमित्त लागतं - एक जरिया चाहिये और वो जरिया होता है लेखक.

प्रश्न – आयआयटीमध्ये प्रवेश घेण्याचं कुणाचं स्वप्न नसतं? पण अभ्यासात जेमतेम असणारी मुलं अशा मातब्बर संस्थांच्या प्रवेश परीक्षांना बसायलाही घाबरतात. तू मात्र प्रवेश परीक्षा पास करून आयआयटी बनारस येथे प्रवेश मिळवलास आणि २००३ मध्ये इंजिनीअर बनून आयआयटीतून बाहेर पडलास. या प्रवासाविषयी काय सांगशील....?

– आयआयटीची प्रवेश परीक्षा पास होणं, ही माझ्या आयुष्यातील तोपर्यंतची सर्वात मोठी अचिव्हमेंट होती अर्थात आज माझ्या लक्षात येतंय की, मेरिटची ही सगळी संकल्पनाच मुळी पोकळ आहे. मुळात आयआयटीपर्यंत पोहोचण्यामध्ये माझ्या मेहनतीचा जितका वाटा होता, तेवढाच - किंबहुना त्याहून जास्त वाटा - मला मिळालेल्या प्रिव्हिलेजचाही होता. एका मध्यमवर्गीय सवर्ण हिंदू परिवारात जन्म घेणे म्हणजे लॉटरी लागण्यासारखंच असतं. सर्वसामान्य लोकांना मिळत नाहीत, अशा अनेक संधी मला त्यामुळेच मिळत गेल्या.

पण तेव्हा माझ्यासाठी तीच मोठी अचिव्हमेंट होती. त्यामुळे प्रवेशपरीक्षा पास झाल्यानंतर १९९९ मध्ये सिव्हिल इंजिनीअरिंग करण्यासाठी मी बनारसला (वाराणसी) आलो आणि बनारस हिंदू विद्यापीठ व बनारस शहराच्या प्रेमात आकंठ बुडालो. त्या चार वर्षांनी मला आयुष्यभराची नाती, समज आणि आत्मविश्वास दिला. त्या बळावरच तर मी अजूनही टिकून आहे.

प्रश्न – आयआयटीतून बाहेर पडल्यावर तू थेट पुण्यातल्या एका आयटी कंपनीत रुजू झालास. त्या काळात आयटी फिल्डचं तरुणाईला प्रचंड आकर्षण होतं. पैसाही बक्कळ असतो या क्षेत्रात. तू मात्र २००२ ते २००३ अशी जेमतेम एक वर्षच नोकरी करून या क्षेत्राला रामराम ठोकलास. काय घडलं होतं तेव्हा?

- आयआयटीतून पास झाल्यावर मी पुण्यात नोकरी स्वीकारली ते तिथं एफटीआयआय आहे म्हणूनच, शिवाय मुंबई शहर पुण्याजवळ होते हेही एक कारण. मुझे IT की नौकरी का कोई शौक़ नहीं था और जॉईन करने के बाद तो बची खचि इच्छा भी भस्म हो गयी. केवळ ११ महिन्यांतच नोकरीचा राजीनामा दिला आणि थेट मुंबई गाठली.

प्रश्न - आपल्या मुलाने आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थेतून शिक्षण पूर्ण केले असेल, तर पालक त्याच्या भविष्याविषयी निश्चिंत होऊन जातात. पण तू तर गलेलठ्ठ पगार, सुखासीन आयुष्य सोडून अनिश्चिततेने भरलेला मार्ग निवडण्याचा निर्णय घेतलास, तेव्हा तुझ्या आई-वडिलांची प्रतिक्रिया काय होती?

- माता-पिताने बचपन से ही अपने रास्ते खुद्द चुनने की सीख दी है, और हमेशा बड़ी ईमानदारी से इसका हिस्सा निभाया भी है.

पुण्यातील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून मुंबईत लेखक बनण्यासाठी जातोय, असं जेव्हा मी वडिलांना सांगितलं; तेव्हा ते अजिबात रागवले नाहीत, ना त्यांनी कुठली शंका घेतली. ''पुढे कसं होणार? तू नीट विचार केलायस का?'' असं एकदाही त्यांनी विचारलं नाही. उलट तत्परतेने ते इतकंच म्हणाले, 'अगर कोई जरूरत हो तो बता देना.' आईची प्रतिक्रियाही काहीशी अशीच होती. यहाँ एक बार फिर मेरा प्रिव्हिलेज, मेरे जन्म की लॉटरी, मेरे काम आयी ।

प्रश्न – महाराष्ट्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य अत्रे, लेखक, कवी, पत्रकार, शिक्षक, संपादक, राजकारणी, नाटककार, दिग्दर्शक अशा अनेक भूमिका लीलया पेलणारे अत्रे हे उच्च कोटीचे सटायरिस्टही होते. शिव्या ही वाङ्मयातील हिंसा असेल तर विनोद ही वाङ्मयातील अहिंसा आहे, असे ते म्हणायचे. त्या अर्थाने तू गांधीवादीच भासतोस. तुझे विनोद तसेच तर आहेत. एकूणच कॉमेडी, सटायर आदींविषयाची तुझी स्वत:ची फिलॉसॉफी काय आहे?

- विनोदाविषयी माझी समज तयार झाली ती शरद जोशी, हरिशंकर परसाई आणि श्रीलाल शुक्ल या हिंदी साहित्यातील महारथींना वाचून. त्यांचं लेखन वाचून व्यंग किंवा सटायरविषयीचं माझं आकलन वाढलं. सटायर में एक बहुत गहरा सच, अक्सर कड़वा सच, होना चाहिए जिसे बिना कॉमेडी की मदद की कहना नामुमकिन सा ही हो।

प्रश्न - 'आजच्या काळात विनोद हे विरोधकांच्या (लिबरल) हातातील प्रभावी अस्त्र आहे,' असं गेल्या वर्षी रामचंद्र गुहा आपल्या एका लेखात म्हणाले होते. सध्याची राजकीय परिस्थिती, लोकशाही अशा अनेक गोष्टींवर व्यंगात्मक शैलीत भाष्य करणारा तुझा 'ऐसी तैसी डेमोक्रॅसी' हा स्टॅण्डअप कॉमेडी शो सध्या प्रचंड लोकप्रिय ठरलाय. देश-विदेशांत जाऊन तू हा कार्यक्रम सादर करतोयस. गुहांच्या विधानाशी तू कितपत सहमत आहेस?

- संकुचित विचारांच्या मंडळींशी-झुंडीशी लढण्यासाठी पुरोगामी /लिबरल मंडळींकडे व्यंग्याशिवाय दुसरे कुठले अस्त्र उरले नसेल, तर ते ही लढाई लढण्यापूर्वीच हरले आहेत असं म्हणावं लागेल. कुठल्याही कलेचा उद्देश समाज-परिवर्तन घडवणे हा नसतोच. कलेचा मुख्य हेतू असतो बदलत्या समाजाचे डॉक्युमेंटेशन करणं, समाजाला आरसा दाखवत त्याची स्तुती किंवा टीका करणं. आपल्या देशातील व संस्कृतीतील विविधता वाचविण्यासाठी असंख्य लोक आपापल्या स्तरावर लढाई करत आहेत. कला फार तर त्यातला छोटासा भाग आहे, असं म्हणता येईल.

प्रश्न - सध्या स्टॅण्डअप कॉमेडी हा कलाप्रकार तरुणांमध्ये लोकप्रिय ठरतोय. हा कलाप्रकार मतभेद व्यक्त करण्याचं एक प्रभावी माध्यम बनलंय. तू आणि तुझ्यासारखी अनेक तरूण मंडळी स्टॅण्डअप कॉमेडीच्या माध्यमातून राजकीय भूमिका उघडपणे घेताना दिसतात. सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर मुख्य प्रवाहातील माध्यमे बिचकत-बिचकत टीका करत असताना, तुम्ही मंडळी मात्र अतिशय निर्भयपणे व्यंगबाण सोडता; हे धैर्य येतं कुठून?

- ही काय आजची गोष्ट नाही. अशी टीकाटिप्पणी कायमच होत आलीय; आपल्या संस्कृतीत विदूषकांची मोठी परंपरा राहिलेली आहेच की! राजाच्या दरबारात एक विदूषक नेहमी असायचा. त्याच्याकडे राजावरही व्यंग करण्याची ताकद असायची. वर खुद्द राजाच त्याला पगार आणि सन्मान देऊ करायचा. स्वातंत्र्यानंतर आपल्याकडे हास्यकवी संमेलनाची परंपरा राहिली , जी आजतागायत सुरू आहे. प्रत्येक काळात विदूषक आणि कवी जागल्याची भूमिका निभावतच आलेत. आज तरुणाईमध्ये लोकप्रिय ठरणारे स्टँडअप कॉमेडियन्स याच परंपरेचे वाहक आहेत.

प्रश्न - अच्छा! म्हणून ट्विटर हँडलचे नाव विदूषक आहे तर, मग आम्हाला सांग, या पठडीतील कुठल्या कार्यक्रमांनी तुला सर्वाधिक प्रभावीत आणि प्रेरित केले?

- मी सर्वाधिक भारावून गेलो ते दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या जसपाल भट्टी यांच्या 'फ्लॉप शो' या मालिकेने. याशिवाय, शेखर सुमन यांचा 'मूव्हर्स अँड शेकर्स' हा कार्यक्रमही मला फार आवडायचा. सध्या अमेरिकन वाहिन्यांवर प्रसारित होणाऱ्या ट्रेव्हर नोव्हा आणि जॉन ऑलिव्हर यांच्या येट नाइट शोजमधूनही शिकण्यासारखं खूप असतं.

प्रश्न - वरुण, तुझ्या आजवरच्या प्रवासाकडे पाहिलं तर निदा फाजली यांचा एक शेर आठवतो - 'एक आदमी में छुपे होते है दस - बीस आदमी, जिस को भी देखना हो, कई बार देखना.' एकीकडे उच्च दर्जाचा सटायरिस्ट, त्याच वेळी उत्तम कथाकार, राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारा गीतकार आणि बरेच काही... कसं काय जमून येतं हे सगळं?

- मी कधीच काही प्लॅन केलं नाही. सगळं आपोआपच घडत गेलं. मुझे लिखने का चस्का है ओर अलग अलग एक्सिपिरियन्स लेने का भी. मला सगळं लिहायचं आहे - प्रत्येक प्रकारचे लेखन करायचे आहे - प्रत्येक भाषेतील एक सिनेमा, हर तऱ्हेच्या कागदावर छापल्या जाणाऱ्या कादंबऱ्या. मला सगळं करून पाहायचं आहे. हां, पण सगळं काही मला करता येणार नाही, आयुष्य लहान आणि मार्ग

अरुंद आहेत. पण या सगळ्यात मला जे सर्वाधिक प्रिय आहे - गीतलेखन, कॉमेडी व सिनेमा - हे तीनही प्रकार लिहिण्याचा प्रयत्न केलाय आणि हळूहळू त्यात पुढे सरकत आहे आणि खरं तर अजूनही बरंच काही शिकत आहे. त्यात खंड पडलेला नाही.

प्रश्न - राज्यसभा टीव्हीवरील मुलाखती मध्ये तू म्हणाला होतास की - 'तुझ्यातही उच्चवर्णीय पुरुषी पूर्वग्रह' आहेत. या पूर्वग्रहांची जाणीव तुला कधी झाली? आणि ते तू यशस्वीपणे दूर कसे केलेस? पूर्वग्रह यशस्वीपणे दूर केलेस, असा दावा मी यासाठी करतोय की, वाराणसीत प्रेतं जाळण्याचे काम करणाऱ्या डोम समाजातील मुलाचे भावविश्‍व, जातिभेद, अनुभव याचं जिवंत चित्रण तू लिहिलेल्या 'मसान' या सिनेमाच्या पटकथेत आलंय. अतिशय वास्तववादी वाटणाऱ्या या सिनेमाला अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाले आहेत. या प्रवासाविषयी थोडं विस्ताराने सांगशील?

- आपण ज्या घरात, समाजात, जातीत किंवा धर्मात जन्म घेतो, त्या प्रत्येक घटकाचा प्रभाव आपल्यावर खूप खोलपर्यंत असतो. कसंय, विविध प्रकारच्या मिथकांवर आणि श्रद्धांवर (belief) मानवी विश्‍व आधारलेलं आहे. त्या मिथक आणि श्रद्धांशिवाय हा समाज, इथली शांती आणि भ्रामक स्थैर्य (illusion of satability) सगळंच उद्ध्वस्त होऊन जाईल.

पैसा काय आहे? दहा रुपयांच्या नोटेवर लिहिलेले असते, "मै धारक को दस रुपये अदा करने का वचन देता हूँ!" म्हणजे ती नोट दहा रुपये नसून दहा रुपयांचे वचन आहे. मग खरे दहा रुपये आहेत कुठे? त्यांचं अस्तित्वच नसतं. असतं ते केवळ ते देण्याचे वचन. धर्म, जात आणि लिंगाप्रमाणेच पैसा हीसुद्धा श्रद्धेवर आधारलेलीच व्यवस्था आहे. मात्र या साऱ्या व्यवस्था आपल्या आत रुतून बसतात, खोलवर.

बिलिफ सिस्टीममध्ये आपण ज्या स्तरावर आहोत, त्यामुळंच जीवनातल्या अनेक गोष्टी आपल्याला मिळाल्या आहेत; हे जेव्हा हळूहळू कळायला लागतं, तेव्हा तुमचा अहंकार गळून पडायला लागतो. तो गळायलाच हवा. अनेक लोक या परिवर्तनाला विरोधही करतात. जसं सुरुवातीच्या काळात माझीदेखील पक्की धारणा होती की, शिक्षणात आणि नोकरीत आरक्षण असणं चुकीचं आहे. कारण आरक्षणाबद्दल न वाचताच, केवळ माझ्या भोवतालातून विरोधाची ही भूमिका स्वीकारली होती आणि त्यावेळी मला या भूमिकेची चिकित्साही करावीशी वाटली नाही. परंतु जसं-जसा तुमच्या विचारांत मोकळेपणा येतो, नवनवीन शंकांना - प्रश्‍नांना तुम्ही तुमच्या आत येऊ देता; तसतसे अशा धारणा-संकल्पनांचे आंधळेपण खुपायला लागतं... माझ्याही बाबतीत हेच घडलं.

प्रश्‍न - तुझ्या कॉमेडीमधून गांधीवाद डोकावतो, असं मी वर म्हणालो. मात्र 'सेक्रेड गेम्स' ही आजकालची सर्वाधिक चर्चिली जाणारी लोकप्रिय वेबसीरिजही तुझ्याच लेखणीतून साकारलीय. या सीरिजमध्ये हिंसा, शिवीगाळ आणि अन्य अनेक 'तामसिक' गोष्टी पाहायला मिळतात. सात्त्विक स्वभावाच्या वरुणचा अशा प्रकारच्या लेखनातही हातखंडा कसा?

- तमस और उजाला.... अंधकार आणि प्रकाश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाचे अस्तित्व असेल, तरच दुसऱ्याच्या असण्याला अर्थ आहे आणि हो, ज्या गोष्टीमध्ये कुठल्याही प्रकारच्या अभ्यासाला वाव दिसतो, ती गोष्ट करून पाहायला मला आवडते. विक्रम चंद्रा यांच्या 'सेक्रेड गेम्स' या कादंबरीमध्ये अशाच अनेक वैशिष्ट्यपूर्ण थीम्स होत्या.... जिनसे भिड़ने का मन किया तो हम कूद गए!

प्रश्‍न - आता प्रत्येकाला अगदी अल्प दरात रोज एक-दोन जीबी डेटा मिळू लागलाय. त्यामुळं इंटरनेटचं खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण झाले आहे. तू इंटरनेचा सुरुवातीचा काळ पाहिला आहेस. जेव्हा अगदी मोजक्या लोकांकडे ही सुविधा उपलब्ध होती, तेव्हापासून तू सार्वजनिकरीत्या इंटरनेटशी जोडला गेलास... आणि अगदी अलीकडे 'इंटरनेट आणि आपण' याविषयीचा तुझा एक स्किटही चांगलाच लोकप्रिय ठरलाय. सोशल मीडिया आणि व्हर्च्युअल स्पेसमुळे सामाजिक व्यवहारांमध्ये काय बदल जाणवतात तुला?

- जग जवळ आलंय ते इंटरनेटमुळे. जग पण जवळ आलंय तर लोकांच्या मनातली भीतीही वाढलीये. आता अगदी जगातल्या एका टोकावरील निर्वासितांचा प्रश्‍नही आपल्या दाराशी आल्याचा भास होतोय आणि मग तुमच्या-आमच्यातील या भीतीचा वापर करत स्थानिक नेते लोकांना विभागण्याचं कामही करू शकतात... याउलट, दूरवरचं दु:खही आपल्याला आपलंच वाटू शकतं. अमेरिकेतील एखाद्या शाळेतील गोळीबाराचे फोटो पाहून आपल्यालाही रडू कोसळतं. सद्य:स्थितीत जग एका हायपर-इमोशनल स्टेट म्हणजेच अति भावनिक अवस्थेतून जात आहे. सब कुछ बहुत तेजी से हो रहा है और बहुत गजब की इंटेन्सिटीसे. या गदारोळातच हवामान बदलासारख्या समस्या आपला फासा टाकून म्हणताहेत, "आओ बेटा, ये बाजी भी हार ले!"

असं असलं तरी कलेसाठीचा हा सर्वोत्तम काळ आहे. प्रत्येक संकट कलेला अधिक सशक्त करते, मात्र जगासमोरच्या अडचणीही वाढवून ठेवते.

प्रश्न - संकटावरून आठवलं, 'देश संकट में है' हा सेक्रेड गेम्समधील तू लिहिलेला संवाद चांगलाच लोकप्रिय ठरलाय. तुझ्यासारख्या संवेदनशील व्यक्तीला काय वाटतं, खरंच देश, संकट में है?

– देशाचं काय घेऊन बसलास, सगळं जगच संकटात आहे! आणि याचं सर्वात महत्त्वाचं कारण जे मी आत्ताच म्हणालो - हवामान बदलाची समस्या, ज्याकडे अजूनही दुर्लक्षच केले जाते.

प्रश्न - लेखक, पटकथाकार, गीतकार, स्टॅण्डअप कॉमेडीयन अशी विविध प्रांतांतील तुझी मुशाफिरी सर्वपरिचित असली तरी, तू दशकभरापासून बालसाहित्य लिहितोस याची अनेकांना कल्पना नाही. 'पेपरचोर' या तुझ्या पुस्तकाविषयी आणि 'बिक्सू' या ग्राफिक नॉव्हेलविषयी आम्हाला थोडं सांग.

- लहान मुलांसाठी गेली तीन दशकं काम करणाऱ्या एकलव्य या संस्थेद्वारे 'चकमक' ही पत्रिका प्रकाशित होते. या पत्रिकेसाठी मी जवळपास दहा वर्षांपासून कथा, कविता आणि लेख लिहितोय. लहान मुलांसाठी लेखन करायला मला खूप आवडतं. कारण तिथे तुम्हाला स्वत:मध्ये खोलवर बुडी मारावी लागते आणि स्वत:ला सोपं करत जावं लागतं. फिर समझ आता है की हम आम जीवन में कितना उलझ गए हैं, कितनी जटिलता में तैर रहे हैं।

आणि 'बिक्सू' विषयी म्हणशील तर लहान मुलांसाठीच्या या ग्राफिक नॉव्हेलचं बरचसं काम माझ्या बायकोने - राजकुमारीने - केलं आहे. लेखन आणि चित्रं - तिने स्वत:च सगळं केलंय. मी केवळ लेखनात थोडं साह्य केलंय. 'पेपरचोर' हे माझं एकमेव हिंदी पुस्तक आहे, त्यात लहान मुलांसाठी मी लिहिलेल्या दहा कथांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रश्न - भारत हा जगातील सर्वांत युवा देश आहे, म्हणजे सगळ्यांत जास्त युवक सध्या भारतात आहेत. पण हे मिलेनियल्स (१९९० नंतर जन्मलेल्या युवकांसाठी वापरला जाणारा शब्दप्रयोग) आजकाल टीकेचा विषय बनले आहेत. पालक, नातेवाईक इथवर ठीक होतं, आता तर अर्थमंत्र्यांनीदेखील मंदीचे खापर 'मिलेनियल्स'वर फोडलंय. आजच्या युवकांच्या सामाजिक आणि राजकीय समजेविषयीही नेहमीच शंका उपस्थित केली जाते. याविषयी तुझं काय मत आहे?

- प्रत्येक काळातील युवक हा असाच असतो. युवा का काम ही है सबसे गाली खाना लेकिन अपने नए बिम्ब, नए मानक, नए हवाई किले गढ़ते रहना भी. माझ्या मते, मिलेनियल्स ही माध्यम-निर्मित संकल्पना (mediagenerated idea) आहे, जिला शुद्ध मार्केटिंगही म्हणता येईल. आजचा युवक हा कुठल्याही काळातल्या युवकांसारखाच आहे. थोडा परेशान, थोडा रोमांटिक, थोडा गुस्सैल, थोडा delusional, थोडा भटका हुआ, थोडा सुधरा हुआ.

प्रश्न - तू युवकांविषयी किती छान बोललास रे. आता शेवटच्या प्रश्नाकडे वळू यात. खरं तर हा प्रश्न सुरुवातीलाच विचारायला हवा होता, पण जाणीवपूर्वक शेवटी विचारत आहे. त्याचं कारण तू जे उत्तर देशील ते आमच्या युवा मित्र-मैत्रिणींना वाचण्या-पाहण्यासाठी मदत करेल. तुझ्या व्यक्तिमत्त्वात व लेखनात साहित्य आणि सिनेमा यांचा प्रभाव जाणवतो. कुठल्या साहित्यिकांनी आणि दिग्दर्शकांनी तुझ्यावर प्रभाव टाकला?

- बडी लम्बी लिस्ट है. पर सरसरी तौर पर कुछ बताता हूं अमृता प्रीतमच्या कथा आणि कविता, उदय प्रकाश यांच्या कथा, मनोहर श्याम जोशी यांच्या कादंबऱ्या, मंटोचे 'मिठा जहर' सारखे किस्से, अमृत लाल वेगड यांची प्रवासवर्णनं, विनोदकुमार शक्लांचे कुतूहलांनी भरलेले साहित्यिक जग, विसल्वा जिम्बोर्स्काच्या कविता, टेड चियांग आणि स्टीफन किंग यांच्या विज्ञानकथा यांनी मला प्रभावित केलंय. सिनेमांबाबत सांगायचं झालं तर - पॉल थॉमस अँडरसन, ग्रेटा गर्विग, फिबी वॉलर ब्रिज, सिडनी ल्यूमेट, सत्यजित रे, गुलजार, मार्टिन स्कोर्सेसी, बोंग जून हो, माइकल हनेके आणि अल्फोंसो कूरों यांच्या कलाकृती मला प्रचंड भुरळ घालत आल्यात.

❐



शौकत आझमी यांचे ९१ व्या वर्षी अल्पशा आजाराने २२ नोव्हेंबर २०१९ रोजी दु:खद निधन झाले. त्या कैफी आझमी यांच्या पत्नी व शबाना आझमी यांची आई होती. त्यांनी इंडियन पिपल्स थिएटर (इप्टा) या व अन्य संस्थातर्फे अनेक नाटकांत व सिनेमात काम केले आहे. त्यांच्या स्मृतीस अन्नपूर्णा परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली!

# महात्मा गांधी म्हणजे मजबुरी नसून मजबुती आहे!

■ डॉ. संजय मंगला गोपाळ, sansahil@gmail.com

महात्मा गांधीजींच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त जगभर या महात्म्याची कृतज्ञतापूर्वक आठवण केली जात आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे नायकत्व व त्याआधी दक्षिण आफ्रिकेतील त्यांचा संघर्ष हा सर्वांना बऱ्यापैकी ठाऊक असतो. गांधीजींचा खून होऊन ७१ वर्षे होत आली. म्हणजे गांधीजींना प्रत्यक्ष ज्यांनी पाहिलंय, ऐकलंय ते आता हयात नाहीत किंवा अगदी वृद्धावस्थेत आहेत. मधल्या पिढीने गांधी अनुभवला तो त्यांच्या अनुयायांच्या कामातून व त्यांनी जागवलेल्या आठवणींमधून. आताच्या पिढीला गांधींबद्दल कळतंय ते फिल्म्स, पुस्तकं, सरकारी जाहिराती आणि सोशल मीडियात होणाऱ्या उलटसुलट प्रचार - अप प्रचारातूनच! अशा वेळी स्वातंत्र्यलढ्यादरम्यान गांधीजींनी रुजवलेली मूल्ये आणि या लढ्यापलीकडे अखिल मानव जात व सोबतच परिसर - पर्यावरण - अन्य प्राणी - वनस्पती या सर्वांच्या सामंजस्य पूर्ण व चिरंतनकाल एकत्र नांदण्याबद्दलचे त्यांचे महनीय विचार व त्यावरून केलेले काम याबाबत थोडे विवेचन करण्यासाठी, हा लेखन प्रपंच.

**गांधीजी एक सत्याचा उपासक व वैज्ञानिक**

मजबुरी का नाम गांधीजी. गांधी म्हणजे एक आचरट, बावळट व एका गालावर मारल्यास दुसरा गाल पुढे करा असे सांगणारे. भारताच्या फाळणीचे जनक. असे या महात्म्याविषयी असंख्य गैरसमज जाणूनबुजून पसरविण्यात आले आहेत. कारण हा महात्मा साधासुधा माणूस नव्हता तर लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि मानवता या मूल्यांसाठी सातत्याने विचार, आचरण व जन आंदोलन छेडणारा जनतेचा नेता होता. धर्म, जाती, प्रांत, वेष आदी मुद्द्यांवर समाजात भेदभावाचे विष पसरवणाऱ्या संस्था - संघटना - पक्षांना म्हणूनच गांधीजी नकोसे वाटत होते! त्यासाठी त्यांचा खून करण्यासही त्यांनी कमी केले नाही. मात्र हे सगळं देशातल्या मूठभर जनतेला वाटत असलं तरी आजही देशभरात व परदेशातही गांधींना मानणारे लोक खूप मोठ्या संख्येने आहेत. गांधीजींनी अनेक सामाजिक - सांस्कृतिक - शैक्षणिक व राजकीय आघाड्यांवर मूलभूत स्वरूपाचे काम केले आहे. शिक्षण, आहार, आरोग्य, निसर्गोपचार, स्वच्छता, काटकसर, शेती, पर्यावरण, ग्रामोद्योग, चरखा - खादी, औद्योगीकरण, सभ्यता - संस्कृती, धर्माचरण, अर्थ व्यवहार, स्त्री - पुरुष संबंध - सहचर्य - ब्रह्मचर्य अशा अनेक मुद्द्यांवर गांधीजींनी अत्यंत मूलगामी विचार मांडले. ते पडताळून पाहण्यासाठी सातत्याने प्रयोग केले. व जे आचार - विचार जनहिताचे वाटले त्याचा प्रचार - प्रसार करण्यासाठी अनेक संस्था - संघटनाही उभ्या केल्या. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वदेशी, शारीरिक श्रम प्रतिष्ठा, नयी तालिम, अपरिग्रह, विश्वस्त संकल्पना, अंत्योदय, सर्वोदय या मूल्य संकल्पना, गांधीजींकडून अखिल सृष्टीला मिळालेली अनमोल देणगी आहे.

सत्याचा शोध ही गांधीजींची मुख्य प्रेरणा होती. सत्य म्हणजेच ईश्वर अशी त्यांची धारणा होती. गांधीजींनी लिहिलेल्या आत्मचरित्राचं नावच मुळी आत्मकथा अर्थात माझे सत्याचे प्रयोग, असे आहे. विज्ञानाचीही प्रेरणाही सत्याचा शोध हीच आहे. त्या अर्थाने महात्मा गांधी विचारांनी विज्ञानवादी व आचरणाने वैज्ञानिक होते. आपल्या आत्मकथेत त्यांनी आपला सत्याचा वैज्ञानिक शोध छान शब्दबद्ध केला आहे. ते लिहितात, 'ज्याप्रमाणे वैज्ञानिक आपले प्रयोग अतिशय नियम - पूर्वक, विचार - पूर्वक आणि बारकाईने करतो, आणि तरीही त्यांच्या निष्कर्षांना अंतिम मानत नाही; किंवा ते निष्कर्ष अंतिम आहेत याबाबत तो साशंक नसला तरी तटस्थ निश्चितच असतो. माझ्या प्रयोगांबाबत माझीही तीच भूमिका आहे. मी खूप आत्मपरीक्षण केले आहे; एका - एका मुद्द्याची छाननी केली आहे; तिचे पृथक्करण केले आहे; परंतु त्यातून निघालेला निष्कर्ष सर्वांसाठी अंतिम आहेत, ते खरे आहेत

किंवा तेच खरे आहेत, असा दावा मी कधीच करणार नाही. मी इतके निश्चितपणे म्हणू शकेन की माझ्या दृष्टीने हे सत्य आहे आणि याक्षणी तरी मला ते अंतिम सत्य वाटते आहे. असे जर वाटत नसेल तर त्या आधारे मी कुठलेही कार्य उभे करू नये.' जसं विज्ञान मूलत: परिवर्तनशील असतं, तसेच गांधीजीही परिवर्तनशील होते. निसर्गोपचार या अत्यंत चाकोरीबाहेरील उपचार पद्धती बाबत गांधीजींनी अनेक प्रयोग केले. सूक्ष्म निरीक्षणे नोंदवली. या निरीक्षणांच्या आधारे तर्कशुद्ध निष्कर्ष मांडले.

**यंत्र माणसाचे सेवक असावेत, मालक बनू नयेत!**

गांधीजी जसे प्रखर विज्ञानवादी होते तसेच ते यंत्र समर्थकही होते. आपलं शरीर हेच एक यंत्र असताना कुणाला यंत्रविरोधी रहाता येईल का! स्वतः गांधींनी रेल्वे व तार यंत्राचा प्रचंड वापर केला. शिलाईसाठी बनवलेल्या सिंगर मशीनचं गांधीजींनी कौतुक केलं होतं. मात्र यंत्र कसं असावं याबाबतच्या त्यांच्या स्पष्ट धारणा होत्या. यंत्र अशी नसावीत की ज्यामुळे माणसालाच काम उरणार नाही. माणसाला निष्क्रिय, बेरोजगार व आळशी बनविणाऱ्या यंत्राला त्यांचा सक्त विरोध होता. उत्पादन वाढ तर होतेय. पण सोबत बेरोजगारीही वाढतेय अशा विकासपद्धतीला गांधींची आजिबात मान्यता नव्हती. कारण यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण वाढते. समाजातील विषमता, शोषण, अन्याय, अत्याचार वाढतात. जनता गुलाम बनून जाते. यामुळे लोकशाही, स्वातंत्र्य, समता धोक्यात येतात. यंत्र कसे हवे तर, श्रम सुलभ, रोजगार निर्माण करणारे, त्यातून मिळणारे उत्पादन वापरण्यास सोपे असणारे, स्थानीय संसाधनांचा वापरच कच्चा माल म्हणून करणारे, पर्यावरण स्नेही आणि व्यक्ती व समाजाला स्वावलंबन शिकवणारे, असे गांधींचे मत होते.

तंत्रज्ञान जेवढे सहज व सोपे तेवढे ते सामान्य व्यक्तीच्या आवाक्यात राहील. यंत्र माणसावर स्वार होणार नाही. यंत्र माणसाचे सेवक असावेत, मालक बनू नयेत. यंत्र किंवा उपकरण म्हणजे हाताचा विस्तार! हातच छाटून टाकणे किंवा त्याचे काम काढून घेणे नव्हे, असे वर्णन गांधीवादी विचारवंत दादा धर्माधिकारी करत असत. थोडक्यात, गांधीजी यंत्र विरोधी नाही तर यंत्रांच्या अमानवीकरणाच्या विरोधी होते. ते विज्ञान वा तंत्रज्ञान विरोधी नाहीत तर, विज्ञानाच्या अ - नैतिकच नाही तर न - नैतिक वापराच्या विरोधात होते. त्या काळात पश्चिमी देशात जी यांत्रिकीकरणाची लाट पसरली होती व त्यातून जे मानवतेसमोर आव्हान उभे रहात होते ते नाकारत गांधींनी देशी तंत्र - विज्ञानावर नेहमी भर दिला. १८८५ ते १९३१ या काळात पंधरा वेळा परदेशगमन करत पश्चिमी संस्कृतीचा प्रत्यक्षानुभव घेऊन गांधीजी ही मांडणी करीत होते!

**गांधीजींनी केला तंत्रज्ञानाचा प्रसार**

महात्मा गांधींनी विकसित केलेले सहज सुलभ यंत्र म्हणजे सुत कताईचा चरखा. या चरख्यात ते सातत्याने संशोधनही करीत असत. १९२९ साली गांधीजींनी चरख्यात यंत्राचे वरील निकष पुरेपूर उतरतील असा सुधारित चरखा विकसित करण्यासाठी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. महात्मा गांधींनी विज्ञानाचा वापर करून तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या सर्वसामान्य किंवा अगदी गावकुसाबाहेरच्या कष्टकरी कारागिरांना व 'जुगाड' करत त्यांनी विकसित केलेल्या यंत्रांनाही महत्त्व देत असत. त्यांच्या योगदानाची नोंद घेत असत.

गांधीजींच्या अनुयायांनी गांधींचे विज्ञान - तंत्रज्ञान पुढे नेले. आचार्य विनोबा, जे. सी. कुमारप्पा, आप्पासाहेब पटवर्धन, लॅरी बेकर, बाबा आमटे, मेधा पाटकर अशी कितीतरी नावं या संदर्भात घेता येतील. नंतरच्या काळात समुचित तंत्रज्ञान व अल्पप्रमाण यंत्रांच्या माध्यमातून डॉ. राम मनोहर लोहियांनीही गांधी विज्ञानाची कास धरल्याचे दिसते. गांधींचे सहकारी मगनभाई यांनी देशातला पहिला सौर - कुकर विकसित केला होता!

महात्मा गांधींनी अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना केली. त्यात त्यावेळचे प्रथितयश उद्योगपती घनश्यामदास बिर्ला, संशोधक जगदीशचंद्र बोस, सी. व्ही. रामन आदी मान्यवरांचा समावेश होता. हा संघ स्वयंसिद्ध, स्वतंत्र आणि अ - राजकीय संघटन म्हणून काम करेल हेही त्यांनी स्पष्ट केले होते. या संघाच्या माध्यमातून गांधींच्या अनुयायांनी विज्ञानाचा वापर करीत अनेक लोकोपयोगी तंत्रज्ञान विकसित केली. ग्रामीण बाईच्या दृष्टीने सोपा संडास, बायोगॅस संयंत्रे, शोष खड्डे तर ढोर मेहनत व कष्ट कमी करण्याच्या दृष्टीने निर्धूर चूल व शेतीची उपकरणे विकसित केली. समतोल पोषण आहाराच्या दृष्टीने हातसडीचा तांदूळ, गूळ, मध, घाणीचे तेल यांचे उत्पादन सार्वत्रिक केले तर खादीच्या क्षेत्रात अंबर चरखा, सौर चरखा, कापसा पासून कापड निर्मिती पर्यंतचे समग्र तंत्रज्ञान विकसीत केले. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने हात कागद, कुंभार काम, बांबू काम यावरही भर देण्यात आला. गांधीजींच्याच प्रेरणेने १९२७ साली Federation of Indian Chamber of Commerce & Industries अर्थात फिक्कीची स्थापना झाल्याचे फार कमी लोकांना आज ठाऊक असेल! युरोपातील इटली देशात वारंवार भडकणाऱ्या ज्वालामुखींच्या परिसरात जाऊन तेथील वातावरणाची बारकाईने नोंद ठेवत ती जगभरच्या अभ्यासकांना उपलब्ध करून देणाऱ्या शास्त्रज्ञाचं कौतुक करणारा लेख गांधींनी लिहीला होता. १९३५ साली एक विख्यात विदेशी खगोलशास्त्रज्ञ भारत भेटीवर असताना गांधीजींनी त्यांची दोन आठवडे सलग व्याख्याने आश्रमात ठेवली होती. त्याच सुमारास आयोजित काँग्रेस अधिवेशनातही गांधीजींनी त्यांचे व्याख्यान ठेवले होते. स्वातंत्र्योत्तर भारतात एका तरी राजकीय पक्षाने अशी व्याख्याने लावल्याचे कुणी ऐकलं आहे का? गांधीजींना विज्ञानविरोधी म्हणणाऱ्यांनी हे समजून घेणे अत्यावश्यक आहे!

**आजही आपण सारे, गांधी मार्गाने चालूया!**

आज एकीकडे जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय व्यापार, डिजिटलायझेशन, आधुनिक तंत्र - विज्ञानाचा बोलबाला आहे. तर दुसरीकडे पारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या वारेमाप वापरामुळे होणाऱ्या कमालीच्या प्रदूषणामुळे अवकाळी पाऊस, वादळे, तापमान वाढ आदी संकटे समोर उभी ठाकत आहेत. उर्जेच्या या अंदाधुंद वापरामुळे उर्जा स्त्रोतही वेगाने नष्ट होत आहेत. कमालीचे महाग बनत आहेत. अशा वेळी गांधीजींचा संयम, काटकसर, पर्यावरण संतुलन आदी सर्व विचार व आग्रह अगदी तंतोतंत आवश्यक बनले आहेत. गांधीजींच्या मार्गाने शक्य तेव्हढे तरी चालू, धावू, मार्गक्रमण करू हा निर्धार आज अत्यावश्यक बनला आहे. असे करायला लागलो की स्पष्ट होईल की, गांधी म्हणजे मजबुरी नसून मजबुती आहे!

❐

# गांधीजी आणि अहिंसा

■ डॉ. अजित मगदूम

म. गांधींवर लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन, थोरो यांसारख्या पाश्चात्त्य तत्त्वचिंतक लेखकांचा प्रभाव होता. गोपाळ कृष्ण गोखले हे तर गांधींचे राजकीय गुरू होते हे सर्वश्रुत आहे. सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर त्यांच्या आईचा प्रभाव होता. कायद्याची पदवी मिळविण्यासाठी इंग्लंडला जाताना आईने गांधींकडून 'मांसाहार करणार नाही. दारूला स्पर्श करणार नाही व कोणाही स्त्रीशी शरीरसंबंध ठेवणार नाही' या तीन बाबींचं वचन घेऊनच आईने जाण्यास परवानगी दिली. मोध बनिया असलेल्या परंतु जैन साधू बनलेल्या बेचारजी स्वामींच्या सांगण्यावरून या अटींची शपथ घेण्यास सांगण्यात आले होते. हिंदू धर्माप्रमाणे त्याकाळी जैन धर्मातील तत्त्वांचा प्रभाव एकंदर गुजरातमध्ये होता. जैन धर्मातील शाकाहार व अहिंसा या तत्त्वांचा गांधींवर प्रभाव होता. याचे कारण म्हणजे जैन उपासक व कवी श्रीपद रामचंद्रजी यांचं त्यांना मिळालेलं सान्निध्य.

४ सप्टेंबर १८८८ रोजी मोहनदास गांधी जहाजाने कायद्याची पदवी संपादन करण्यासाठी इंग्लंडला गेले व बार ॲट लॉ ही पदवी मिळवून ५ जुलै १८९१ रोजी मुंबई बंदरात उतरले. मुंबईत मोहनदास यांचे वर्गमित्र डॉ. प्राणजीवन मेहता यांच्या घरी गेले. त्यांना न्यायला त्यांचे मोठे भाऊ लक्ष्मीदास आले होते. काही महिन्यापूर्वी त्यांच्या आईचे निधन झाल्याची बातमी लक्ष्मीदास यांनी त्यांचे अभ्यासावरून लक्ष उडेल म्हणून त्यांना हे कळवले नव्हते. आईचा मृत्यू हा मोठा धक्काच होता. आईने घातलेल्या तीनही अटी मोहनदासनी लंडनमधील तीन वर्षांच्या वास्तव्यात तंतोतंत पाळल्या होत्या. पण ही बाब सांगायला आई आता नव्हती. त्यांचे सांत्वन करायला कवी राजचंद्र आले होते. गांधींनी काही दिवस राजचंद्रांसमवेत काढले. राजचंद्रांनी त्यांचे सांत्वन करण्यासाठी आपले सारे कौशल्य पणाला लावले. त्यांना हिंदू आणि जैन धर्माचे सखोल ज्ञान होते. राजचंद्र यांच्यामुळे त्यांच्यावर शाकाहार, अहिंसा, सत्य या तत्त्वांचा प्रभाव झाला होता. पुढे १९२१ मध्ये राजचंद्र यांच्या जयंती समारंभ प्रसंगी गांधीजी म्हणतात,''मी अनेकदा सांगितले आणि लिहिले आहे की अनेकांच्या जीवनापासून मी खूप काही घेतले आहे, तथापि सर्वात अधिक कुणाच्या जीवनापासून मी काही ग्रहण केले असेल, शिकलो असेल, तर ते कवी श्रीमद् राजचंद्र यांच्या जीवनापासून! दयाधर्मही मी त्यांच्याच जीवनापासून शिकलो आहे. खून करण्यावरसुद्धा प्रेम करावे हा दयाधर्म मला त्याच कवींनी शिकवला आहे.''

अहिंसा हा प्राचीन शब्द आजच्या काळात शाकाहारवाद, शांततावाद (युद्धविरोध), शांततामय संघर्ष, धैर्य, क्षमाशीलता इ. शब्दांशी जोडला गेला आहे तरीही या शब्दाचे गांधीजींशी अतूट नाते जडलेले आहे.

बऱ्याचदा आजच्या काळात गांधीजींच्या अहिंसेबाबत उपहास, कुचेष्टा, निर्भर्त्सना झालेली, उदा. आठवड्यापूर्वीच झालेल्या IAS Officer निधी चौधरींच्या बेताल वक्तव्यापर्यंत आपण पाहिले आहे.

'गांधीगिरी' हा शब्द तर गांधीवादाची थट्टाच असल्यासारखा आहे. ''एका गालावर थप्पड मारली तर दुसरा गाल पुढे करा'' हे गांधीजींच्या अहिंसेचे उदाहरण म्हणून प्रचलित झालं असलं तरी ते सत्य नाही. त्यांनी असं कुठंही म्हटल्याचं दिसत नाही. खरं म्हणजे याचे मूळ स्रोत येशू ख्रिस्ताच्या 'सर्मन ऑन दि माऊंट' मध्ये आहे. याविषयी पूर्णपणे अनभिज्ञ असणारे सामान्य भारतीय म्हणजे आपण या सल्ल्याचे जनकत्व गांधींजींना बहाल करून टाकतो हे दुर्दैव!

द्वेष, क्रोध, सूडभावना असहिष्णुता यातून निर्माण होणारे तामसी विचारही सारी हिंसेची रूपे आहेत. जे मन दया, क्षमा, शांती, संयम, प्रसन्नता, सद्‌भावना मैत्री, करूणा इ. भावनांसहित असतं ते अहिंसेचं माहेरघर म्हणावं लागेल. शाश्वत सुखशांतीसाठी अहिंसक जीवनपद्धतीचा अवलंब केला पाहिजे, हे गांधीजींनी ओळखले होते.

पण गांधीजी अहिंसेबाबत एकांगी आग्रही नव्हते असं त्यांचे नातू लेखक अभ्यासक राजमोहन गांधी यांनी लिहिलेल्या 'यानी घडवला भारत या पुस्तकात म्हटले आहे. ते पुढे म्हणतात, ''दक्षिण आफ्रिकेत असताना १८९९ ते १९०६ या दोन्ही वर्षात तेथील सशस्त्र संघर्षात गुंतलेल्या ब्रिटिश सैन्याला मदत म्हणून त्यांनी रुग्णवाहिका सेवा चालू केली.''

गांधीजींचे आयुष्याचे अखेरचे पाच महिने दिल्लीतच गेले. १९४७ मध्ये दिल्लीत दंगली सुरू होत्या. त्यावेळी कायदा हातात न घेण्याचे आवाहन संतप्त नागरिकांना आणि आर. एस. एस. स्वयंसेवकाच्या गटाला गांधींनी केले होते. नागरिकांचे रक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. असे त्यांनी बजावले होते. पोलीस किंवा लष्कराने अहिंसेचे पालन करावे असे नाही!

स्वामी सच्चिदानंद एकदा म्हणाले होते, ''गांधी हे महान पुरुष होते. पण त्यांना दोन गोष्टी कधीच कळल्या नाहीत. एक, तलवारीचे मोल, दुसरी, इस्लामचा धोका.''

कृपाणाचा वापर कधी व कसा करावा यावर ११ सप्टेंबर १९४७ रोजी गांधींजी म्हणाले होते.

''धार्मिकदृष्ट्या पवित्र वस्तूंचा वापर धार्मिक तसेच कायदेशीर प्रसंगीच करावा. कृपाण हे सामर्थ्याचे प्रतीक आहे. याविषयी शंका नाही पण विलक्षण संयम बाळगणाऱ्या आणि अत्यंत प्रतिकूल कसोटीच्या क्षणाचा त्याचा वापर करणाऱ्यालाच ते शोभते.''

गांधीजींच्या दृष्टीने 'धैर्यवान आणि संयमी व्यक्ती एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी तलवारीचा वापर करते तेव्हाच तिला मोल येते.'

१९०९ साली चहासाठी आमंत्रित केलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या एका तरुण भारतीयाने केली होती. त्याला वाचवायला आलेल्या भारतीय डॉक्टरचाही जीव घेण्यात आला. तेव्हा गांधीजी म्हणतात.

''अशा खुनी हल्ल्यांच्या परिणामी ब्रिटिश निघून गेले तरी त्यांची जागा कोण घेईल? केवळ इंग्लिश आहे म्हणून तो वाईट आहे का? भारतीय चामडी असलेला प्रत्येक जण चांगला म्हणायचा का? तसे असेल तर भारतीय संस्थानिकांच्या विरोधात संतप्त निदर्शने करणे हे बंद केले पाहिजे. खुन्यांची सत्ता आल्याने भारताचे भले होणार नाही मग ते काळे असोत वा गोरे.''

त्यानंतर काही वर्षांनी १९३१ मध्ये ब्रिटिश पोलीस ऑफिसर जॉन सँडर्स यांच्या हत्येमुळे भगतसिंग यांना फाशी झाल्यावर देशभर युवकांत असंतोष खदखदत होता. भगतसिंग यांचे शौर्य आणि त्याग यापुढे कोणीही नतमस्तक होईल, असे गौरवोद्‌गार काढतानाच गांधीजी म्हणाले होते.

''आपल्या भुकेल्या लक्षावधी बांधवांचे, बहिऱ्या आणि मुक्यांचे, आपल्या दुबळ्या आणि विकलांगांचे स्वराज्याचे स्वप्न आपण तलवारीच्या मार्गाने साध्य करू शकत नाही. परमेश्वराला साक्षी ठेवून हे सत्य मला निदर्शनाला आणायचे आहे.'' (नवभारत) याला जोडूनच रिचर्ड ॲटनबरोच्या गांधी सिनेमात an eye for an eye make the whole world blind हे विधान गांधींच्या तोंडी आहे. सत्य आणि अहिंसा ही दोन तत्त्वे आचरणात आणायला महाकठीण आहेत. त्यासाठी गांधींजी 'निर्भय बनो' हा नारा देतात.

गांधीजींनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यात आपली हयात वेचली. प्रत्येक लढ्याच्या प्रसंगी गांधीजींनी अहिंसात्मक सत्याग्रह केला. दक्षिण आफ्रिकेत वकिली करीत असताना त्यांच्याकडे रेल्वेचे प्रथम वर्गाचे तिकीट असताना ते केवळ कृष्णवर्णीय आहेत म्हणून त्यांना उतरून तृतीय वर्गाच्या डब्यात जायचा आदेश दिला गेला. गांधींनी त्याला प्रतिकार केला. तेव्हा त्यांना बळजबरीने एका स्टेशनवर मध्यरात्री उतरविले. तिथे सारी रात्र जागून काढताना त्यांनी विचार केला की या समस्येवर दोन पर्याय आहेत. एकतर आपण हे सहन करत, तडजोड करत जगायचं, किंवा दुसरा - संघर्ष करायचा. त्यातला दुसरा पर्याय त्यांनी निवडला व वर्णद्वेषाविरुद्ध दक्षिण आफ्रिकेत लढा दिला तोही अहिंसात्मक मार्गानेच हा लढा गांधीजींनी जिंकला. दक्षिण आफ्रिकेतील सरकारला म. गांधींना चर्चेस बोलवून कृष्णवर्णीयांवरील जाचक अटी शिथिल करण्याबाबत तडजोड करण्यात त्यांना यश आलं.

नंतर १९१४ च्या दरम्यान गांधीजी भारतात परतले. इथे आल्यानंतर खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा लढा, त्यानंतर १९१७ सालची बिहार चंपारणमधील निळीच्या मळ्यातील कामगारांचे शोषण व त्याविरुद्धचा लढा असो ही ब्रिटिश सत्तेला माघार घेऊन गांधीजींशी बोलणी करावी लागली. हे सारे लढे संघर्ष हे अहिंसात्मक होते. १९२० च्या दरम्यान काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतर गांधीजींनी सबंध देशभर फिरून त्यांनी सर्वसामान्यांचा स्वातंत्र्य लढ्यात सहभाग मिळविला. केवळ पंचा नेसणाऱ्या व सत्य-अहिंसा हीच काय ती शस्त्रे जवळ असणाऱ्या गांधीजींकडे लोकांनी स्वातंत्र्यलढ्याची धुरा दिली. सविनय कायदेभंग चळवळ, दांडी येथील मिठाचा सत्याग्रह ''छोडो भारत आंदोलन'' तसेच ''चले जाव'' हा १९४२ चा निकरचा लढा असो, गांधीजी आपल्या तत्त्वांशी अढळ राहिले. ते अखेरपर्यंत, खून करण्यावरही प्रेम करावे हे वचन शेवटी त्यांच्यावर गोळ्या झाडल्यावही ''हे राम'' म्हणून प्राणोत्क्रमण करतानाही पाळले. गांधीजींचं महात्म्य संबंध जगाला समजलं. म्हणूनच २००७ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी (UN) गांधी जयंतीचा दिवस २ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून जगभरात मानण्यात यावा, असे जाहीर करण्यात आले.

❒

# महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : वस्तुस्थिती समजून घेताना...

■ - विजय तांबे

या देशातल्या गरिबातल्या गरीब आणि वंचिताला हक्क मिळावेत, त्याला आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही आपले आयुष्य वेचले. हे दोन्ही दिग्गज नेते समकालीन आहेत. या दोन्ही नेत्यांचे संबंध संघर्ष ते सामंजस्य अशा विविध पैलूंनी नटलेले आहेत. याचा अर्थ ते एकमेकांचे शत्रू होते असे नाही. हे विशेषकरून सांगण्याचे कारण आजकाल गांधी विरुध्द आंबेडकर असे युद्ध पेटविले जात आहे. गांधी मुळात सनातनी कर्मठ होते का? डॉ आंबेडकर आणि गांधीजींमध्ये मतभेद होते की शत्रुत्व? या दोन्ही राष्ट्रपुरुषांना एकमेकाच्या विरुद्ध उभे करून कोण स्वत:चा फायदा करू इच्छितो?

१९१५ साली दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी भारतात परत आले आणि त्यांनी अहमदाबादला साबरमती आश्रमाची स्थापना केली. आश्रम सुरळीत चालू असताना दादाभाई, दादीबेन हे दलित जोडपे आणि त्यांची कन्या लक्ष्मी हे कुटुंब आश्रमात राहायला आले. गांधीजींनी त्यांना आश्रमवासी म्हणून दाखल करून घेतले. मात्र त्यामुळे अनेक जण अस्वस्थ झाले. गांधीजींची थोरली बहीण रलीयात बहन या मुद्द्यावरून आश्रम सोडून गेली. खुद्द कस्तुरबांची मन:स्थिती डळमळीत होती. गांधीजींचे निकटचे सहकारी मगनभाई यांच्या पत्नीलाही दलित कुटुंबाचा आश्रमातील समावेश योग्य वाटला नाही. या कृतीमुळे आश्रमाला मिळणाऱ्या देणग्याही बंद झाल्या.परिस्थिती इतकी बिकट झाली की 'उद्या काय?' असा प्रश्न पडला. त्यावेळी गांधीजींनी न डगमगता 'आपण सारे ही जागा सोडून जवळच्या दलित वस्तीत राहायला जाऊ आणि कष्ट करून तेथे राहू' असा निर्णय घेतला. त्यांनी पुढे सांगितले की, ज्यांना आश्रमाचे नियम मान्य नसतील त्यांनी आश्रम सोडून जावे. कस्तुरबांना त्यांनी कळविले की, 'तू आश्रम सोडून गेलीस तर पत्नी म्हणून मी महिना सहा रुपये तुला पाठवेन.' त्यांनी मगनभाईना सुचविले की त्यांनी आश्रमाच्या बाहेर राहून वर्षभरात कुटुंबाची समजूत काढावी. समजा परिवारातील सदस्य दलितांसोबत आश्रमात राह्यला तयार झाले नाहीत तर त्यांनी आपली दुसरी व्यवस्था बघावी, असं निर्वाणीचा इशाराही त्यांनी त्याच वेळी दिला. म्हणजे त्यांची पत्नी आणि निकटचा साथीदार त्यांना सोडून चालले होते, तरीही गांधीजींनी आपली अस्पृश्यताविरोधी भूमिका बदलली नाही, किंवा तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे साबरमती आश्रमातील व्यक्तींच्या मनात सुरुवातीला असलेला पंक्तिभेद कायमचा पुसला गेला. आश्रमाच्या संडासातील मैला वाहून नेण्याचे काम विनोबांचे बंधू बाळकोबानी घेतले. थोडक्यात १९२०च्या आतच अस्पृश्यता आणि विशिष्ट जातीने विशिष्ट कामे करणे या जातीनिष्ठ संकल्पना त्यांनी आपल्या जीवनातून पुसून टाकल्या होत्या.

### संयुक्त मतदारसंघ विरुद्ध स्वतंत्र मतदारसंघ

१९३१मध्ये ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषद आयोजित केली होती. या परिषदेत विविध धार्मिक, जातीय आणि आर्थिक

गटांच्या प्रतिनिधींना पाचारण केले गेले. प्रत्येक गटाने आपले स्वतंत्र अस्तित्व जाहीर करून वेगळ्या मागण्या करण्यास उत्तेजन देणे, पर्यायाने भावी राष्ट्राच्या उभारणीत अनेक ठिकाणी पाचर मारून ठेवणे हा त्यामागील हेतू होता. **त्या काळी सर्व प्रौढ व्यक्तींना मतदानाचा अधिकार नव्हता; तो केवळ मालमत्ताधारक व्यक्तींपुरता मर्यादित होता.** या परिषदेत मद्रास इलाख्यातील जस्टिस पक्ष आणि मुंबई इलाख्यातील ब्राह्मणेतर पक्ष यांनी ब्राह्मणेतर आणि मराठा जातींसाठी विभक्त मतदार संघाची मागणी केली. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ पूर्वीपासून होतेच. या परिषदेत शिखांनाही स्वतंत्र मतदारसंघ बहाल करण्यात आले. (विभक्त मतदारसंघ : असा मतदारसंघ जेथे एक सर्वसाधारण उमेदवार असेल आणि त्याला त्या मतदारसंघातील सर्व मतदार निवडून देतील. त्याच मतदार संघात एक अल्पसंख्याक उमेदवार असेल आणि त्याला तेच विशिष्ट अल्पसंख्यांक मतदार निवडून देतील.) डॉ आंबेडकरांचे म्हणणे होते की, दलित हा वेगळा अल्पसंख्य गट असून तो हिंदू आणि मुसलमान या दोन्हींपासून समान अंतरावर असल्याने त्याला हिंदू किंवा मुसलमानांच्यात न मोजता स्वतंत्र जागा द्यायला हव्यात. गांधीजींची भूमिका होती की, अस्पृश्यता हे हिंदूंचे पाप आहे. ते हिंदूंनीच निस्तरले पाहिजे. यातून हिंदूंची सुटका नाही. जर अस्पृश्यांकडून असे मांडले जात असेल की ते हिंदू धर्माचे घटक नाहीत, तर हिंदू समाजाकडून अस्पृश्यतेचे निर्मूलन होणार नाही. अस्पृश्यांबद्दल ‘तुमच्याशी आमचा संबंध नाही’ अशी भूमिका घेणे हिंदू समाजाला सोयीचे ठरेल. म्हणून अस्पृश्य हा घटक हिंदू समाजापासून तोडू नये. अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ दिल्यास त्यांचे मतदार अस्पृश्य असतील. विधिमंडळात त्यांचे निवडून गेलेले प्रतिनिधी अल्पसंख्यच असतील. त्यांचा सत्तेवर प्रभाव पडणार नाही. त्याचबरोबर बहुसंख्याकांच्या मतदारसंघातून निवडून आलेले प्रतिनिधी अल्पसंख्याकांच्या भावनांची कदर करणार नाहीत. अस्पृश्य समाज हा अशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सवर्णांवर अवलंबून असल्याने स्पृश्य – अस्पृश्यातील तणावातून अस्पृश्यांचेच नुकसान होईल. मात्र संयुक्त मतदारसंघ स्वीकारल्यास प्रत्येक उमेदवाराला समाजातील सर्व गटांची मर्जी सांभाळावी लागेल. कोणताही उमेदवार अल्पसंख्याकांबाबत बेफिकीर राहू शकणार नाही. सनातनी हिंदूंना देखील मते मागायला दलितांपाशी जावे लागेल, पर्यायाने त्यांच्या मागण्यांचा विचार करावा लागेल ही गांधीजींची भूमिका होती. (संयुक्त मतदारसंघ : सर्व मतदारसंघात काही मतदारसंघ असे असतील की ते राखीव असून तेथे फक्त अल्पसंख्याक उमेदवार उभे राहतील. मात्र त्यांना मतदान सर्व जातीधर्मातले मतदार करतील.) दलितांना विभक्त मतदारसंघ न देता दलितांसाठी विधिमंडळात राखीव जागा ठेवाव्यात म्हणजे उमेदवार अस्पृश्य, मात्र मतदान करणारे सगळे अशी गांधीजींची रचना होती.

१९३१ च्या गोलमेज परिषदेपूर्वी १९१९ साली साऊथ ब्युरो कमिशनपुढे आणि १९२७ साली सायमन कमिशनपुढे डॉ. आंबेडकरांनी साक्ष दिली. **दोन्ही ठिकाणी ते म्हणतात की, सरकार भविष्यात जर प्रौढ मतदानावर आधारित लोकशाही पद्धती लागू करणार असेल, सर्वांना मतदानाचा अधिकार दिला जाणार असेल तर मला विभक्त मतदारसंघ नकोत, संयुक्त मतदारसंघ हवेत.** १९३१ च्या गोलमेज परिषदेनंतर दलितांच्या विभक्त मतदारसंघाची मागणी मान्य झाली. गांधीजींनी येरवडा तुरुंगात कैद असतानाच विभक्त मतदारसंघाच्या विरोधात आमरण उपोषण सुरू केले. आंबेडकर आणि गांधीजींमध्ये येरवडा तुरुंगात चर्चा झाल्या. आंबेडकरांनी विभक्त मतदारसंघाचा आग्रह सोडला व संयुक्त मतदारसंघ मान्य केला. **‘पुणे करार’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या. निवाड्याद्वारे दलितांना विभक्त मतदारसंघातून मिळणाऱ्या ७१ जागांच्या ऐवजी संयुक्त मतदारसंघातून १४८ जागा मिळवून दिल्या.**

या उपोषणाचे तीन परिणाम झाले. पहिला होता गांधीजींची मागणी मान्य होऊन डॉ. आंबेडकर आणि गांधीजींमध्ये झालेल्या करारानुसार दलितांना संयुक्त मतदारसंघात ८६ जागा अधिक मिळणे. या उपोषणाचा दुसरा हेतू होता **सवर्णांच्या मनात अस्पृश्यतेच्या कलंकाविषयी पश्चात्तापाची भावना जागविणे. उपोषणा दरम्यान गांधीजींच्या या भावनेस ठिकठिकाणी प्रतिसाद मिळू लागला.** देशभरात अस्पृश्यांसाठी मंदिरप्रवेश, सार्वजनिक विहिरी आणि पाणवठे खुले करणे, अस्पृश्य बालकांना शाळांमधून मुक्त प्रवेश, जाहीर सहभोजन असे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. अलाहाबादेतील सर्व मंदिरे अस्पृश्यांना खुली झाली. कलकत्त्याचे सुप्रसिद्ध कालीमंदिरही खुले झाले. मुंबईच्या

प्रमुख देवळांमध्ये दलितांच्या मंदिर प्रवेशाच्या प्रश्नावर मतपेट्यातून जनमत चाचण्या घेण्यात आल्या. मुंबईतील विठ्ठल रखुमाई मंदिरात एम. जी. राजा या दलित नेत्यांनी आपल्या साथीदारांसह पूजेत भाग घेतला. बिहार पंजाबात देवळे खुली झाली. त्रिपुराच्या महाराजांनी आपल्या राज्यातील तमाम मंदिरे खुली केली. मद्रास आणि बनारसमधील सार्वजनिक सहभोजनात अनेक स्थानिक प्रतिष्ठित आणि राजकीय पुढारी सामील झाले. विविध नगर परिषदांनी उपहारगृहात सर्वांना मुक्त प्रवेश देण्याचा ठराव केला. तिसरा परिणाम म्हणजे **गांधीजींच्या बरोबरीने वाटाघाटी करणारे डॉ. आंबेडकर हे भारतातील सर्व दलित नेत्यांमधील सर्वोच्च नेते ठरले.**

**गांधीजींचे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य**

पुणे करार झाल्यावर गांधीजींनी आपल्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला सुरुवात केली. पुण्याहून 'हरिजन' पत्राचा शुभारंभ झाला. पहिल्या अंकासाठी त्यांनी डॉ. आंबेडकरांकडून संदेश मागितला. त्यात डॉ. आंबेडकर म्हणतात 'आपण आपल्या नवीन 'हरिजन' च्या पहिल्या अंकासाठी मला संदेश द्यायला सांगितला आहे. मी संदेश देऊ शकणार नाही असे मला वाटते. हिंदूंच्या नजरेत मजविषयी जी भावना आहे ती बघू जाता माझा संदेश त्यांना आदरणीय वाटेल याविषयी मला शंका आहे. मी तर माणसाने माणसाशी संवाद साधावा तसे लिहू शकतो. बहिष्कृतता हे जातीप्रथेचे उपउत्पादन ( byproduct) आहे. जोवर जाती राहतील तोवर अस्पृश्यता राहील. जातीप्रथेचा नाश झाल्याशिवाय इतर कुठल्याही उपायाने दलित मुक्त होऊ शकणार नाहीत. हिंदू धर्मातून या घृणास्पद आणि दुष्ट सिद्धांताला घालवून जोवर त्याला शुद्ध केले जात नाही, तोवर संघर्ष अटळ आहे. यातून हिंदूंना वाचवायला कोणतीही शक्ती पुढे येऊ शकणार नाही आणि त्यांच्या अस्तित्वाची खात्री देऊ शकणार नाही.''

डॉ. आंबेडकरांचे पत्र आणि संदेश संपूर्णपणे 'हरिजन' च्या पहिल्या अंकात प्रकाशित झाला. गांधींनी यावर प्रदीर्घ टिपण लिहिले. ते मुळातून वाचण्यासारखे आहे. यातल्या सैद्धांतिक चर्चेचे वेगळे मोल आहे, पण यातल्या मानवी पक्षाला उद्धृत करणे अधिक गरजेचे आहे. गांधी आपल्या निवेदनात म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांच्या मनात कटुता आहे. याची अनेक कारणे आहेत. ते उच्चविद्याविभूषित आहेत. सर्वसाधारण शिक्षित हिंदूजनांपेक्षा ते अधिक बुद्धीमान आहेत. हिंदुस्थानाबाहेर त्यांचा प्रेमाने सन्मान केला जातो, पण या देशातले हिंदूजन त्यांना सतत ते दलित असल्याचे स्मरण करून देतात. हे त्यांच्यासाठी लाजिरवाणे नसून ही हिंदूंसाठी शरमेची बाब आहे पण मी त्यांना खात्रीशीररीत्या सांगू इच्छितो की आज त्यांच्या संदेशाला अन्य नेत्यांच्या संदेशाइतका मान आणि आदर देऊन ऐकणारे हजारो हिंदू आहेत आणि त्यांच्या अभिप्रायानुसार कुणीही उच्च वा निम्न नाहीत. आज जरी (मला) वर्णाश्रमपद्धतीविरुद्ध लढण्याचे कारण नसले तरी भविष्यात वर्णाश्रम धर्मव्यवस्था जर गैरवर्तणूक करणारी वाटली तर हिंदू समाज त्याविरूद्ध झुंजेल. आपण सारे तेंव्हा एकाच छावणीत असू.''

गांधीजींच्या वरील लिखाणातील शेवटच्या दोन ओळी फार महत्त्वाच्या आहेत. गांधीजी हे सतत विकसित होणारे व्यक्तिमत्त्व आहे. आज मला एखादी गोष्ट योग्य वाटत असेल, पण ती उद्या बदलू शकते. ही त्यांची भूमिका आहे. ते आपली भूमिका सतत तपासून घेऊन त्यात योग्य तो बदल करत असत.

१९३७ सालच्या प्रांतिक निवडणुकांमध्ये डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाला महाराष्ट्रात चांगल्या जागा मिळाल्या पण भारतात मिळाल्या नाहीत. त्या राखीव जागांवर बहुतांशी काँग्रेसचे दलित प्रतिनिधी निवडून आले. देशभरात काँग्रेसमध्ये दलित कार्यकर्ते फार पूर्वीपासून काम करत होते. ते या निवडणुकांमधून पुढे आले. डॉ. आंबेडकरांनी १९४२मध्ये ब्रिटिशांशी युद्धसहकार्य केले. ते मंत्रिमंडळात गेले. त्यांना तेथे कामगारखाते मिळाले. त्यांना असे वाटत होते की सत्तांतराच्या वाटाघाटीत दलितांचे प्रतिनिधी म्हणून ब्रिटिश आपल्याशी वाटाघाटी करतील. मात्र ब्रिटिशांनी त्यांना डावलले. तिथे त्यांना आपली फसवणूक झाली असे वाटले असावे.

डॉ. आंबेडकर आणि गांधीजी यांच्यात खरंच मतभेद होते का? याकडे आपण वळू . ध्येये आणि उद्दिष्टे वेगळी असतात तेव्हा भूमिकांमधील फरकाला मतभेद म्हटले जाते. अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था नष्ट करणे हे या दोन्ही दिग्गज नेत्यांचे ध्येय होते. आपण हे समजून घ्यायला हवे की, गांधीजी आणि डॉ. आंबेडकर हे वेगवेगळ्या समाजांना आवाहन करत होते, ज्यांचे हितसंबंध एकमेकांच्या विरोधी होते. या दोघांच्या नात्यामधील हा भाग फार महत्त्वाचा आहे. ज्यांनी 'अस्पृश्यांना कमी लेखण्याचे पाप केले आहे त्यांना आपली चूक समजून यायला हवी. त्यांनी आपल्या चुकीचे परिमार्जन करण्यासाठी प्रायश्चित्त घ्यायला हवे'

असे गांधीजी मानत. म्हणूनच गांधीजींच्या दृष्टीने दलितांचा प्रश्‍न हा सवर्णांच्या आत्मशुद्धीचा होता. गांधी आवाहन करत होते सवर्ण जनतेला. हिंदू परंपरेमध्ये दलितांचे शोषण करून ज्यांना सर्वाधिक लाभ मिळत होता त्यांनाच गांधीजींनी आत्मशुद्धीचे आवाहन केले. गांधीजींची संवादाची भाषा सर्व अडथळे तोडून सवर्णांच्या आत्मिक गाभ्यालाच भिडत असे. अस्पृश्यता आणि जातीप्रथा पाळणे हे लांच्छनास्पद काम आहे. याला आपण जबाबदार आहोत हे सवर्णांच्या मनावर ठसवायचे काम गांधीजींनी यशस्वीपणे पार पाडले. त्यानंतर मी अस्पृश्यता पाळतो आणि जातिभेदाचा मला अभिमान आहे असे कुठलाही सवर्ण सांगू शकला नाही. अपवादाने जे सांगत होते त्यांनीच भयापोटी गांधीजींच्या खुनाचा कट रचला.

डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य जातीत जन्माला आले होते. उच्चशिक्षित आणि उच्चपदावर असूनही त्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागत होते. त्यांना आपल्या पददलित, अशिक्षित आणि वंचित बांधवांना या जातीभेदाच्या आणि अस्पृश्यतेच्या बेड्यांतून तात्काळ मुक्त करून आत्मसन्मान प्राप्त करून द्यायचा होता. डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या बांधवांसाठी ही आत्मसन्मानाची आणि जीवनमरणाची लढाई होती. सवर्णांवर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अवलंबून असलेल्या पददलित समाजाला मुक्त करून आत्मसन्मान मिळवून देणे हे कठीण काम होते. आजपर्यंत आपले सवर्णांनी शोषण केले तर स्वातंत्र्य मिळाल्यावर कशावरून ते तसेच करणार नाहीत अशी शंका त्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक होते. त्यामुळे त्यांचे प्रमुख लक्ष्य पददलितांचा विकास आणि मुक्ती हे होते. गांधीजींना पददलितांना न्याय्य वागणूक आणि त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी स्वातंत्र्य हवे होते. त्यांच्या आदर्श स्वराज्यासाठी स्वातंत्र्य हे साधन होते. थोडक्यात दोघेही एकाच ध्येयाकडे जाण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांवरून निघाले, कारण त्यांचे आवाहन वेगवेगळ्या समाजांना होते.

आपल्याला हे लक्षात घ्यायला हवे की गांधीजींचा खून होण्यापूर्वीचे पाच खुनी हल्ले हे येरवडा करारानंतर म्हणजेच गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाबाबत ठाम भूमिका घेऊन कामाला सुरुवात केल्यावरच झाले आहेत. गांधीजींचा खून पाकिस्तानला ५५ कोटी देण्यातून झालेला नाही, तर त्यांनी घेतलेल्या भूमिकांना जनतेने भरघोस प्रतिसाद दिला, अल्पसंख्याक आणि दलितांना आश्‍वस्त वाटू लागले. ते जेथे जात तेथे फाळणीचे दंगे थांबत असत. मंदिरे आणि पाणवठे दलितांसाठी खुले होत असत. त्यामुळे जातीयवादी आणि आक्रमक हिंदुत्वनिष्ठांचे धाबे दणाणले. या माणसाचे जनता ऐकू लागली तर आपल्याला आवरते घ्यावे लागेल, याच भीतीपोटी त्यांनी गांधीजींचा खून केला आहे. हीच माणसे आज बाबासाहेब आणि गांधीजीना एकमेकाचे शत्रू म्हणून उभे करत गोंधळ माजवत आहेत. एक प्रकारे पुन्हा एकदा जातीच्या आधारावर गरीब आणि कष्टकरी वर्गात फूट पाडून ब्रिटिशांची 'फोडा आणि झोडा' नीती वापरण्याचा कार्यक्रम नव्याने सुरू झालेला आहे.

आज डॉ. आंबेडकर आणि गांधीजी आपल्यात नाहीत. येरवडा करार अजून अस्तित्वात आहे. उत्तर प्रदेशात मायावतीजी निवडून सत्तेवर आल्या, त्याला या कराराचा आधार आहे, हे आपल्याला विसरून चालणार नाही. आजच्या काळाच्या संदर्भात गांधीजी व बाबासाहेब दोघांच्या मुद्द्यांची पुन्हा एकदा तपासणी घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर आजच्या काळाला आवश्यक असलेली दोघांमधील साम्यस्थळे अधोरेखित करणेही तेवढेच गरजेचे आहे. या देशात अनेक संस्कृती एकत्र नांदत आहेत. या देशाचा राष्ट्रवाद हा आक्रमक नाही तर सहिष्णू आणि सर्वसमावेशक आहे. आपल्या देशाच्या घटनेचा मूलभूत पायाही बहुविधता आणि सहिष्णुता हाच आहे. भारतीय समाजाने या उन्नत परंपरा आणि मूल्ये जतन करावीत अशी गांधीजी आणि बाबासाहेबांची इच्छा होती. या दोघांची पददलित समाजाच्या उत्थानाची तळमळ आजही आपल्याला स्वस्थ बसून देत नाही. सत्य, अहिंसा, सत्याग्रह आणि भारतीय घटना यांच्या आधारे या विविधतेने नटलेल्या समाजातील अन्याय्य आणि विषमतामूलक भाग काढून टाकून जगापुढे नवा आदर्श भारत उभा करायचा असेल, तर महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर या दोघांनाही आपल्याला एकत्र घेऊन पुढे जावे लागेल.

('गांधीजी आणि डॉ आंबेडकर' हा विषय खूपच व्यापक असून त्या संपूर्ण विषयाचा या टिपणात आढावा घेणे शक्य नाही. सध्या समाज माध्यमांवर गांधीजींबद्दल गैरसमज पसरविण्याचे काम जोरात सुरू आहे. त्यातील एक गैरसमज आहे...' गांधी विरुद्ध आंबेडकर'. या सर्व गैरसमजांचा आढावा घेऊन त्याला थोडक्यात उत्तर देणे हा  या टिपणाचा उद्देश आहे. विविध लेख आणि पुस्तकांचा आधार घेऊन हे टिपण लिहिले आहे.)

❒

# अन्नपूर्णा परिवार - वार्तापत्र

■ - अंजली पाटील

अन्नपूर्णा मधील माझ्या सर्व सभासद, कर्मचारी, विश्‍वस्त हिंतचिंतक अश्‍या सर्व मित्र मैत्रिणींनो, हा लेख लिहिताना मी ३ महिन्याच्या आपल्या कामाचा, घडलेल्या घटनांचा आढावा घेत असते.

मला आठवंतय जवळ जवळ २०,२२ वर्षा पूर्वी मेधाताईंनी एक नाटक लिहून बसवलं होत,

**''माझी माय अन्नपूर्णा ''**

अन्नपूर्णा आणि त्यातही माझी माय. खुप गहन अर्थ आहे त्यात. अन्नपूर्णा ही तर सर्वांसाठी जीवनदायीनी असतेच पण त्यात ती माझी माय असेल तर अजून प्रेमाने, काळजीनं ती सर्वांसाठी करते. फक्त प्रेम नाही तर काळजी, पुढील आयुष्यात स्वत:च्या पायावर सक्षम पणे उभं राहण्याची.

आज १९९३ पासून २०१९ पर्यंत ची माझी माय, तिला पुढील १०,१० वर्षा पुढे हे मुल कसं असेल, कसं उभं राहिलं, कुठं डळमळू शकेल ह्याचा अंदाज वर्तवताना त्याला सक्षम, ठाम करताना त्यातील धोके, सतत पुढे जाणाऱ्या जगासोबत स्वत:ला बदलावे लागणार, पण त्यातही बदलवून घेताना माझे उद्दिष्ट, माझे विचार हे मला जमिनीवर ठेवणारेच हवेत ह्याचा विचार करत असते.

तुम्ही ही अन्नपूर्णा सोबत खुष वर्ष आहात. ह्या बदलाला सामोरं जाताना धडपडत उभे रहाता आहात, जगासोबत चालण्याचा प्रयत्न  करीत आहात. विकास ही साधी गोष्ट नाही. अच्छे दिन सहज बोलून येत नाहीत, महत्त्वाचे म्हणजे टिकवून ठेवले पाहिजेत तरच त्याचं महत्त्व.

**गोपीनाथ नगर ते सुवास्तू....**

जिन्याखालील ४ विटांच्या टेबल पासून आजच्या आलिशान ऑफिसमध्ये आपण प्रवास केलाय. प्रत्येक घटनेचे साक्षीदार आपण आहोत.

जसे सभासदाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी आपल्या फील्ड ऑफिसर पासून सर्वच जण कष्ट घेतात, तसेच आपल्या सर्वांचाही सामाजिक विकास त्याबरोबर घडलाय हे लक्षात येतंय का तुमच्या...

समाजात घडणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टींचा कशा पद्धतीने तुम्ही विचार करू लागला आहात, लक्षात येतंय का तुमच्या...

मला वाटतंय नक्की ही जाणीव तुमच्या नकळत वाढली आहे, पण...

ही आपोआप घडलेली गोष्ट नाही, हळू हळू ही तुमच्या मनामध्ये घुसली आहे. सभोवताली घडणाऱ्या गोष्टीचे संबंध तुम्हाला कळतात आता.

आपला संवाद अंक वाचता तुम्ही, आवडतो का तुम्हाला, काय आवडलं, का आवडलं ह्याचा विचार नक्की करा. बदल सापडेल तुम्हाला आणि त्याची चर्चा ही करा, घरी-दारी, मित्र-मैत्रिणी मध्येही. घासून पुसून लख्ख होत सगळं.

सध्या राजकारण फार घरात घुसले आहे आपल्या. साधं सरळ संथ जीवन घुसळवून टाकलं आहे अगदी. काय खरं, काय खोटं हे पडताळून पाहायला हे वाचन उपयोगी पडत.

अन्नपूर्णा ची रिकव्हरी the best असते. आपल्या LSO ताई, BM ताई ह्या सगळ्या वरिष्टांनी दिलेल्या सिस्टिम प्रमाणे 'On Day, on time' हप्ते घेतात, त्यामुळे अन्नपूर्णा मध्ये defaulter नसतात. ताई, उज्वला ताई, आरती ताई आणि सर्व PM, DM ताई ह्यासाठी खुप मेहन घेतात. ह्या ३ महिन्यात रिपोर्ट कुठे कुठे हप्ते थकीत दिसत आहेत मला. कृपया आपले सभासद थकीत होऊ नयेत याची नक्कीच काळजी घ्याल.

सप्टेंबर महिन्यापासून अन्नपूर्णा मध्ये कर्ज देणे आणि वसुल करणे ह्याची सिस्टिम बदलली आहे. हा खुप मोठा बदल आपण केला, तो सभासदांच्या हितासाठी. कर्ज देणे आणि वसुली ही आता एकाचवेळी सुरू आहे, कर्ज घेणाऱ्या सभासदांना पाहिले कर्ज संपून २५,३० दिवसांनी दुसरे कर्ज मिळत होते, आणि हप्ते मात्र लगेच चालू होतं होते, ह्याचा त्यांना त्रास होत होता.

त्याऐवजी आता पाहिले कर्ज संपले की ८,१० दिवसात अर्ज करून पुढील कर्ज मिळू शकते आणि त्यानंतर हप्ता ही ३० दिवसानंतर सुरू होतो.

त्यामुळे फील्ड वर आणि हेड ऑफिस ला सुरूवातीला थोडा त्रास झाला, पण आता सिस्टिम नीट बसली की सर्वांना हा बदल सुखराकारक नक्की वाटेल.

अन्नपूर्णा मध्ये जुलै ते सप्टेंबर ह्या काळासाठी एक स्पेशल FD scheme चालू केली होती. त्याला अभूतपूर्व असा रिस्पॉन्स आपल्याला मिळाला त्यामुळे दिवाळी साठीची सभासदांची मागणी आपण पूर्ण करू शकलो. ही आनंदाची गोष्ट आहे.

भविष्य काळात आपल्याला सक्षम करण्यासाठी बचत उपयोगी पडणार आहे. आपल्याला त्यावर भर देणे आवश्यक आहे.

मैत्रिणींनो, मागचा संवादाचा अंक १५ ऑगस्ट, भारताचा स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगाने प्रसिद्ध झाला, तुम्ही सर्वांनी, तुमच्या घरच्यांनी सुद्धा त्यात स्वत:चे विचार मांडले. तुमच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे काय, कसा भारत मला हवा हे मांडले.

विचार केलात तर हे स्वातंत्र्य आज च्या राजकारणात हिरावून घेतलं जातंय. जे भाषण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कित्येक वर्ष संघर्ष केला, पण आज परत ते हिरावून घेतलं जातंय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ती समजून घ्या, उमजून घ्या. आपल्या सभासद, आपला परिवार आहे त्यांनाही समजावून घ्या.

त्याच अनुषंगाने आपला १८ ऑगस्ट फाउंडेशन दिवस, जो आपण अन्नपूर्णा मध्ये २४ ऑगस्टला साजरा केला. कॉ. आनंद मेणसे ह्यांनी लिहिलेले ''गांधींजी'' ह्या पुस्तकाचे प्रकाशन, प्रसिद्ध लेखक अनिल अवचट ह्यांच्या हस्ते झाले.

अतिशय सोप्या भाषेत आपल्याला कॉ. आनंद यांनी गांधींजी समजावून दिले आहेत. खरे तर गांधीजी सगळ्यांना माहिती आहेत, पण गांधींजीं विचार, आचार माहित असूनही आज त्याचा दुरुपयोग केला जातोय. त्यामुळे गांधींजी कसे होते, सहज साधे पण खंबीर गांधींजी. अत्यंत खडतर जीवन जगून आज जगात गांधींजी का सर्वांना भावतात ह्याचे अत्यंत सुंदर विश्लेषण आनंद यांनी केले. अनिल अवचट यांनी ही त्यांच्या सहज मनाला भावणाऱ्या भाषेत आजची परिस्थिती आणि गांधीजींच्या विचारांची आवश्यकता ह्यावर भर दिला.

आपल्या संवाद अंकाचेही प्रकाशन त्याच वेळी झाले.

दर ३ महिन्यानी होणारी आपली विश्वस्त मंडळ मिटिंग त्याच दिवशी सकाळी झाली. सर्व विश्वस्त उपस्थीत होते. परिवाराच्या पुढील वाटचालीस आवश्यक निर्णय इथे चर्चा होऊन घेतले गेले.

आपल्या पाळणाघरामध्ये सामाजिक उपक्रम राबवले जातात. ज्या मध्ये सप्टेंबर महिन्यात गणपती उत्सव साजरा केला. प्रत्येक पाळणाघर सजले होते, गणपती, जी विद्येची देवता मानली जाते, अज्ञान दूर सारून ज्ञानाचा सागर सगळीकडे पसरू दे, अंधकार दूर होऊन प्रकाश पसरू दे अशी मागणी आपल्या पाळणाघरातील छोट्या दोस्तांनी केली. गणपती बसवला, सारं पाळणाघर सजवलं, गाणी म्हटली.

मागील अहवालात आपण चेंबूर येथील दुर्घटनेची सविस्तर माहिती वाचली असेल. मानव निर्मित दुर्घटना आपण वाचतोच पण यावर्षी सगळीकडेच पावसाने अक्षरश: थैमान घातले होते. नोव्हेंबर उजाडला, दिवाळी आली तरी त्याचे संपायचे नाव नाही.

निसर्ग पण इतका विचित्र का वागत असेल, आपल्या चुकांची तो एखाद्या क्षणी फार मोठी शिक्षा करतो. यावेळी आधी पाऊस लांबला, नेहमीच्या दुष्काळी भागात खूपच वाईट अवस्था निर्माण झाली होती. आणि तो आला, सुरू झाला म्हणताना, हुश्श म्हणताना त्याने झोडपायला सुरूवात केली. आपण पुणेकर, मुंबईकर ही हवालदिल झालो. मुंबई मध्ये तर ट्रेन वर सगळी मुंबई चालते, ती पावसामुळे बंद म्हणजे मुंबई जागीत स्थिर.

वस्त्या मधून पावसाने पाणी शिरल्यावर खूप हाल होतात कारण बहुतांश वस्त्या नद्यांच्या पात्रात, ओढे बुजवून उभ्या असतात. कोल्हापूर सांगली इथे तर सर्व गावं पाण्याखाली गेली, उभं पीक नासुन गेलं, पाणी हटायला तयार नाही.

पुण्यात २५ सप्टेंबरची रात्र ही काळरात्र ठरली. कात्रज परिसरातील ढगफुटी मुळे कात्रजच्या नाल्याची भिंत कोसळली आणि हाहाकार माजला. पाण्याचे लोंढे आणि त्यासोबत मिळेल ते घेऊन ते पाणी धावत होते.

आपली ब्रँच ४,८ आणि १७ ह्या वस्त्या मध्ये खूपच नुकसान झालं. आपले ब्रँच मधील सगळे वस्त्या मध्ये धावले, सभासदांना धीर दिला, शक्य ती मदत, एक हप्ता माफ अशी मदत अन्नपूर्णा मधून जवळ जवळ २८२ सभासदांना दिली गेली.

निसर्गाने त्याचे महत्त्व ह्या वर्षी दाखवून दिले. त्याच्यावर अतिक्रमण केले ते सारे त्याने धुडकावून लावले. फार विदारक चित्र होते सगळीकडे.

तुम्हाला माहीत असेलच आपल्या पाळणाघर संचालिका, मदतनीस मुलांना खुप प्रेमाने सांभाळतात. बाहेरच्या पाळणाघर बद्दल सतत पेपर मध्ये काही न काही लिहून येत असते. पण आपल्या संचालिका मदतनीस, भलेही कमी शिक्षण घेतल्या असतील, त्या प्रशिक्षित आहेत. SNDT चे चाईल्ड केअरचे प्रशिक्षण त्यांना दिले जाते. साधारण ५,६ तारखांना संचालिका आणि १५ नंतर मदतनीस यांचे प्रशिक्षण असते. त्यासाटी अंजली बेंडे, अनुताई देसाई, अमृता ह्या SNDT मधून येतात. मुलांना गोष्टी कशा सांगायच्या, आहे त्या वस्तू मधून गोष्टीसाठी साहित्य तयार करून पपेट द्वारे मुलांना ऐकण्याची, वाचनाची आवड निर्माण कशी करायची असे त्यांचे स्किल, कॅपॅसिटी बिल्डिंग चे काम केले जाते.

डॉ. अनुराधा नारळकर आणि डॉ. चैत्रा नारळकर सामंत ह्या दोघी मुलांना अचानक काही आजार उद्भवले, तर प्रथमोपचार कसे करावेत, घाबरून न जाता काय केले पाहिजे, आजार कसे ओळखावेत, काळजी काय घ्यावी, साधी साधी कोणती औषधें पाळणाघरात ठेवावीत ह्याचे प्रशिक्षण पाळणाघर संचालिका मदतनीस यांना देतात. आपल्या ह्या मुलांना ही आजाराची मदत मिळते हे तुम्हाला माहीत असेलच.

तुम्हां सर्वांना माहीत आहेच NCDC आपले आर्थिक पार्टनर आहेत. ११,१२ ऑक्टोबर ला दिल्ली मध्ये NCDC तर्फे इंडिया इंटरनशॅशनल कोऑपरेटिव्ह ट्रेड फेअर आयोजित केले होते. भारतभरातून आणि बाहेरील देशांमधून सहकार चळवळ अंतर्गत हे प्रदर्शन भरले होते. अन्नपूर्णालाही त्यात भाग घेण्याचे निमंत्रण आले होते. अन्नपूर्णाच्या RD FD Scheme चा स्टॉल आपण ठेवला होता. मनीषा ताई आणि ऋचा ताई दोघी नी आपल्या ह्या बचत योजनेची चांगली माहिती तिथे दिली. अनेक संस्थांनी त्याची माहिती घेतली, अन्नपूर्णा ची माहिती, त्यातील सेवांची माहिती घेतली. त्याच बरोबर इतर संस्था कशा प्रकारे काम करतात, वाढतात ह्याची माहिती आपल्यासाठी त्या घेऊन आल्या.

१६ सप्टेंबरला मेधा ताई साधन च्या पॅनल डिस्कशन साठी दिल्लीला गेल्या होत्या. आपले इन्शुरन्सचे मॉडेल कसे आहे, आपण सबासदांसाठी ते कसे राबवतो यावर त्या तिथे बोलल्या. इतर संस्था त्यांच्या संस्थेमध्ये ते कसे वापरू शकतील आणि सभासदांना त्याचा लाभ कसा होईल ह्यांचे सुंदर विवेचन ताईंनी तिथे केले. सर्वांना हे प्रॉडक्ट खुप भावते.

तर मैत्रिणींनो अशी ही आपली माय अन्नपूर्णा, आर्थिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्ट्या आपल्या सधन करणारी ''अन्नपूर्णा''.

❐



गांधींनी गोखले यांच्या सल्ल्यानुसार भारत भ्रमण केल्यानंतर पुन्हा आपल्या पोषाखात बदल केला. ते गुडघ्यावर धोतर नेसू लागले आणि कमरे वरील भाग उघडा ठेवू लागले.


कमरे वरील भाग उघडा ठेवू लागले तो भारतीय परंपरेने नेमून दिलेला पोषाख होता. गुढग्याखाली कोणतेही वस्त्र नेण्यास अस्पृश्यांना सक्त बंदी होती. कोणी तसे केल्यास शिक्षेस पात्र ठरत.

गांधी आंबेडकरांना एकदा म्हणाले होते, ''तुम्ही जन्माने अस्पृश्य आहात परंतु मी मनाने, निवडीने अस्पृश्य बनलो आहे.'' गांधींनी स्वत: स्वत:ला अस्पृश्य बनविण्याची पहिली पायरी म्हणजे त्यांनी अस्पृश्यांचा पोषाख स्वीकारणे होय. **- रावसाहेब कसबे**

**आपले वाङ्मय वृत यांच्या सौजन्याने...**


ANNAPURNA PARIWAR




ANNAPURNA PARIWAR




Mr. V.C Joshi




ANNAPURNA PARIWAR


























अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश घोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.